न सर्प हा, रज्जु म्हणोनि ठावें त्याचे मनीं तें भय कां उठावें ? ।
जो कां भितो मानुनि सर्प साचा, तो त्रास त्याचा हरि मानसाचा. ॥ ४१
अजि जयां अपरोक्ष दिसे हरी, इतर दुःखहि तद्वचनें हरी. ।
हरिसिं जाणति नागिणि जाणल्या म्हणुनि सोडविती पति जाण त्या. ॥ ४२
शुकहि सूचवि हेचि कथा रसीं न वदतां स्फुट वैखरि फारसी, ।
प्रकरणीं पुढिल्या व्रजनायका स्तविति सादर ते स्तुति आयका. ॥ ४३
जो कां सखा सारथि पांडवाचा विलास ऐसा करि तांडवाचा. ।
जो नाट्यनामास कळौ करीतो हा मृत्यु जन्मांतक लौकरी तो. ॥ ४४
'कृष्णतांडवविलास' म्हणावा हा तृतीय म्हणऊनि गणावा, ।
अर्पिला हरिचिया पदपद्मा, ज्या पदीं त्रिभुवनेश्वरि पद्मा. ॥ ४५

---

## अध्याय चवथा.

(श्लोक.)

भुजंगासि देखोनि तैशा प्रकारें भुजंगस्त्रिया कोणकोण्याप्रकारें, ।
कशा प्रार्थिती सर्वही श्रीशुकानें असें वर्णिलें आयका जी स्वकानें. ॥ १
धरुनि पोटीं स्थिरजंगमातें मर्दी असा कृष्ण भुजंगमातें, ।
छत्रें फणाचीं अतिकष्ट भारी, ते पावती आवरि कंठभारी. ॥ २
नाच नाचत असोनि नटाचा हाणतो सरसिजानन टांचा, ।
हानि यास्तव भुजंगबलाची दृष्टि त्यावरि पडे अबलांची. ॥ ३
पतिभयें अतिविव्हल झालिया, शरण कृष्णपदाप्रति आलिया; ।
स्मृति नुरे कबरांबरभूषणीं मन समर्पियलें व्रजभूषणीं. ॥ ४
स्तन मुखीं धरुनी पिति लेंकुरें, हरिस दाविति त्या युवती करें, ।
हृदयिं भाविति कीं व्रजपालकें न वधिजे फणि देखुनि बालकें. ॥ ५
पसरती युवती वसनांचला करतळीं अबला अतिचंचला, ।
हरिस काकुलती करिती जलीं किति अशा कितिएक कृतांजली. ॥ ६

---

१. ठाऊक असतां. २. भय. ३. शहाण्या. ४. वाणी; फारसा विस्तार न करितां. ५. मित्र. ६. हें या विलासाचें नांव होय. ७. लक्ष्मी. ८. आपल्या कानांनीं. ९. कृष्ण. १०. नर्तन. ११. कमलाप्रमाणें मुख ज्याचें असा. (कृष्ण. सरसिज+आनन=कमळ+मुख.) १२. नाश. १३. केशबंधन वस्त्रभूषणाच्या ठायीं. १४. व्रजाचा भूषणरूप कृष्ण त्याचे ठायीं. १५. लुगड्याचा पदर. १६. पाण्यांत. १७. हात जोडून.

श्रीहरीस करिती नमनातें, [1]तत्पदीं करुनि [2]लीनें मनातें, ।
अर्पिती [3]पतिफणाकुसुमातें प्रार्थिती [4]भुजगसंयमनातें. ॥ ७
हरिपदीं [5]पतिमोक्षणतीव्रता मनिं [6]जयां अतिधन्य पतिव्रता ।
भुजग दुष्ट असो, जरि कां पती स्वगुरुदेव, [7]तदर्थचि [8]कांपती. ॥ ८
[9]अभय मागति, रक्षिल त्या जना धरुनि निश्चय हा, [10]भवभंजना ।
शरण येउनियां [11]कमलालया स्तविति त्या [12]करुणावरुणालया. ॥ ९
हरीची स्तुती नागपत्न्या करीती अलोकप्रकारांत ही लोकरीती, ।
बहु गोड हे श्लोक जे [13]एकवीस स्फुरे अर्थ गंभीर जेथें कवीस. ॥ १०
[14]दंडयोग्य फणि हा खळ साच, श्लोक येरिति निवेदि तसाच. ।
[15]श्लोक त्यावरि दहा नमनाचे श्रोतया [16]सुखनिधान मनाचें. ॥ ११
श्लोक पांच करुणा उपजाया, त्या निवेदिति [17]भुजंगमजाया ।
[18]न्याय दंड म्हणुनीच वदोनी श्लोक हे प्रथम त्यांतचि [19]दोनी. ॥ १२

नव्हे हा अन्याय त्रिभुवनगुरूचा तिहिं जगीं,
[20]गमे न्याय, स्वामी ! करिसि जितुका दंड भुजगीं, ।
अशा या दंडाया धरिसि अवतार त्रिजगतीं,
कृपेनें ताराया तव चरण जाला निज गती. ॥ १३

दंडही करुनि दुष्ट खळांसी वर्तणें सम तुसीं सकळांसी. ।
गर्व नासुनिहि तें पद देशीं देसि जें गुरुपणें उपदेशीं. ॥ १४
ठाउकेंचि पुरुषां [21]वनितांतें कीं सुतासहि दटाउनि [22]तोतें, ।
दंडही करुनि ते शिकवीजे नीति सांगति जनास [23]कवी जे. ॥ १५

---

१. त्या हरीच्या चरणीं. २. नम्र. ३. कालियाच्या फणा हींच सुमनें (पुष्पें). ४. सर्पाचें मर्दन करणारा जो कृष्ण त्यास. ५.पति मुक्त होण्याविषयीं त्वरा. (तीव्रता.) ६. ज्या स्त्रियांच्या मनांत त्वरा त्या पतिव्रता अतिधन्य.७.सर्प जरी दुष्ट, तथापि तो पति, यामुळें तो आपला गुरु व देव यांसारखा पूज्य होय, म्हणून त्या स्त्रिया आपल्या पतीसाठीं कांपूं लागल्या. ८. दशमस्कंध–अध्याय १६ श्लोक ३२ पहा. ९. [जे जन] अभय मागति त्या जनां [हरि] रक्षिल, हा निश्चय धरून– असा अन्वय. १०. संसारनाशकाला. ११. कमला+आलय=लक्ष्मी+वासस्थान=श्रीविष्णु. १२. करुणेच्या सागरास. १३. सोळाव्या अध्यायांतील श्लोक (३३–५३) ज्यांवर वामनपंडितांनीं टीका केली आहे ते श्लोक. १४. 'न्यायो हि दंडः' इत्यादि ३३ वा श्लोक पहा. (अध्याय १६.) १५. पुढील दहा श्लोक. (अध्याय १६.) १६. सुखाचें स्थान, संचयगृह. १७. कालियपत्न्या. १८.योग्य दंड, न्यायाला अनुसरून शिक्षा. १९. श्लोक ३३-३४ पहा. २०. तूं केलेला दंड योग्यच आहे असें आम्ही जाणतों. २१. स्त्रियांला. २२.या पद्यावरून वामनाची लोकव्यवहारनिपुणता दिसून येते. २३. जी नीति लोकांस कवि शिकवितात तीच नीति बाप मुलांस शिकवितो.

दंडही करुनि दे[1]वैरिपूतें[2] आयुधें परम त्यावरि पूतें ।
हाणतांच [3]भवबंध हरीतो तूं [4]अशेषजनबंधु हरी तो. ॥ १६
दासांसि दास्येंचि, खळांसि दंडें, तूं मुक्ति देतोसि असी [5]उदंडें, ।
कर्में तुझीं त्यांत [6]अलोकरीती देसी फलें [7]जेंवि जसीं करीती. ॥ १७
[8]एवं अनुग्रह खळां जरि नि[9]ग्रहांत येना तरी विषमता तव वि[10]ग्रहांत, ।
[11]कर्मानुरूपफलदंड करूनि देसी दुष्टांसही गति भल्यास हितोपदेशीं. ॥ १८
सहज पूर्णकृपानिधि जो हरी खलमद प्रभु दंडमिसें हरी, ।
म्हणुनि बोलति कीं त्वदनुग्रह स्वपतिदुर्मदनाशकनिग्रह. ॥ १९
दुष्टांसही दंड अनेकरीती [12]जे होम पूजा न जगीं करीती, ।
हस्तें तुझ्या दंड अनन्य ज्याला, मेला तरी धन्यचि धन्य झाला. ॥ २०
स्वामि जो [13]सविधिशंभु जगाचा तोचि दंडकर या भुजगाचा, ।
वासना [14]दुरित दंड करीती त्यांस नाश तव दंडकरीती. ॥ २१
प्रत्यक्षही दिसतसे [15]खलसर्पकाय हा दोषमात्र हरिसीं म्हणवेल काय, ।
जें पाप संचित पुढें क्रियमाण [16]दोहींपासूनि आजि सुटला न शके व[17]दोंही. ॥ २२
एवं तुझा क्रोधहि [18]वर्ज नाहीं कोपें कृपा हे खलदुर्जनांहीं, ।
दुष्टांसही दंड तुझ्याच हस्तीं त्या निग्रहीं संत कृपा पहाती. ॥ २३
जो [19]अन्यघातास सदा भुकेला स्वयेंच तैशासहि दंड केला, ।
को[20]ण्यां तपें हें न कळेचि, देवा ! आतां असें प्रार्थिति वासुदेवा. ॥ २४
अजि किती तपला न कळे तपें, विविध सोसुनियां हिमें[21] [22]आतपें, ।
गुरुकुळीं अथवा [23]प्रथमाश्रमें [24]बहुत जन्म वनीं क्रमले श्रमें. ॥ २५

---

१. दैत्यांतें. २. पवित्र. ३. संसाररूप बंधनाचा नाश करतो. ४. सकल लोकांचा बंधु (हितकर्ता) जो श्रीकृष्ण तो. ५. पुष्कळ. ६. विलक्षणप्रकारें. ७. याप्रमाणें. ८. कृपा, प्रसाद. ९. दंडांत. १०. देहांत. ११. मनुष्यास त्याच्या कर्माप्रमाणें फळ देतोस म्हणजे दुष्टांस दंड करून गति देतोस आणि साधूंला हितोपदेश करून गति देतोस. १२. 'श्रीसूर्यपुत्रादिक जे करीती' असाही पाठ आहे. १३. ब्रह्मदेवांसहित शंकर आणि सर्व जग यांचा. १४. पातक. १५. दुष्टसापाचा देह. १६. झालेलें व होणारें अशा उभयपातकांपासून. १७. व्यर्थ. १८. शिक्षेमध्यें. १९. दुसऱ्याच्या नाशाला. २०. 'कोण्या तपाचें फल वासुदेवा नेणों असें बोलति दे' असाही पाठ आहे. २१. शीत. २२. उष्णता. २३. ब्रह्मचर्यानें. २४. 'बहुत जन्म वनस्थ दहाश्रमें' असाही पाठ आहे.

त्यजुनियां[1] अथवा अजि मीपणा नें धन मान अपेक्षुनि आपणा, ।
बहुत देउनि मान धनें जना, परम तत्पर या तव पूजना. ॥ २६
किंवा तुंतें[3] लक्षुनि सर्वभूतीं केली दया कीं हरिच्या विभूतीं, ।
धर्में अशा श्रीहरि तुष्टलाहे तरीच हा लाभ यथेष्ट लाहे[4]. ॥ २७
जो तूं स्वयें जीवन सर्वभूतीं तो दाविसी यासि कृपाविभूतीं, ।
हा लाभ जी भूतदयेविनाहीं लाधेल कोणी घडणार नाहीं. ॥ २८
जीवें[5] तूं हरि! जगा सकलांचा, दंड आपणचि होसि खलांचा. ।
सर्वभूतकरुणेविण[6] हाता हें न ये फल कदापि पहातां. ॥ २९
स्वयें करूनी बहुतांसि दंड, निःपाप केले त्रिजगीं उदंड[7]; ।
त्यांहूनि याचें बहुभाग्य देवा! आतां[8] असें प्रार्थिति वासुदेवा. ॥ ३०
देवां[9] न हा लाभ न दानवांला, ब्रह्मादिकां वा मुनिमानवांला, ।
कोण्या तपाचा महिमा कळेना भाग्यास या हेतुचि आंकळेना[10]. ॥ ३१
तपति देव मुनींद्र समस्त कीं चरणरेणु पडो निज मस्तकीं, ।
रज अलभ्य तुझें स्थिरजंगमा[11] तदपि[12] लभ्य शिरींच भुजंगमा. ॥ ३२
शिरिं जयास्तव रेणु असा पडे सुकृत[13] हें न मनासहि सांपडे. ।
पदरजासहि या अतिदुर्लभा भुजग पात्र कसा व्रजवल्लभा[14]!? ॥ ३३
कमलजा[15] तुझि जे निजनायका[16] तिसहि लाभ न हा व्रजनायका! ।
बहु तपें करितां जगमाउली[17] विनटली[18] मग या तव पाउलीं. ॥ ३४
त्यजुनि[19] काम बहु करितां तपें विविध सोसुनियां हिमआतपें[20], ।
तुझि निजात्मक[21] भक्तिच साधली चरणरेणु रमा मग लाधली[22]. ॥ ३५
अजित तूं मथिसी वरुणालया[23], वरि तुतेंचि रमा करुणालया[24]! ।
हरिदिनादि[25] महाव्रततीव्रता करुनि पावलि जी तुज सुव्रता. ॥ ३६

१. 'त्यजुनि मानधनादिक मीपणा' असाही पाठ आहे. २. 'स्वपर टाकुनि केवल आपणा' असाही पाठ आहे. ३. तूं सर्व प्राण्यांत भरला आहेस असें मानून. ४. लाधला, मिळाला. ५. सकल जगतांचा तूं जीवन. ६. सर्व प्राण्यांवर दया केल्यावांचून. ७. पुष्कळ लोक. ८. 'म्हणूनियां प्रार्थिति वासुदेवा' असाही पाठ आहे. ९. दैत्यांस. १०. सांपडेना, समजेना. ११. स्थावरजंगम पदार्थांस तुझ्या चरणाचे रजःकण दुष्प्राप्य आहेत. १२. तथापि. १३. पुण्य. १४. हे व्रजनायका. १५. लक्ष्मी. १६. पट्टराणी. १७. जगताची माता. १८. लीन झाली. १९. 'बहुत काम अकाम करी तपें, विविध सोसुनियां हिम आतपें । मग निजात्मक भक्तिहि साधली चरणरेणु रमा मग लाधली ॥' असाही पाठ आहे. २०. शीतोष्ण. २१. अद्वैत. २२. पावली. २३. सागरास. २४. करुणेच्या गृहा. २५. एकादश्यादि.

[1]चपळ जे पळ जेंवि [2]युगें करीं [3]विरमली रमली धरितां करीं. ।
तव रजीं वर जीं [4]चलक्षणें गवसते वसते इतरीं क्षणें. ॥ ३७
[5]व्रजपती ! जप तीस तुझा सदा, नमनिं ते मनिं तेज दुजें कदा ।
तिस कळा सकळा तुज अर्पणें चपळ ते पळते अजि या गुणें. ॥ ३८
तव रमा वर मागुनि जा रजीं विनटली नटली बहु फार जी ।
अजितसा जितसापहि साधिला विभव हें [6]भवहेलन लाधला. ॥ ३९
[7]पाहिजे चरणरेणु जयाला यत्न ते इतर सिद्धि जयाला. ।
सर्वथा न करितीच रमेशा यावरी वदति हे परमेशा. ॥ ४०
चरणरेणु जिहीं शरणागतीं वरियला, त्यजिल्या सकळा गती. ।
[8]क्षिति न इच्छिति [9]सागरमेखळा सुख [10]रसातल राज्यहि शृंखळा. ॥ ४१
तव पदाब्जरजांसहि मागती इतर त्यांस तृणाच समा गती. ।
न सुरराज्यसुखादिकवासना न मनिं इच्छिति [11]पद्मभवासना. ॥ ४२
चरणरेणुस या शरणागती करिति ते अजरामरणा गती ।
इतर सिद्धिहि योगकळांचिया न मनिं इच्छिति ते सकळांचिया. ॥ ४३
उपडणें [12]भवकामजटा किती ? सकल केवल मुक्तिहि टाकिती. ।
त्यजिति सर्वहि सार असार जीं धरिति एकचि भाव असा रजीं. ॥ ४४
असे तुझे जे पदरेणु देवा ! ते लाधला हा खल वासुदेवा ! ।
आश्चर्य हें मानुनि [13]सर्परामा निवेदिती [14]विश्वमनोभिरामा. ॥ ४५
चरणरेणु असे पुरुषोत्तमा दिसति लभ्य अशा खलसत्तमा, ।
[15]विभव लभ्य अशांस '[16]अशेषही किति म्हणूनि निरूपिल ' [17]शेषही. ॥ ४६
सदा क्रूर दुर्बुद्धि या कालियाची [18]तमामाजि उत्पत्ति ज्या कालिं याची, ।
कळेना तुझा भाव कीं कां खळाला दिल्हा लाभ हा थोर उत्संखळाका. ॥ ४७
[19]पादतोय पति शंभु जगाचा मस्तकीं धरि तुवां भुजगाचा, ।
[20]मौलिवृंदहि तया चरणानें मर्दिला [21]अमृतआचरणानें. ॥ ४८

---

१. या पद्यांत अनुप्रासालंकार आहे, कारण यांत पळले, रमली, वरजी आणि वसते या अक्षरांची आवृत्ति झाली आहे. २. दोन हातानीं. ३. विश्रांति पावली. ४. चंचल. ५. हे गोकुलनायका, तुझा जप सदा ती करी. या आणि पुढच्या पद्यांत अनुप्रासालंकार आहे. ६. संसारनाश. ७. 'सांपडे' असाही पाठ आहे. ८. पृथ्वी. ९. समुद्रवलयांकित. १०. पाताळ. ११. ब्रह्मदेवातें. १२. संसाराविषयींच्या इच्छेचें मूळ. १३. सर्पस्त्रिया. १४. सर्व विश्वास सुंदर वाटणारा असा. १५. ऐश्वर्य. १६. सकळ. १७. शेषसर्प. १८. तमोगुणामध्यें. १९. पादतीर्थ. २०. फणासमूह. २१. अमृताप्रमाणें आचरण करणाऱ्यानें, जीवन देणाऱ्यानें.

इच्छितांचि तव पादरजांला मानितोसि परमादर झाला ।
दाखऊनि अमिता[1] विभवाला नाशिसी अजि! अनादि भवाला[2]. ॥ ४९
माथां धरायास तशा रजांला आश्चर्य कीं पात्र[3] भुजंगमाला. ।
कर्तव्य तूझें सहसा कळेना ब्रह्मादिदेवांसहि आकळेना. ॥ ५०
सर्पावरि विश्वनिधान[4] नाचे हे शब्द त्याच्या[5] वनिताननांचे[6]. ।
कर्णीं विलासें परिसे[7] हरी तो, प्रपन्नदुःखें[8] प्रभु जो हरीतो. ॥ ५१
पदरजमहिमा भुजंगरामा[9] विनविति तूज रमामनोभिरामा! ।
'पदरजमहिमाख्य' हा[10] विलास त्रिभुवननाथ रचूनि सेविलास. ॥ ५२

## अध्याय पांचवा.

(श्लोक.)

कृपा हे तुझी दंडशब्दा न सोहे[11] असे वर्णिले मूळिंचे श्लोक सा[12] हे ।
भुजंगस्त्रिया भाग्य गाती पतीचें दयाळुत्व वर्णूनियां श्रीपतीचें. ॥ १
पतीचा शिरीं जो निजानंद[13] नाचे दहा[14] श्लोक त्या देवकीनंदनाचे ।
मुखीं वर्णिती श्रीपदांभोरुहातें[15] करीती नमस्कार रंभोरु[16] हातें. ॥ २
'तूज वंदन अजी! भगवंता! तूं पुरा[17] स्थिरचरांत[18] अनंता! ।
भूषणीं कनक[19] येरिति भूतीं[20] तूंच कीं सकळभूतविभूतीं. ॥ ३
परब्रह्म जें शुद्ध तें तूंचि देवा! समस्तांचिया आत्मया, वासुदेवा! ।
असंख्यात शक्तीस कोणी न मोजी जयाचा[21], तयातें नमो जी! नमो जी! ४
अनंतशक्ती प्रभु वासुदेवा! तूं ज्ञानविज्ञाननिधान[22] देवा! ।
तूं ब्रह्म तूं निर्गुण[23] निर्विकार[24] तूं तत्वता न प्रकृतिप्रकार[25]. ॥ ५
महाकाळ तूं, जो गिळी काळ सारे, दिसे तूजमध्यें दुजा काळसा रे! ।
निमेषादि[26] काळास जो पाहताहे गिळूनी तया शेवटीं राहताहे. ॥ ६

---

१. अपरिमित. २. संसाराला. ३. योग्य. ४. कृष्ण. ५. सर्पाच्या. ६. स्त्रियांच्या मुखांचे. ७. एकतो. ८. शरणागतांचीं दुःखें. ९. सर्पवनिता. १०. हा चवथा 'पदरजमहिम' नामक विलास रचून. ११. सहन होत नाहीं. १२. सहा. (श्लोक ३३-३८ दशमस्कंध अध्याय १६) १३. आत्माराम. १४. या दहा श्लोकांत (३९-४८) कालियवनितांनीं परमेशाचें नमन केलें आहे. १५. लक्ष्मीच्या स्थानरूप पदकमलातें. १६. कदलीप्रमाणें ज्यांच्या मांड्या अशा सर्पस्त्रिया. (पृष्ठ २९७ टीप १४ पहा.) १७. परिपूर्ण. १८. पृष्ठ १८२ टीप ३ पहा. १९. सोनें. २०. प्राण्यांमध्यें. २१. 'तुझ्या त्याचि तूतें नमो जी नमो जी' असाही पाठ आहे. २२. श्लोक ४० वा पहा. २३. त्रिगुणरहित. २४. विकारशून्य. २५. मायाकृतविकारवान्. २६. कालाच्याही पूर्वींचा.

निमेषादिकां काळ जो शक्तिरूपी उठे लीनही होय तुझ्या स्वरूपीं ।
तया साक्षि तूं पाहसी [1]पद्मनाभ स्वयें मुख्य तो काळ तूं काळनाभ. ॥ ७
[2][3]नमो काळरूपा नमो विश्वरूपा, नमो विश्वसाक्षी अनादिस्वरूपा ।
नमो विश्वकर्त्या [4]जगत्कारणाला स्वयें कारणातीत नारायणाला. ॥ ८
तूं [5]ईश येरिति उपाधि जयासि विद्या तूं जीवहि धरुनिही [6]असती अविद्या, ।
जो [7]स्वानुभूतिरहितत्रिगुणाभिमान त्यातें नमो [8]स्थिरचरांतहि जो समान. ॥ ९
सिद्धांतरूपें नमनें करूनी तदन्य जे वाद तयां हरूनी, ।
सच्छास्त्रसिद्धांत पुनर्वदोनी त्या वंदिती श्लोक असेच [9]दोनी. ॥ १०
नमो अनंतास अतींद्रियास [10]कूटस्थ जो केवळ तूं तयास ।
सर्वज्ञता शेषहि तो न मोजी जाची, तया तूज नमो नमो जी.' ॥ ११
[11]उपासना धन्य असेरितीची तुझी करीती [12]कमलापतीची. ।
यथारुची जे भजताति देवा, त्यातें तसा भाससि वासुदेवा ! ॥ १२
जसे वर्णिती [13]अंधे बैसोनि हस्तीं, धरूनी तदंगासही [14]स्वस्वहस्तीं ।
तुतें वर्णिती अज्ञ नैशाप्रकारें तयां वाटसी तूं तसा त्या विकारें. ॥ १३
जया सांपडे हस्तिचा पाय हस्तीं वदे तो स्वयें [15]स्तंभरूपेंचि [16]हस्ती, ।
जया सांपडे कान तो [17]शूर्प दावी, असी आत्मता [18]सर्वशास्त्रीं वदावी. ॥ १४
धरी दांत खुंटा गमे त्यास हस्ती [19]पठाडे असा जो धरी पुच्छ हस्तीं ।
मनीं टोणग्याचेपरी ही पहाती जया लागलें स्थूळ [20]लांगूल हातीं ॥ १५
पदादिरूपांतहि तोचि हस्ती स्तंभादिरूपें कळलाचि हस्तीं ।

---

१. कमल आहे नाभिस्थानीं ज्याच्या तो. २. श्लोक ४१ पहा. ३. नमस्कार. ४. सकल जगताच्या उत्पत्त्यादिकांचा साधनभूत. ५. ज्ञानोपाधि. ६. अज्ञानोपाधि. ७. आत्मानुभवानें गेला आहे सत्त्वादिगुणत्रयात्मक अभिमान ज्याचा. (श्लोक ४२.) ८. स्थावरजंगमांत. ९. श्लोक ४३-४४ पहा. १०. निर्विकार. ११. पूजा, अर्चा, आराधना. १२. लक्ष्मीपतीची. १३. आंधळे लोक. १४. आपापल्या हातांनीं. हत्तीच्या अंगास हात लावून स्पर्शज्ञानानें त्याचें वर्णन अंधजन करतात. १५. ज्याला हत्तीचा पाय सांपडतो तो हत्ती खांबासारखा आहे, असें म्हणतो. १६. हस्तिन्=हत्ती. [संस्कृतांत अकारांत नामास 'इन्'प्रत्यय लागून 'तें त्यास आहे' अशा अर्थाचीं विशेषणें होतात. हस्त (सोंड) ज्याला आहे तो हस्तिन्=हस्ती=हत्ती; कर ज्याला आहे तो करी; धन ज्याला आहे तो धनी.] १७. सूप. १८. सकल शास्त्रकार भगवत्स्वरूपाचे वर्णनें तें स्वरूप जसें भासतें तसें करतात (शास्त्र=नियमन करणारें साधन–ज्या मध्यें अनेक गोष्टींचें नियमन केलें आहे तें शास्त्र.) १९. पठाडे (पठाड=मूढ, खोगीर) पाठ. (हा निंदार्थक शब्द आहे.) २०. शेंपूट.

असाचि तूं भाससि वादियांला[1] तर्कादिशास्त्रांत अनादि यांला. ॥ १६
त्या हस्तिचें रूप तथापि सारें तें नेणती हें कुमती असारें. ।
तसें न जाणोनि जगांत नाना कुयुक्तिवादें[2] करिती तनाना. ॥ १७
ज्याच्या मतीं तत्व जसें जयाला, कानीं पडे तेंचि खरें तयाला. ।
तो वाच्य सिद्धांत न या मताचा निर्वाह त्याचाच असे मताचा. ॥१८
वाच्यांशतावाचक जे प्रबंध जे वाचितां होति विशेष बंध, ।
वाच्यांश त्या आणिक वाचकांहीं तुझ्याच शक्तीस्तव शक्त कांहीं.॥१९
वदे शब्द शाखाखुणें[3] चंद्र दावी, गुरूनें तुझी गोष्ट ऐसी वदावी; ।
घटाकारशब्दें स्फुरे श्रोतयांला, तसें तत्त्व तें तत्त्व वाटे तयांला. ॥२०
मापें जसें मोजिति धान्य[4] पाणी शब्दें तसा दाविति[5] चक्रपाणी, ।
सर्वांसही शब्दचि जो वदे हा तूं मूळ त्याही ध्वनिरूप देहा. ॥ २१
न दुंदुभी[6] दुंदुभिचाच नादीं शब्दामधें[7] तूं न असा अनादी, ।
शब्दास तूं मूळ परंतु शब्दीं न धुंडितां दीससि कोटि अब्दीं. ॥ २२
शब्दांत तूं सांपडतासि जेव्हां कां दाविते वेद गुरूसि तेव्हां ? ।
वर्णूनिही निर्गुण बोधरीती [10]ते आश्रय श्रीगुरुचा धरीती. ॥ २३
गुरुमुखेंचि गुरूसहि[11] तें कळे श्रुतिमुखेंचि न पावति ये [12]केळे, ।
म्हणुनि तूंचि अनादि गुरू कवी प्रथम जो विधिलें[13] निजें[14] शीकवी.॥२४
बहुत युक्तिबळें उठती [15]मतें कळति तीं न असंमत संमतें. ।
म्हणुनि वेद निघे तव आननीं[16] सुपथ दावित जो भवकाननीं[17]. ॥ २५

---

१. शास्त्राच्या आधारें वाद करणाऱ्यांस. २. स्वरूप कळलें नसतांही कळलें असें दाखवून कोणत्या तरी युक्तीनें शास्त्रवेत्ते स्वमत स्थापित करून प्रौढि मिरवितात. ३. डालीच्या खुणेनें चंद्र दाखिवणें. यास संस्कृतांत 'शाखाचंद्रन्याय' असें म्हणतात. 'वस्तुतः शाखेशीं चंद्राचा किमपि संबंध नसतां, चंद्र पहावयाची खूण समजायासाठीं, त्या शाखेवर चंद्र आहे, असें कोणी कोणास सांगतो म्हणून एतत्सजातीय कोणेक विषयाच्या ठायीं दृष्टांतत्वें करुन प्रमाणार्थ घेतात जो हा लोकव्यवहार तो; उ० समुद्रांत सूर्य बुडतो ही शाखाचंद्रन्यायेंकरून उक्ति आहे.' ४. 'तत्वपाणी' असाहि पाठ आहे. ५. 'सेविति' असाहि पाठ आहे. ६. नौबद वाद्य. ७. जसा दुंदुभीच्या नादांत दुंदुभि राहत नाहीं, तथापि नादास दुंदुभि कारण आहे, त्याप्रमाणें तूं शब्दांत नसतोस म्हणजे शब्दांनीं तुझें वर्णन करवत नाहीं तथापि तूं शब्दाचें आद्यकारण आहेस. ८. वर्णांनीं. ९. मग गुरु करण्याचें कारण काय? वेदांनीं तुझ्या स्वरूपाचें ज्ञान होत नाहीं म्हणून गुरु करावा लागतो. १०. वेद. ११. गुरूलाही गुरु असतो तेव्हां स्वरूपज्ञान होतें. १२. कळेला, योग्यतेला. १३. ब्रह्मदेवास. १४. आत्मज्ञान. १५. सिद्धांत. १६. मुखीं. १७. संसाररूप अरण्याचे ठायीं.

त्रि[1]कांड तो वेदहि तूंचि देवा! सकाम निष्कामहि वासुदेवा! ।
विज्ञानकांडीं निग[2]मस्वरूपा 'नमो नमो जी' तुज वेदरूपा! ॥ २६
घेतां असा वं[3]दनलाभ लाहो त्रिकांडवेदात्मक वर्णिला हो! ।
उपासनाकांड तयांत [4]नारी वर्णूनियां वंदिति [5]पूतनारी. ॥ २७
उपासनाकांड निवृत्तकर्में समर्पणें [6]भागवतैकधर्में ।
अर्पूनि कर्में तव [7]चारिरूपें ते भाविती संत सुखस्वरूपें. ॥ २८
तूं चित्तबुद्धिमन आणि [8]अहंकृतींत, स्वात्मा स्वयें स्फुरसि निश्चय हा मतींत. ।
हा [9]व्यूह विष्णुमयमूर्ति[10]चतुष्टयाचा, झाला असे यदुकुळीं अवतार याचा. ॥२९
श्रीकृष्ण तूंचि, वसुदेवकुमार देवा! चित्तासि जो स्फुरसि केवळ वासुदेवा!।
जें शुद्ध सत्व [11]वसुदेव तयासि सं[12]ज्ञा हें गुह्य ठाउक असे सकळां [13]अभिज्ञा.॥३०
[14]सत्वचित्तहि अचेतन देवा! त्यासि जीवन तसा वसुदेवा! ।
अन्य तूजविण न प्रिय मानी [15]मीपणें जरि तनू अभिमानी. ॥ ३१
शून्य विश्व तुजवांचुनि देवा! वाटतें प्रिय असा वसुदेवा! ।
प्रीतिहेतु वसुदेवकुमारा श्याम सुंदर बरा सकुमारा. ॥ ३२
चित्ताख्य सत्व वसुदेवकुमार देवा, चित्तेंचि तूं स्फुरसि वास्तव वासुदेवा! ।
चित्तेंकरूनिच तुझी प[16]रमानुभूती चित्तींच आत्मपण तूज समस्त भूतीं. ॥ ३३
चित्तेंचि तूं स्फुरसि केवळ सर्वदेहीं, विश्वीं तसा प्रकटसी [17]वसुदेवगेहीं, ।
इत्यादि तत्व वसुदेवकुमार देवा! होऊनियां प्रकट दाविसि वासुदेवा. ॥ ३४
चित्तें जगीं स्फुरसि तूं सकळांस जैसा चित्तप्रकाश वसुदेवकुमार तैसा, ।
[18]संकर्षणाख्य तव मूर्ति अहंपणांत तो राम भाविति उपासक आपणांत. ॥ ३५
प्रद्युम्न [19]बुद्धिगत तो सुत रुक्मिणीचा होणार पुत्र तव [20]देवशिखामणीचा, ।
नातू तुझाचि अनिरुद्ध मनोभिमानी ऐसें उपासक जन प्रभु तूज मानी. ॥ ३६

---

१. कर्म, उपासना आणि ज्ञान अशा तीन कांडांनीं युक्त. २. वेदस्वरूप. ३. नमस्काराचा भला. ४. सर्पस्त्रिया. ५. पूतनेचा अरि कृष्ण. ६. परमेश्वराची निष्काम आराधना करणें या भागवतप्रतिपादित धर्मानें. ७. चित्तचतुष्टयांत; चित्त, बुद्धि, मन आणि अहंकार यांच्या ठिकाणीं. ८. अहंकारांत. ९. समुदाय. १०. चित्तचतुष्टयाचा. वसुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, आणि अनिरुद्ध यांस चित्तचतुष्टयाचे अवतार मानिले आहे (श्लोक ३५-३६). ११. जें शुद्ध सत्व त्यालाच वसुदेव असें नांव आहे. १२. खूण, नांव. १३. जाणत्यांस. १४. सत्वचित्त हें अचेतन आहे; कारण नुसत्या सत्वगुणानें सृष्टि उत्पन्न होत नाहीं, त्यास गुणत्रयाची अपेक्षा आहे. १५. अभिमानानें. यद्यपि वसुदेवाच्या देहांत अहंपणाचा अभिमान आहे, तरी तो तुजवांचून कांहीं प्रिय मानीत नाहीं. १६. अनुभव. १७. वसुदेवाच्या घरीं. १८. संकर्षण, (बळराम) ही आहे आख्या (नाम) ज्याची. १९. बुद्धीची अधिष्ठात्री मूर्ति तो प्रद्युम्न. २०. देवश्रेष्ठाचा.

जयांसि हीं ठाउक चारिरूपें, ते पाहती स्वात्मसुख स्वरूपें, ।
जे नेणती त्यांसहि तोचि देव चित्तादिकीं केवळ वासुदेव. ॥ ३७
या कारणें सर्वहि जीवराशी, तूंचि स्वयें हें कमळावरासी[1], ।
निवेदुनी ईश म्हणूनि नारी त्या मागुती वंदिति पूतनारी. ॥ ३८
प्रकाशिसी तूं गुण[2] वासुदेवा! गुणींच आच्छादुनि घेसि देवा! ।
गुणाचिया वृत्तिकरूनि लक्षा येसी, नमो जी! तुज त्या अलक्षा[3]. ॥ ३९
प्रकाशुनी पाहसि तूं गुणाला निजप्रकाशें निज आपणाला, ।
लीला जयाच्या न विकाररूपा तया नमो जी! तुज चित्स्वरूपा. ॥ ४०
तूं सिद्धिदाता सकळा विकाश 'नमो नमो' त्या तुज निर्विकारा; ।
जो वर्तवीता[4] सकळेंद्रियांतें तो तूं हृषीकेश[5] नमूं तयातें. ॥ ४१
तूं इंद्रियें वर्तउनी विरक्त कोठें न होसी विषयानुरक्त, ।
कीं तूं मुनी आदिगुरू मुनीला नित्य स्वयें मुक्त सरोजनीला[6]. ॥ ४२
तूं साक्षि गा! सर्व मनोगतींचा[7] अध्यक्ष तूं सर्व जगत्पतींचा, ।
न विश्व होऊनि विराटरूप कीं सर्पही रज्जुच चित्स्वरूप. ॥ ४३
ज्ञानस्वरूपा जडसर्पहारा[8] द्रष्टृत्वरूपें करिसी विहारा, ।
तूं कारण स्थावरजंगमाचें निमित्त रज्जूच भुजंगमाचें[9]. ॥ ४४
वंदोनियां येरिति पीतवासा[10] प्रसन्न देखोनि जगन्निवासा, ।
त्या प्रार्थिती श्रीकमलापतीतें कीं सोडवीं आमुचिया पतीतें[11]. ॥ ४५
प्रकरणीं पुढिल्या जगदीश्वरा विनवितील असें कमलावरा. ।
करिति वंदन श्रीपतिकामिनी भुजगिणी यमुनाऱ्हदवासिनी[12]. ॥ ४६
म्हणुनि 'भुवनवंद्य'[13] हा 'विलास' त्रिभुवननाथ रचूनि सेविलास, ।
स्मरण करिति जे पदांबुजाचें धरि मुकुटावरि शंभु अंबु[14] ज्याचें. ॥ ४७
इति विरचित 'विलास' पांचवा हा; परिसुनि कृष्णपदांबुजींच वाहा. ।
अजि विभव[15] पहा पदांबुजांचें धरि मुकुटावरि अंबु शंभु ज्यांचें. ॥ ४८

---

१. लक्ष्मीपतिला. २. सत्वादिगुण. ३. अदृश्या. ४. ज्या इंद्रियाचें जें काम तें त्याकरवीं करविणारा. ५. इंद्रियांचा स्वामी. ६. सरांत झालेलें कमल त्याप्रमाणें नीलवर्ण. ७. परापरगतिंश. ८. संसाररूप सर्पास हरण करणारा. ९. सर्पाचें. १०. पीत (पिंवळें) आहे वास (वस्त्र) ज्याचें तो. पीतांबरधरास. ११. कालियसर्पातें. १२. यमुनेच्या डोहांत राहणाऱ्या. १३. या पांचव्या अध्यायाला 'भुवनवंद्य विलास' असें नांव आहे. १४. तीर्थ. १५. वैभव, माहात्म्य.

## अध्याय सहावा.

(श्लोक.)

अंगीकरूनि वदल्या खळदंड आधीं,हा कष्टला पति असा न धरूनि आधी, ।
कीं या मिसेंकरुनि होउनि तुष्ट देव, प्राणप्रदान पतिचें करु वासुदेव. ॥ १
तों तो प्रसन्न हरि देखियला भला, हो! नेदी तथापि पतिमोक्षण लाभ लाहो, ।
यानंतरें म्हणति कीं स्थिरजंगमातें, 'तूं बुद्धिदायक तसाच भुजंगमातें. ॥ २
याकारणें यास करीं कृपाच; म्हणोनि हे श्लोकें असेचि पांच, ।
प्रार्थूनि ऐसें कमलापतीला त्या नागिणी सोडविती पतीला. ॥ ३
'तूं सूत्रधारीच जनाशयांचा करूनि सृष्टि स्थिति नाश यांचा ।
ज्या ज्यांस संस्कार जसे रितीचे उद्बोध तैसे करिसी मतीचे. ॥ ४
तूंचि स्वयें प्रेरक वासुदेवा! अन्याय याचा तरि काय देवा! ।
क्षमा करावी जगदेकबंधो! अनंत कारुण्यगुणैकसिंधो! ॥ ५
तूं विश्वरूप तुजवीण दुजें न कांहीं, तुझीच राजसहि तामस सात्विकांहीं, ।
मूर्ती परंतु तुज सांप्रत सात्विका या झाल्या प्रिया, अजि! न तामसगूढकाया. ॥ ६
शुभ्र सात्विकचि या स्थितिकाळीं आवडे, न तनु तामस काळी, ।
हें खरेंचि परि बाप जगाचा मायबाप तरि तूं भुजगाचा.' ॥ ७
या नंतरें प्रार्थिति या प्रकारें, कीं हे क्षमा यावरि निर्विकारें ।
आजी करावी खलजीवनाशा! कीं थोर आम्हा पतिजीवनाशा. ॥ ८
अन्याय केला जरि बालकानें क्षमा करावी जगपालकानें, ।
तूं मायबाप स्थिरजंगमाचा हा सोसिं अन्याय भुजंगमाचा. ॥ ९
जो श्रीतनूस डसतां अपराध झाला, तो दंश बाधक नव्हे गरुडध्वजाला, ।
याच्या विषें भय जगीं गरुडास नाहीं, तें दुःख देइल कसें गरुडासनाहीं? ॥ १०
किमपि दुःख तुतें गमतें तरी, उपजता तुज कोपहि अंतरीं, ।
तदपि नेणत हा सुरसत्तमा तुज अजी! डसला पुरुषोत्तमा! ॥ ११

---

१. मनोव्यथा. २. कालियाचें. ३. कालियाची मुक्ति. ४. अध्याय १६ श्लोक ४४-४८ हे पांच श्लोक. ५. जनांच्या हृदयाचा (चालक). ६. सदुपदेश. ७. प्रयोजक, कर्म करविता. ८. जगाचा तूं एकच निग्रहानुग्रहकर्ता. ९. तूं त्रिगुणात्मक आहेस. १०. तुला सात्विक मूर्ति प्रिय झाल्या आहेत. ११. मूर्ति, देह. १२. खल+जीव+नाश=खलांच्या प्राणाच्या नाशकर्त्या. १३. पतीच्या जीविताची आशा. १४. कृष्णाच्या देहास. १५. गरुड आहे ध्वजाच्या ठिकाणीं ज्याच्या तो (विष्णु) त्याला. १६. गरुड आहे आसन ज्याचें अशा कृष्णालाही. १७. मनांत. १८. देवश्रेष्ठा.

[1]मूढ [2]मूर्ति हरि ! या भुजगाची शांति माउलिच तूं त्रिजगाची, ।
हा चुके न अपराध कराया तूं क्षमेस न चुकें सुरराया ! ॥ १२
ताडिलेंच [3]भृगुनें तुज लातें, श्लाघ्य होय हृदयीं तुजला तें. ।
गाति या [4]अमृतआचरणातें भक्त जे शरण [5]या चरणातें. ॥ १३
हे आयके शब्द [6]तदंगनांचे [7]रंगीं फणाच्या विविधांग नाचे, ।
तों चालिला प्राण भुजंगमाचा, न भार सोसे स्थिरजंगमाचा. ॥ १४
तें पाहतां काकुळती करीती त्रैलोक्यनाथासहि लोकरीती; ।
वस्त्रांचळातें [8]पसरूनि दान त्या मागती देखुनियां [9]निदान. ॥ १५
कृष्णजी ! अजुनि कां न पहा हा ? प्राण कीं त्यजि भुजंग अहाहा ! ।
दीसते तनु [10]शवासम याची, [11]आस ते इतुकि या समयाची. ॥ १६
प्राणभीक पतिची [12]करुणातें मागतों शरण ज्या चरणातें; ।
प्रार्थितों तुज कृपानिपुणासी दे रमापति ! [13]अहेवपणासी. ॥ १७
परमतत्पर ज्या पतिजीवनीं विनविती [14]यमुनाऱ्हदजीवनीं, ।
'पतिस सोडिं' असा वर मागती, वरिति आपणही परमा [15]गती. ॥ १८
विनवितों हरि ! आणिक [16]किंकरीं तुजचि कीं उपदेशहि हा करीं ।
कवण धर्म तुझा करितां बरें स्ववदनें वदिजे [17]कनकांबरें ? ॥ १९
धर्म भागवत सांग हरी ! तो, जो समस्त अशुभांस हरीतो. ।
भक्तिनाशक अशेष भयांतें दे [18]तितेंचि न फलां उभयांतें. ॥ २०
काकुळती येरिति बायकांनीं केली, तितें श्रीगुरुराय [19]कानीं ।
घेऊनि, आत्मा स्थिरजंगमाचा पुरे करी दंड [20]भुजंगमाचा. ॥ २१
ऐसी शुकाचार्य परिक्षितीतें सांगे कथा, धन्य करी [21]क्षितीतें. ।
या ऊपरी कालियमोक्षणाची लीला वदे श्री[22]कमलेक्षणाची. ॥ २२

---

१. 'मूढ मूर्ति हरि या भुजगाची, शांति माउलिच तूं त्रिजगाची । तूं क्षमा तदपराध कराया, योग्य सिद्ध सुर साधक राया ॥' असाहि पाठ आहे आणि ग्रंथांतील श्लोकापेक्षां याचा अर्थ प्रौढ दिसतो. २. मायेनें मूढ झालेली (मूर्ति). ३. भृगुमुनीनें. ४. लत्ताप्रहार सोसणें हेंच अमृताचरण. ५. या तुझ्या चरणातें. ६. त्या सर्पस्त्रियांचे. ७. मंडळावर. ८. पल्लवातें, पदर पसरून. ९. अंत. १०. प्रेतासारखी. ११. आशा. १२. सदयातें. १३. अवैधव्य, सौभाग्य. (अध्याय १६ श्लोक ५२.) १४. यमुनेच्या डोहांतील उदकीं. १५. मुक्ति. १६. सेवकाचे ठायीं. १७. सुवर्णमय वस्त्र परिधान करणाऱ्या अशा कृष्णानें. १८. त्या भक्तीलाच. १९. कानाचे ठायीं घेऊन. २०. कालिय सर्पाचा. २१. पृथ्वीतें. २२. कमललोचन कृष्णाची.

आतां म्हणे श्री[1]शुक कीं, नृपाळा ऐशा प्रकारें स्तवितां कृपाळा ! ।
आली कृपा त्याच जनार्दनातें, पुरे करी कालियमर्दनातें. ॥ २३
पायेंकरूनि भुजगाधिप लोटिला, हो ! हा शेवटीं पदरजें [2]शतकोटि लाहो, ।
गुंडाळल्या [3]पदयुगावरि [4]वर्तमाना झिंझाडुनी टकलितां भुजगेंद्रमाना. ॥ २४
तो काळिया होउनि [5]सावधान देखे रमाकांत दयानिधान, ।
भजावया श्रीगरुडध्वजाला तत्काळ तोहीं [6]नररूप झाला. ॥ २५
धरुनियां नररूप [7]कृतांजली चरण वंदुनि ते हरिचे जलीं, ।
हळु हळु प्रभुसीं अतिसंकटें वदतसे [8]शिशु जेरिति धाकुटें. ॥ २६
आम्ही म्हणें उपजतां खळ दुष्ट भारी, कीं क्रोध दीर्घ अतिदारुण, [9]कैटभारी ! ।
उत्पत्ति केवळ तमोगुण तामसाची हे तों नव्हे अनृत गोष्टि असीच [10]सांची. ॥२७
प्राण्यास [11]संस्कार कधीं सुटेना, स्वभावबेडी सहसा तुटेना, ।
श्रीमूर्ति तूझी हरि ! [12]सारसाक्षी हें जाणते सारअसारसाक्षी. ॥ २८
[13]गुणत्रयें [14]विश्व तुवांचि केलें नानास्वभावीं विषयीं भुकेलें, ।
प्रकार नानाविध ज्यांत देवा ! तूं निर्मिसी सर्वहि, वासुदेवा !. ॥ २९
त्यामाजि आम्ही तरि दुष्टजाती कीं दुष्टसंस्कार कधीं न जाती; ।
माया तुझी हे कशि हो ! त्यजावी ? हे [15]दुस्तरा केंवि तरोनि जावी ? ॥ ३०
बोलोनि आतां बहु कोण [16]कांम दोहींसही[17] कारण [18]पूर्णकाम, ।
सर्वज्ञ तूं बांधिसि सोडवीसी, अनादि हे गोष्टि[19] नव्हे नवीसी. ॥ ३१
स्वयेंच देऊनि अशा [20]प्रवृत्ती स्वयेंच दावी [21]खेळदंडवृत्ती, ।
हें कां म्हणावें तरि [22]ओकळेना सर्वज्ञ जो त्याविण हें कळेना. ॥ ३२
वैषम्य त्याला तरि बोलवेना, [23]वाग्देवता येरितिनें लवेना, ।
उगेंचि त्याच्या चरणीं भजावें, तूं रक्षि ऐसें शरणार्थ जावें. ॥ ३३
यालागिं आतां करणेंचि दंड, करीं तरी आणिकही [24]उदंड, ।
कृपा करावी जरि हेंचि वाटे, सर्वज्ञ तूं लावि तशाच वाटे. ॥ ३४

---

१. अध्याय १६ श्लोक ५४. २. शंभरकोटी पदरजें. ३. दोन पायांवर. ४. ठेवलेल्या, असणाऱ्या. ५. सावध. (स+अवधान). ६. मनुष्यरूप. ७. कृत+अंजलि=हात जोडलेला. (श्लोक ५५.) ८. बालक. ९. खोटी. १०. खरी. (श्लोक ५६.) ११. पूर्व जन्मांतील संस्कार. १२. कमलनयनी. १३. सत्व, रज आणि तम या तीन गुणांनीं. १४. श्लोक ५७ पहा. १५. तारावयास अशक्य. १६. कार्य. १७. तारण्यास आणि मारण्यास. १८. सफलेच्छ. १९. तूं सोडविणारा आणि मुक्त करणारा ही गोष्ट. २०. कर्मे करण्याची इच्छा. २१. दुष्टास दंड करणें हा मार्ग. २२. ध्यानांत येईना. २३. वाणी. २४. पुष्कळ.

हरिपुढें पसरी फणि वि[1]ग्रहा, म्हणतसे अजि टाकुनि आग्रहा, ।
जरि दया तरि दावि [2]अनुग्रहा, करि पुनः अथवा [3]अतिनिग्रहा. ॥ ३५
शुक म्हणे शरणा गति हो! खरी, भुजग जे वदला निजवै[4]खरी, ।
परिसतां हरि त्याप्रति बोलतो [5]धरणिनायक! आयिक बोल तो. ॥ ३६
क्षमा [6]दुरन्याय करूनि देव जें बोलिला त्याप्रति **वासुदेव** ।
तें तों 'विलासीं' [7]पुढिल्या पहावें [8]परापराधांस असें [9]सहावें. ॥ ३७
सर्वापराधी खळ दुष्ट भारी, दावी तरी [10]शांतिच **कैट**भारी. ।
ऐसी क्षमा तोचि **मुकुंद**भक्त कीं त्यास कोणी न दिसे वि[11]भक्त. ॥ ३८
जिव्हा स्वदांतें रगडी कदापी, दुःखें तरी तो कवणासि [12]दापी, ।
हरीचिया भक्तजनाचि [13]मांजी सर्वात्मभावें असि हे क्षमा जी. ॥ ३९
उरीं **भृगू**ची हरि लात सोसी, ऐसी क्षमेचीच सदां [14]असोसी, ।
क्षमा धरूं वृत्ति असी मनाची प्रार्थी **हरी**तें मति **वाम**नाची. ॥ ४०
ऐसा '**क्षमा**' नामक हा 'वि[15]लास' रचूनि म्यां तूं **हरि** सेविलास. ।
क्षमा मला ये अजि **वासुदेवा**! सर्वात्मभक्तीचि करूनि देवा! ॥ ४१

---

## अध्याय सातवा

(श्लोक.)

आत्मा सम स्थावरजंगमाचा, [16]क्षमा [17]दुरन्याय भुजंगमाचा, ।
करी **हरी** घेउनि शब्द कानीं, निवेदिलें जें अजि! वायकांनीं. ॥ १
तयावरी प्रार्थियला [18]अहीनें [19]प्रपन्नरीती मदगर्वहीनें, ।
आतां तया उत्तर देव देतो, नृपाप्रति श्री**शुक**ही वदे तो. ॥ २
**शुक** म्हणे मृदु शब्द वदे असें, **हरि**पुढें फणि तो पडला असे ।
परिसतां प्रभु [20]वैखरि बोलतो, नृपति सादर आयिक बोल तो. ॥ ३

१. देहाला. २. कृपा, प्रसाद. ३. मोठी शिक्षा. (श्लोक ५९ पहा.) ४. वाणी. ५. हे पृथ्वीपते! ६. दुः+अन्याय=दुष्ट अन्याय=मोठें पाप. ७. सातव्या. ८. दुसऱ्याच्या अपराधांस. ९. सहन करावें. १०. क्षमा. ११. भिन्न, निराळा. १२. दटावी, भय दाखवी. १३. मध्यें. १४. उत्कट इच्छा. १५. सहाव्या विलासाचें नांव 'क्षमाविलास', सातव्याचें 'लीलाविलास,' आठव्याचें 'सुधारसविलास,' नवव्याचें 'आनंदविलास', असें त्या त्या विलासांच्या अखेरीस पंडितांनीच दर्शविलें आहे. १६. क्षमा करी–असा अन्वय. १७. सर्पाचा दुष्ट अन्याय. १८. कालियानें. १९. शरण जाऊन. २०. वाणी.

नको येथें राहों, गमन करिं डोहो त्यजुनियां,
[1]स्वबंधूसीं सिंधुप्रति निजगृहा जाइं जुनियां, ।
विलंबातें टाकीं व्रजधन [2]तटाकीं तळमळी
तटा जाणें जाण त्वरित मजला [3]पादकमळीं. ॥ ४
केली क्षमा, [4]यद्यपि त्यास दंड, धन्यत्वही त्यास दिलें [5]उदंड. ।
लावी असा दापुनि त्यास वाटे, दुष्टास त्या त्रासचि फार वाटे. ॥ ५
बोलेल जें दापुनि [6]अप्रमेय हें वर्णिजेतें पुढिल [7]प्रमेय, ।
अध्याय जो या [8]दशमीं तिसावा हा श्लोक तेथील जसा [9]विसावा. ॥ ६
वाणी न येथें वदली शुकाची, वाचा पुढें वर्णिल गोपिकांची ।
कीं बोल हे गातिल गोपिकांहीं, म्हणोनि येथें न वदेचि कांहीं. ॥ ७
शब्द हे वदति गोपबायका कां म्हणाल तरि तेंचि आयका, ।
[10]यांमिसें हरिचरित्रहि ने घे वैखरी सफलता करुनी घे. ॥ ८
श्रीरासरंगीं हरि [11]रंगेला, हो ! त्याहूनि आधीं रतिरंग [12]लाहो, ।
गोपींस दे कृष्ण अनेकरीती, तों गोपिका गर्व मनें करीती. ॥ ९
हुडकितां अवघीच [13]वसुंधरा व्रजवधू चतुरा अतिसुंदरा ।
हरिस त्या भजती [14]हरिमध्यमा वदति येरिति [15]भारति मध्यमा. ॥ १०
असा तिहीं गर्व मनांत केला, न गोष्टिचा या हरि तो भुकेला. ।
न गर्व जाला लवलेश [16]सोहे, सोसील तो गोष्टि असी कसा हे ? ॥ ११
त्यांचा असा गर्व हरावयाला, प्रसाद ही त्यांस करावयाला ।
अदृश्य झाला [17]भवदुःखहंता त्यांची हराया अवघी [18]अहंता. ॥ १२
अदृश्य होतां हरि गोपकांता आक्रांत मांडूनि तया स्वकांता ।
[19]धुंडीवया हिंडति जा वनांत अर्पूनि चित्तें जगजीवनांत. ॥ १३
कांहीं निघे [20]तुच्छपिशाचदेहीं नाचे जसा देह वदे तसें ही ।
हरी जयाच्या हृदयीं निघाला, आलाचि [21]पूर्वस्थितिलागिं घाला. ॥ १४

१. आपल्या बांधवांसह दूर सागरांत जा. २. गोकुळांतील लोक तीरावर तळमळत आहेत. ३. चरणांनीं (चरणकमलांनीं). ४. जरी दंड केला तरी क्षमा केली. ५. पुष्कळ. ६. ज्याचें प्रमाण करितां येत नाहीं असा (कृष्ण). ७. सिद्ध करण्याची गोष्ट, कृत्य. ८. दशम स्कंधांत. ९. विश्रांति. १०. कृष्णक्रीडा वर्णन करण्याच्या निमित्तानें. ११. रत झाला, आसक्त झाला. १२. लाभ. १३. पृथ्वी. १४. सिंहकटी. १५. वाणी, वैखरी. १६. सहन करी. १७. दुःखरूप भवसंसाराचा नाशकर्ता. १८. गर्व, मीपणा. १९. 'होऊनि वेड्या फिरती वनांत' असाही पाठ आहे. २०. वेड्या पिशासारिखा. २१. प्रपंचाला.

लीला हरीच्या जन ते करीती, टाकूनियां पूर्वील लोकरीती, ।
ज्यांच्या मनीं लौलिक लाज नाहीं, होऊनि वेडे न भिती जनांहीं. ॥ १५
ऐशा अवस्था व्रजकामिनीच्या कृष्णात्मबुद्धी गजगामिनीच्या ।
जे ते म्हणे गौळण मी हरी तो, जो सर्वदुःखें स्मरतां हरीतो. ॥ १६
त्या खेळती खेळ जनार्दनाचे, त्या नाचती जेंवि मुकुंद नाचे. ।
त्या रांगती जेंविहि रांगला, हो! घेती वियोगांतहि सौंगलाहो. ॥ १७
करीती चरित्रें मनःपूत नारी स्वयें होउनी पूतना पूतनारी, ।
हरी होय तीच्या मुखीं थान घाली व्रजीं पूतना होउनी जे निवाली. ॥ १८
तृणावर्त ने जेंवि कृष्णा उदारा तसे खेळती खेळ गोपाळदारा, ।
तृणावर्त जे गौळियांची कुमारी तिला गोपिका कृष्ण होऊनि मारी. ॥ १९
यशोदा अजी होय ते त्या समाजीं हरी होय जे बांधते तीस मौंजीं ।
फुलांचे बहू हार मानूनि, दावी असीं कौतुकें, तीं किती हो! वदावीं ?॥ २०
होते शिळारूपचि वृष्टि भारी रक्षी व्रजांगा मधु कैटभारी, ।
ऐशा स्त्रिया बोलति त्यांत नारी बोले असें होउनि पूतनारी. ॥ २१
भिऊं नका रक्षिन मी हरी तो, भया समस्तांसहि जो हरीतो, ।
म्हणोनि गोवर्धनरूप हातीं घे वस्त्र तीतें सकळा पहाती. ॥ २२
कीर्तनांत हरिदास करिती विष्णुच्या विविध कौतुकरीती, ।
मानसीं हरिविलासमयांत रामता प्रकट जा समयांत. ॥ २३
श्रीरामरूपी शर चाप हातीं हा भाव गाती हरिचा पहाती, ।
ते दाविती श्रीहरिदास ठाणें प्रेमें मनाचीं उठतां उठाणें. ॥ २४
गोपरूपहरिहृत्सदनांत प्रेमगानरस तो वदनांत, ।
बुद्धि तन्मयपणास धरीते वेणु दावित तई अधरीं ते. ॥ २५

१. गोकुळांतील स्त्रियांच्या. २. 'गेल्याच देहात्मकबुद्धि ज्यांच्या' असाही पाठ आहे. ३. कृष्ण-
रूपी आपण अशा ज्यांच्या बुद्धि. कृष्ण आत्मा आहे. ४. गजाप्रमाणें (हत्तीप्रमाणें) मंद चालणाऱ्या
गोपिकांच्या. ५. सोंगाचा लाभ. ६. मनाला पवित्र. ७. पूतनाशत्रु. ८. तृणावर्त या नांवाचा वायुरूपी
राक्षस. हा कंसाचा एक अनुचर. यानें प्रचंड चक्रवाताचें रूप घेऊन कृष्णास आकाशांत उडवून
नेलें. हा कृष्णाच्या हातून मरण पावला. (भागवत–दशम स्कंध अध्याय ७ पहा.) ९. गोपस्त्रिया
१०. जी गोपस्त्री तृणावर्त झाली होती तिला कृष्ण गोपीचें रूप घेऊन मारी. ११. त्या गौळणी-
च्या समूहांत. १२. मध्यें. १३. इंद्रानें केलेली अतिवृष्टि. १४. गोवर्धनाप्रमाणें वस्त्र, वस्त्राचा गुंडाळा
करून गोवर्धनपर्वताप्रमाणें अंगुलीवर धरी. १५. कथेकरी, विष्णुभक्त. १६. विलासरूप. १७. राम-
भाव, रामभक्ति. १८. उभें राहण्याची ढब. १९. गोपरूपहरीच्या हृदयरूप गृहांत. २०. प्रेमयुक्त
गाण्याचा रस. २१. कृष्णरूपानें. २२. ओष्ठामध्यें.

प्रेम[1]विव्हल असावध रीती विष्णुचे विविध भाव धरीती, ।
नाचती विविध ते हरिदास त्यागुनी सकळ लाज उदास. ॥ २६
लोक पाप तृणपावक[2]रीती विष्णुदास हरिभाव करीती, ।
नृत्य गायन मुकुंदचरित्रीं धन्य ते त्रिभुवनांत धरित्री[3]. ॥ २७
ऐशाच लीला करिती उदारा रात्रीं वनाभीतरिं गोपदारा[4], ।
क्रीडा तिहीं देखियल्याच होत्या तैशा स्वयें आचरती अहो! त्या. ॥ २८
मधुर सर्व कथा हरिची खरी, परि वदे चरितांतर[5] वैखरी[6] ।
अजि जियेस्तव रासकथा निघे, मन कथेस तियेस निघोनि घे. ॥ २९
कालिया म्हणवि गौळणि[7] तीतें पालथी करुनियां युवतीतें[8] ।
मी हरी म्हणुनि तीवरि नाचे भाव ते करि शिरीं नटनाचे[9]. ॥ ३०
शिरीं कालियाच्या तिणें माधवाचा जसा देखिला नाच तैशाच वाचा, ।
तिणें आइकील्या वदे त्या प्रकारें, दटावी भुजंगास कृष्णानुकारें[10]. ॥ ३१
पूर्वार्ध[11] नंदनें[12] पराशरनंदनाचा[13] बोले प्रकार अजि कालियमर्दनाचा, ।
आतां प्रमेय पुढिल्या चरणद्वयाचें गोपी वदे वचन तें अज[14] अद्वयाचें[15]. ३२
गमन तूं करिं दुष्ट भुजंगमा! परम बाधिसि जो स्थिरजंगमा, ।
वळखसी न खळा! खळमर्दना[16] पशुपनंदनरूपजनार्दना[17]. ॥ ३३
मी जगीं प्रकटलों खलदंडा, कारणें, तुजसमाच[18] उदंडा, ।
दंडिल्या बहुत म्यां खलजाती देह सांडुनि अनर्गल[19] जाती. ॥ ३४
दटाविला ये रिति कृष्ण जीनें, म्हणोनियां गोपवधूंत जीनें ।
प्रकार[20] हे कालियमर्दनाचे केले वदे शब्द जनार्दनाचे. ॥ ३५
यानंतरें प्रस्तुत बोलताहे ते आयका शब्दसुधालता[21] हे ।
विषें तुझ्या हें जल तीव्र जातें तें वाटलें कंटक या व्रजातें. ॥ ३६
म्हणूनि बोलेल हरी खळाला, त्याचा असा गर्व जरी जळाला, ।
तें तों विलासीं पुढिल्या पहावें 'लीलाविलासां'त असें रहावें. ॥ ३७

१. प्रेमानें व्याकुळ. २. तृणाला जसा अग्नि दहन करितो. ३. पृथ्वी. ४. गवळ्यांच्या बायका. ५. दुसरें चरित. ६. वाणी. ७. जिनें कालियाचें सोंग घेतलें होतें तिला. ८. तरुण स्त्रीतें. ९. नृत्याचे. १०. कृष्णाप्रमाणें. ११. श्लोकाच्या प्रथम अर्धांत. १२. शुकाचार्य. १३. व्यास. १४. जन्मरहित. (अजन्म.) १५. ज्यावांचून दुसरा कोणी नाहीं (अद्वय), एक. १६. दुष्टाचा मर्दनकर्ता मी त्या मला. १७. पशूंतें पालन करणारा जो नंद त्याचा पुत्ररूप जनार्दन त्याला. १८. तुजसारखा. १९. प्रतिबंध न होतां. २०. जिनें कालियमर्दनाचें हें नाटक करून दाखविलें ती हे कृष्णाचे शब्द बोलली. २१. अमृतवल्ली.

विलास हा सप्तम माधवाचा 'लीलाविलासा'ख्य रचूनि वाचा, ।
अर्पी तया शामलसुंदरातें श्रीइंदिरेच्या प्रियमंदिरातें. ॥ ३८
'लीलाविलासें'च चरित्रमाला खेळोनि गोपी पुरुषोत्तमाला, ।
गाती तराया सकळांस नाव 'लीलाविलासा'ख्य म्हणूनि नाव. ॥ ३९

---

## अध्याय आठवा.

(श्लोक.)

सर्पास यानंतर वासुदेव निरोप देतो अजि देवदेव. ।
ते आयका शब्दविलास कानें जे वर्णिले श्रीहरिचे शुकानें. ॥ १
दंडूनि केलें मजला क्षमा, जी! आतां असों दे यमुनेचिमाजी ।
प्रार्थी फणी हेंचि भुजंग भीतें म्हणूनि बोलेच भुजंगमातें. ॥ २
जळ पिती करितील निमज्जन पशुपगोवळ गौळणि मज्जन, ।
तव विषें अतिदूषित जीवनें, क्षण न लागत नाशिल जीवनें. ॥ ३
म्हणुनि टाकुनियां यमुनाऱ्हदा, त्वरित जाइं म्हणे खलदुर्हृदा ।
वरहि देउनियां कमलावरें दवडिलाच फणी जगदीश्वरें. ॥ ४
ऱ्हदजळांतहि म्यां गरुडासनें गुणकथा रचिल्या तव शासनें ।
स्मरति जे जन सांज सकाळिं या, न तुमचें भय पावति, काळिया! ॥ ५
विष तुझें न तया करि भस्म, रे! सतत हें खलशासन जो स्मरे, ।
तुज जइं न तयांसहि पाहवे, व्रजसमीप कसें वद राहवे. ॥ ६
जातां बरें येथुनि तूज साच, दावी हरीभाव अजी असाच ।
हें दीडपद्यें हरि बोलिला हो! देऊनियां ही वरदान लाहो. ॥ ७
देउनी किमपि अन्य वरातें बोलतो हरि भुजंगवरातें, ।
कीं करीं त्वरित रे गमनातें येस्थळीं धरिं उदास मनातें. ॥ ८
परमतीर्थ अतःपर हें जना, करिति जे पितृतर्पण मज्जना, ।
स्मरति हें मम शासन कौतुकें, जळति पापकुळें भवहेतुकें. ॥ ९

---

१. 'लीलाविलास' हें सातव्या विलासाचें नांव. २. लक्ष्मीच्या. ३. अनेक चरित्रें. ४. पुरुषांमध्यें उत्तम असा जो कृष्ण त्याला. ५. नौका. ६. शब्दक्रीडा. ७. सत्वर. ८. मला. ९. स्नान. १०. 'खपशुगौळणि गोवळ सज्जन' असाहि पाठ आहे. ११. माझे जन. १२. पाणी. १३. प्राण. १४. गरुड आहे आसन ज्याचें त्यानें. १५. तुला शिक्षा करून. १६. भागवतांतरी दीड श्लोकीं असा भावार्थ. (श्लोक ६१-६२ पहा.) १७. लाभ. १८. स्नान. १९. जन्ममरणाला कारणभूत.

यांत जों तव [1]भुजंगमसेना [2]तीर्थरूपपण यास असेना, ।
भाव कीं धरि मनीं गमनातें, ये स्थळीं करि उदास मनातें. ॥ १०
लाभ [3]त्यास न बरा [4]उभयांचा धाक ज्यास [5]खगराजभयाचा, ।
कीं न्हदांतुनि भुजंग निघेना, तोंचि तो गरुडही छुड घेना. ॥ ११
[6]द्वीप जें [7]रमणक स्वकुळाचें स्थान थोर सकळा भुजगांचें, ।
त्या स्थळीं खवळुनी गरुडाला, सर्प या न्हदजळांत दडाला. ॥ १२
हे कथा शुक [8]पुढें नृपतीतें सांगणार, पुसतां नृप, [9]तीतें, ।
या न्हदींच खगराज [10]निघेना [11]नीर चंचुभरि येउनि घे ना. ॥ १३
दिशा [12]दहांही स्वतपें भरीतो, वसे जळीं या ऋषि [13]सौभरी तो; ।
खगेंद्र एकेसमयीं भुकेला, आहार या [14]नीरचरींच केला. ॥ १४
'नको' म्हणे सौभरि सर्वथा, रे ! तें भक्षिल्यावांचुनि तो न [15]थांरे, ।
तों बोलिला सौभरि ऐक राया ! त्या प्राणियांलागिं सुखी कराया. ॥ १५
'[16]खगेंद्र या ऊपरि हा तटाकीं, येऊनियां यावरि हात टाकी, ।
मरेल तत्काळ पुनः न वांचे, हें बोलतों [17]मी निजसत्य वाचे.' ॥ १६
गोष्टि हे समजली गरुडाला, तो भिऊनि अतिशीघ्र उडाला, ।
सर्प त्यास खवळूनि दडाला, [18]यांजळीं स्थळ न अन्य [19]जडाला. ॥ १७
त्रास हा हरितसे भुजगाचा, मायबाप हरि सर्व जगाचा, ।
कीं [20]खगेंद्रभय तूज असेना, जाइं घेउनि भुजंगमसेना. ॥ १८
भुजंगातें दे तो [21]वरद वर जो सर्वहि जगा,
म्हणे ज्याच्या त्रासें निजरमणक द्वीप भुजगा, ।
स्वयें तूं टाकूनी न्हद धरुनियां यांत असती,
न [22]तो पक्षी भक्षी तुज सहजही जेथ वससी. ॥ १९

१. सर्पसमूह. २. तीर्थासारखें. ३. सर्पास. ४. बाहेर पडण्याचा किंवा आंत रहाण्याचा. ५. गरुडभयाचा. ६. बेट. ७. रमणक नामक बेटांत पूर्वी सर्पांची वसति होती व येथेंच कालिय नाग राहत असे. ८. दशम स्कंध-सतराव्या अध्यायांत. ९. कथा. १०. जाईना. ११. उदक. १२. ज्याच्या तपस्तेजानें दहा दिशा प्रकाशित होतात असा सौभरि नामक ऋषि. १३. अध्याय १७ श्लोक ९ पहा. १४. पाण्यांतील प्राण्यांचे ठायीं. १५. राही. १६. हें सौभरीचें वचन. (अध्याय १७ श्लोक ११.) १७. सौभरि. १८. 'तैं वदे हरिच त्याच जडाला' असाही पाठ आहे. १९. जडस्वरूपी सर्पीला. २०. गरुडापासून भय. २१. वर देणारा. (कृष्ण). २२. गरुड.

भय तुझें हरिलेंच समस्त कीं, चरण म्यां दिधले तव मस्तकीं, ।
सकळ सर्पकुळां जरि दापितो, गरुड खाय कदापि तुतें न तो. ॥ २०
भयनिवारण हा वर लाधला, पदरजें परमार्थहि साधला, ।
भुजग आणिखि नागिणि बायका अजित पूजिति तें, अजि! आयका. ॥२१
म्हणे शुक प्राण जना मृतातें मानूनि तैसें वचनामृतातें, ।
त्या नागिणी नाग निरंजनातें नमूनियां मांडिति पूजनातें. ॥ २२
गंधा फुला अंबरभूषणांतें अर्पूनियां त्या व्रजभूषणातें, ।
पुसोनियां श्रीकरुणांबुधीतें, भुजंग गेला अजि! अंबुधीतें. ॥ २३
जेव्हां प्रयाणाप्रति सिद्ध झाला, वंदूनियां श्रीगरुडध्वजाला, ।
प्रदक्षिणा त्या खलशिक्षणातें करूनि गेला कमलेक्षणातें. ॥ २४
स्त्रिया लेंकरें सोयिरे साप सारे, बहूकाळ डोहांत ज्याचे पसारे, ।
सवें चालिले काळियाच्या समुद्रा, मुकुंदांघ्रिपद्में शिरीं ज्यास मुद्रा. ॥२५
भुजंगासवें नीचही सर्पजाती नदींतूनि पाण्यामधूनीच जाती, ।
विषाचीं कुळें चालिलीं क्षिप्र संगें, भुजंगेंद्र सर्वांस लक्षि प्रसंगें. ॥ २६
जाती जळीं भार भुजंगमाचे, संहारकर्ते स्थिरजंगमाचे; ।
सर्पाविणें ज्यांत दुजें दिसेना कीं त्याचिया स्त्रीतेंनयादिसेना. ॥ २७
भुजंग स्वयें सर्वही एकजाती भुजंगाधिपालागिं वेष्टूनि जाती, ।
'भुजंगप्रयातां'त या श्लोकवृत्तीं गणाची जसी एकजाती प्रवृत्ती. ॥ २८
असी चालतां स्त्रीकुमारादि सेना, विषाचा नदीमाजि मारा दिसेना. ।
त्यजी काम तो निस्पृही तेंवि झाली महावासना आगि तेही विझाली. ॥२९
काढितांचि खलसाप रमेशें ते नदी अमृत त्या परमेशें ।
ठेविली करुनि कौतुकवाणी, तें नृपाप्रति वदे शुकवाणी. ॥ ३०

---

१. भय नाहींसें करणार असा. २. श्वास. ३. मायारहित (कृष्णातें). ४. वस्त्रालंकारातें. ५. कृष्णातें. ६. करुणेचा सागर अशा कृष्णातें. ७. दुष्टांस शिक्षा लावणाऱ्यातें. ८. कमलनेत्रातें (कृष्णातें). ९. संसार, प्रपंच. १०. पुत्र. ११. एकजात. १२. श्लोकांत एक वृत्त (छंद) आहे. यांत चार यगण असतात. या वृत्ताचें लक्षण:—'भुजंगप्रयातं भवेद्यैश्चतुर्भिः.' भुजंग (साप) प्रयाण (प्रयात) करूं लागले म्हणून हें वृत्त भुजंगप्रयात नामक वृत्तांत (छंदांत) वर्णिलें आहे. १३. सर्व गण एकजातीय असतात. १४. 'स्पृहा सूटतां निस्पृहातें विझाली' असाही पाठ आहे. १५. इच्छारहित, श्वासनारहित. १६. महावासनारूप अग्नि. १७. रमापतीनें.

सुटे स्पर्शतां प्राण ज्या जीवनातें[1] समीरें करी भस्म ज्या जीवनातें[2], ।
करी त्याच नीरें जगज्जीवनातें[3] स्मरा हो! स्मरा त्या जगज्जीवनातें[4]. ॥ ३१
दिसे सौम्य[5] गेले महाव्याळ[6] जीचे[7], अहो! स्पर्शतां पाय गोपाळजीचे, ।
विषाचे विझाले जळीं क्षिप्र ताप, त्रिलोकेशपादांबुजांचे[8] प्रताप. ॥ ३२
होती विषें पूर्ण यमानुजा[9] तें, संतप्त जीचें जल भानुजा[10] ते ।
झाली नदी दिव्य सुधारसाची, कृपा हरीच्या पदसारसांची[11]. ॥ ३३
उष्णरश्मितनया[12] नियमाची, जे सहोदरबहीण[13] यमाची, ।
दुष्टसंगहि युगें[14] भुजगाचा, उद्धरी तिसहि नाथ जगाचा. ॥ ३४
होता भुजंगें ह्रद[15]उष्ण जीचा, नखेंदु[16] लागे तिस कृष्णजीचा[17], ।
तो होय तत्काळ सुधेसमान, ह्रदें जयां या वसुधेस[18] मान. ॥ ३५
'हरिविलाससुधारस'[19] नाम हा परम तारक सर्व जना महा, ।
विषजलास सुधारसकारका[20], नमन हें भवसागरतारका. ॥ ३६
शोधिली[21] रविसुता[22] परमेशें, नाशिले सकळ ताप रमेशें; ।
क्रोधकाम दवडी स्वजनाचे, काळियावरि जसा हरि नाचे. ॥ ३७
हरिकथारस नित्य नवा मना प्रियपदार्थ अनित्य[23] न वामना; ।
तरिच शोधुनि जीव नदीस तो, सतिस या जगजीवन दीसतो. ॥ ३८

---

## अध्याय नववा.

(श्लोक.)

करुनि शुद्ध अजी! ह्रदि नीर्हदादवडितांचि खळा अतिदुर्हृदा, ।
नदितटाप्रति ये व्रजनायक[24] व्रजजनां सकळां सुखदायक. ॥ १
प्राण ज्या निघति मानव देहीं, तो उठे खडबडूनि वदे ही. ।
येरिती उठति ते व्रजवासी धांवती धरुनि तीव्रजवासी[25]. ॥ २

---

१. उदकातें. २. प्राणातें, जीवितातें. ३. जगाचें संरक्षण. ४. कृष्णातें. ५. शांत. ६. मोठे साप. ७. यमुनेचे. ८. लोकत्रयाच्या स्वामीच्या पादकमलाचे. ९. यमाची बहिण. १०. सूर्याची कन्या. ११. पदकमलाची. १२. सूर्याची तनया. १३. सख्खी बहिण. १४. बहुकाळ असा अर्थ. १५. डोह. १६. नखचंद्र. १७. आदरार्थी 'जी' प्रत्यय लागून कृष्णजी, माधवजी, बायजी असे शब्द क्वचित् होतात. १८. पृथ्वीसारिखी शांत—असा अर्थ. १९. हें या विलासाचें नांव होय. २०. विषमय जलास अमृततुल्य करणारा. २१. शुद्ध केली. २२. यमुना. २३. अशाश्वत वस्तु. २४. कृष्ण. २५. वेगास.

कड्या[1]वरुनियां उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या,
गडे पैंजुप[2] भेटती तडतडां भुजीं आंगड्या[3]; ।
फुगोनि तनु फाटती मणगटीं कडीं दाटती,
सुखें अमित[4] वाटती विरहसिंधु[5] ते आटती. ॥ ३
जलजलोचनि[6] त्या व्रजकामिनी[7], जलदसुंदर[8] देखुनि भामिनी[9], ।
नयनिं पाहति तृप्ति नव्हे मना, अधिक वाढविती स्मरकामना[10]. ॥ ४
फुगति देखुनि सुंदरि[11] सुंदरा[12], गमतसे सुखरूप वसुंधरा, ।
तटतटी कुच कंचुकि फाटती, विरहसिंधु अशेषहि[13] आटती. ॥ ५
देखतां अनुज[14] तो अभिराम[15], क्षेम दे बहु बळें बळराम, ।
हांसतां[16] मुखसुधाकर[17] पाहे, नित्य नूतन मुकुंदकृपा हे. ॥ ६
हास्य देखुनि करी अनुजाला[18] भाव कीं मजचि शोक न झाला. ।
कीं मला अमित विक्रम[19] ठेवा[20], शोक कां मग मनांत करावा ? ॥ ७
नंद नंदनमुखा[21] अवलोकी, धन्य आपणचि मानवलोकीं, ।
भेटतां सकळ वीसरला ही! नंद घे श्रुति अगम्यहि लाहो[22]. ॥ ८
वर्णितां न अकळे निगमातें[23], मूर्ति वंदित असे मग मातें. ।
पोटिसीं दृढ धरीं घननीला सोडवे न हरि तो जननीला[24]. ॥ ९
स्तनयुगीं फुटला सहसा[25] रस, स्रवति[26] जीवनें[27] लोचनसारस[28]; ।
विसरली अजि! तूंपण मीपण, सुत सुखी अवलोकुनि आपण. ॥ १०
श्रीवत्सांका[29] श्रीयशोदा स्वअंकीं, घेतां प्रेमा मोजवे तो न अंकीं[30]. ।
म्याले गातां वृंदें[31] वेदश्रुतीचे, त्याच्या देहीं वर्षती अश्रु तीचे. ॥ ११
प्रेमयुक्त न असी जननीच, श्रीव्रजांत किं अजी! जन नीच, ।
भोंवतां व्रजवधूजनपाळा[32] ही असा शुक म्हणे जनपाळा[33]. ॥ १२

---

१. हें शब्दचित्र काव्यात्मक पद्य असून यांत अनुप्रासालंकार आहे. २. गचळी. ३. आंगवीं. ४. अगणित. ५. कृष्णाचा विरह--वियोग हाच सिंधु (सागर) तो एकदम शुष्क झाला. ६. कमल-नेत्रा. ७. गोपवधू. ८. मेघासारखा सुंदर वर्ण ज्याचा तो. ९. स्त्रिया. (कोपशील स्त्री=भामिनी.) १०. मदनचेष्टा. ११. सुंदर बायका. १२. मनोरम (कृष्णास.) १३. सर्व. १४. धाकटा भाऊ (कृष्ण.) १५. सुंदर. १६. अध्याय १७ श्लोक १६ पहा. १७. मुखचंद्र. १८. कृष्णाला. १९. पराक्रम. २०. ठाकक. २१. पुत्रमुखास (नंदन=पुत्र. 'नंदनं वासवोद्याने सुते ना हर्षके त्रिषु' इति रत्नमाला.) २२. लाभ. २३. वेदांतें. २४. यशोदेला. २५. एकाएकीं. २६. ढाळती. २७. पाणी (अध्याय १७ श्लोक १९). २८. नेत्रकमळें. २९. श्रीवत्सलांछनास. (कृष्णास.) ३०. अंकमोडणीनें या प्रेमाचें गणित करतां येत नाहीं. ३१. समुदाय. ३२. गोकुळांतील बायकांचा घेरा. ३३. राजाला.

वत्स धेनु वृषभांसह सारे, पाहतां हरिस त्या सहसा, रे! ।
अर्पिती नयनिं दृष्टि निघेना, तृप्ति लेश [1]मन मानुनि घेना. ॥ १३
आनंद झाला वृषवासुरांला, आनंद झाला गगनीं [2]सुरांला, ।
आनंद झाला [3]धरणीस भारी, स्पर्शे [4]पदाब्जें जिस [5]कैटभारी. ॥ १४
आनंदनाम स्मरतांच वाचे, आनंद गातां गुण माधवाचे, ।
आनंद हा नित्य नवा मनाचा, आनंद आत्मा प्रिय वामनाचा. ॥ १५
आनंद तो [6]दशशतानन ही न मोजी, आनंद दे व्रजजनांस तया, 'नमो जी!'।
'[7]आनंदनामकविलास' असा हरीचा, आनंद आवरण [8]वारणकेसरीचा. ॥ १६
[9]देहबुद्धि यमुनान्हृदयांत, क्षुब्धकालियमना हृदयांत, ।
[10]कामपन्नग न कंटक [11]थारे, हे स्मराल जरि कृष्णकथा रे! ॥ १७
[12]रति धरा हरिची बहु तीव्र जी, हरि असे तुमच्याच [13]मतिव्रजीं. ।
हरि रुचे स्मरतां बरवा मना, करि दया [14]कनकांबर वामना. ॥ १८
कलियुगीं जरि [15]कृष्णकथारती, तरि न हे [16]भवकंटक धारती. ।
जितचि मुक्तिपदीं तरि [17]थारसी, जरि मना रमसील कथारसीं. ॥ १९

---

## [18]वेणुसुधा.

### प्रसंग पहिला.

(श्लोक.)

[19]मधुरवेणुरवें मन [20]मोहरी मधुवनीं [21]मधुशत्रु नमो हरी ।
करुनि वंदन [22]तत्पदसारसा कथिन वेणुसुधारस आरसा ॥ १

---

१. मनाला लवभर सुद्धां तृप्ति वाटली नाहीं असें झालें नाहीं. २. देवांला. ३. पृथ्वीला. ४. चरणकमलानें. ५. कृष्ण. ६. शेष. (दशशत+आनन=हजार मुखें ज्यास तो.) ७. हें या विलासाचें नांव होय. ८. गजसिंहाचा. ९. हा देह माझा अशी बुद्धि. १०. काम हाच पन्नग (साप.) ११. राहणार नाहीं. १२. गोडी, सुख. १३. मनरूप गोकुळांत. १४. सुवर्णवल परिधान करणारा १५. कृष्णकथेची आवड. १६. भवदुःखाचे कांटे. १७. स्थिर होशील. १८. श्रीकृष्ण मधुवनामध्यें वेणु वाजवीत असतां, त्याचा अमृततुल्य मधुरध्वनि ऐकून सर्व स्थावर जंगम विश्व मोहित झालें. ही कथा या प्रकरणांत वामनपंडितांनीं वर्णिली आहे म्हणून याला 'वेणुसुधा' हें अभिप्रेतार्थदर्शक नांव दिलें आहे. वेणूचा मधुर रव ऐकतांच सकल गोपांगना आपापला कामधंदा टाकून कृष्णाच्या अनेक लीला आठवून त्याच्या गुणांचें वर्णन करून प्रेमप्रोत्साहित अशा याजकडे धांवत गेल्या. नंतर कृष्णानें त्यांच्या सहवर्तमान रासक्रीडेस आरंभ केला. ही कथा श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाच्या २१ व्या अध्यायांत आहे. या काव्याचे तीन भाग कल्पून प्रत्येक भागास 'प्रसंग' असें नांव पंडितांनीं दिलें आहे. १९. गोड पांव्याच्या शब्दानें. २०. मोही. २१. मधुदैत्याचा शत्रु. २२. त्याच्या पादकमलाला. (सारस=कमळ.)

वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी, व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थैरारी, ।
तया वर्णिती प्राण ठेवूनि कंठीं वॅधूवृंद तो संकटें दीन कंठी ॥ २
अंग वक्र अधरीं धरि पांवा, गोपवेष हरि तोचि जपावा, ।
वामबाहुवरि गालहि डावा, तो ठसा स्वहृदयांत पडावा. ॥ ३
वेणु जेंवि अधरीं स्वरंध्रीं अंगुली स्मरति गोपपुरंध्री, ।
कोमळा सुचपळा अतिलंबा सेतही स्वररसा अविलंबा. ॥ ४
ऐसिये हरिचिये मुरलीनें, कामतत्पर मनें स्मरलीनें, ।
मोहिलीं सहवधूत्रिदशांचीं आमुचीं न नवलें सुदृशांचीं. ॥ ५
गायनीं अमर जे अभिमानी आणि देवललना स्वविमानीं, ।
त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी मोहिलें म्हणति या व्रजनारी. ॥ ६
वेणुध्वनी तो सुरगायकांनीं त्यांच्या विमानांतहि बायकांनीं, ।
आश्चर्य कानीं पडतांचि केलें, न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें. ॥ ७
स्मरशरें विकळा सुरकामिनी गैलितनीविहि नेणति भामिनी, ।
हरिस देखुनि त्या, अधरामृतां त्वरित इच्छिति, त्याविण ज्या मृता. ॥ ८

---

१. मुरदैत्याचा अरि (शत्रु) २. कांपूं लागे. ३. गोपिकांचा समुदाय. ४. घालवी. ५. मुरली. ६. स्वरूप. ७. भोंक. ८. स्त्रिया. ९. सात स्वर आहेत: 'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवता: । पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिता: स्वरा: ॥' (अमरकोश.) 'षड्जं रौति मयूरस्तु गावो नर्दन्ति चर्षभम् । अजाविभे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम् । पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम् । अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजर: ॥' १ नि–निषाद–हा शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि–ऋषभ–हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग–गांधार–हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा–षड्ज–हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन् । षड्भ्य: संजायते यस्मात्तस्मात्षड्ज इति स्मृत: ॥' नाक, कंठ, उर, तालु, जिव्हा आणि दांत या सहा स्थानापासून होणारा तो षड्ज.] ५. म–मध्यम–हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध–धैवत– हा शब्द अश्वाचा, याचें ललाटस्थान; ७ प–पंचम–हा शब्द कोकिळाचा–याचें कंठस्थान वसंतकाळांत. [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु उर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. १०. मदनासक्त. ११. स्त्रियांसह देवांचीं मनें मोहिलीं मग आमचीं मनें मोहिलीं यांत नवल काय? १२. चांगल्या आहेत दृष्टि ज्यांच्या अशा. १३. देव, गंधर्व. १४. देवांगना. १५. दैत्याच्या समूहाचे शत्रु देव. [दैत्य+जन+अरी]. १६. गंधर्वीनीं. १७. कामबाणानें. १८. आर्त, पीडित. १९. गळलेली नीवि (वस्त्रग्रंथि) २०. स्त्रिया (अध्याय २१ श्लोक १२.) २१. त्या कृष्णावांचून ज्या स्त्रिया मे-ल्याप्रमाणें होत.

कितीकी अशा बोलती गोपदारा[1], दुज्या गोपिका वर्णिती त्या उदारा, ।
महाथोर आश्चर्य हें आयका या[2] असें प्रार्थिती आणिखी बायका या[3]. ॥ ९
आयका नवल हें अबला हो! कीं स्थिरा[4] घनिं विजा प्रबळा हो! ।
हार येरिति मुकुंदउरीं वो! देखतां न उरतीच उरी[5] वो. ॥ १०
वास ज्यांतचि रमारमणीचा श्याम ऊर वरि हार मणीचा[6], ।
वेणुगान समयांत हरी तो, डोलतां जनमनास हरीतो. ॥ ११
अधरिं वेणु धरी जइं तो हरी विरहिणीजनचित्तहि मोहरी[7]; ।
व्रजवधूंसि खुणा व्रजराज तो मुरलिमाजि वदोनि विराजतो[8]. ॥ १२
करूनी वियोगें मुखें दीनवाणी, बसे तों विनोदें रमाकांतवाणी[9] ।
अकस्मात त्या वेणुनें कर्णरंध्रीं निघे, सौख्य तात्काळ पावे पुरंध्री[10] ॥ १३
क्षण असें सुख पावति मागती[11] त्वरित तें अधरामृत मागती[12], ।
जसजसा ध्वनि गोड गमे मना, तसि तसी उपजे स्मरकामना[13]. ॥ १४
मोहती व्रजपशू[14] मृगगाई, आमुचें नवल काय अगाई ? ।
स्तब्ध होति लिखितें जसि चित्रें, वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें. ॥ १५
ज्यांसि न स्मरण हृत्सदनांत[15] ग्रास वो न गिळिती वदनांत; ।
निद्रितेंचि अथवा लिहिलीं हो! चित्रिचीं न गमती[16] पहिलीं, हो! ॥ १६
मातृस्तनींचा रस[17] आननांत[18] तों होय वेणुध्वनि काननांत[19], ।
गळे गिळेना पय[20] बासुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें[21]. ॥ १७
उचलुनि श्रवण[22] श्रवणामृता पशु पिती रस जीवन तो मृता, ।
जवळि दूरहि वृंदें[23] असा असे, मधुवनीं हरि जेथ उभा असे. ॥ १८
चरित्रें करी आणिखीही हरी तो, स्वलीलारसें[24] जो अविद्या[25] हरीतो; ।
स्त्रिया वर्णिती आणिखी एक लीला, तिला आयका नाशिते जे कलीला[26]. ॥ १९

---

१. स्त्रिया. २. इकडे या आणि ऐका. ३. स्त्रिया. ४. मेघावर विद्युल्लता जशा स्थिर रहाव्या. ५. भान. ६. कौस्तुभमण्याचा. ७. मोहित करी. ८. शोभतो. ९. कृष्णाची वाणी. १०. गोपवधू. [पुरंध्री=पतिपुत्रवती स्त्री.] ११. पुनः. १२. याच्ना करिती. १३. मदनेच्छा, कामवासना. १४. गोकुळांतील पशू. १५. हृदयरूप गृहांत. १६. वेणुरवानें गोकुळांतील पशूंची अवस्था अशी झाली कीं ते निद्रित आहेत किंवा चित्रित आहेत असें पाहतां ते निद्रित नसून चित्रासारखे आहेत असें मनाला भासे. १७. दुग्ध. १८. मुखांत. १९. अरण्यांत. २०. दुग्ध. २१. देवांतें. २२. कान (उभारून). २३. जवळच्या आणि दूरच्या पशुगणांची अशी स्थिति झाली. २४. आपल्या क्रीडेच्या यागानें. २५. अज्ञान. २६. पापाला, कलहाला [**कलिः** स्त्री कलिकायां ना शूराजिकलहे युगे–इति मेदिनी; **कलिर्बिभीतके** शूरे विवादेऽन्त्ययुगे युधि' इति हैमः]

मल्लवेष रचिला [2]अभिराम, श्रीधरप्रभुसवें बलराम, ।
मोर[3]पत्रमुकुटीं तरुपत्रें नेत्र सुंदर जसीं [4]शतपत्रें. ॥ २०
[5]सये! असा म्यां हरि देखिला, गे! तो [6]प्रेमरंगीं मनिं रेखि[7]ला गे. ! ।
पाचारितो वेणुरवेंचि गाई, आश्चर्य तेव्हां करितों, अगाई ! ॥ २१
गो[8]धनीं बहु पुढें न [9]वजावें, ठाव एकचि धरूनि थि[10]जावें, ।
वाजवी म्हणुनि जो निज पांवा, कृष्ण तोचि हृदयांत जपावा. ॥ २२
पशु जसे ध्वनिनें स्थिर राहती, तशि जळें न नद्यांतील वाहती; ।
व्रजवधू सम होति [11]नैया सये ! [12]सुकृत अल्प विकल्प न यांस ये. ॥ २३
केलीं सुपुण्यें जरि गोपिकांहीं, झालीं अपूर्णेंचि तथापि [13]कांहीं ।
कां धन्य आम्ही व्रजअंगनांही तऱ्ही सदा श्रीहरिसंग नाहीं. ॥ २४
भुजा कांपती नित्य आलिंगनातें, न फावे तरी सर्वदा अंगनांतें, ।
जनाचा मनीं धाक वाटे जळाला, अवस्था दिसे हे नद्यांच्या जळाला.॥२५
हरिप्रेम आम्हां जसें [14]अंतरंगीं, नद्याचें तसें दीसते वो [15]तरंगीं, ।
भुजा कांपती त्याचि आलिंगनातें व्रजीं होय आम्हां जसें अंगनांतें. ॥ २६
आम्हांतही देखुनि कृष्णजीतें प्रेमें जळें लोचनिं येति जीतें ।
भयें जनाच्या वरिच्यावरी ते नेत्रींच नेत्रोद[16]कें आवरीते. ॥ २७
नद्यांतही स्तब्ध असेच पाणी, आम्हां तयांही सम चक्रपाणी, ।
स्वल्पें सुखें आमुचिया [17]अदृष्टीं तैशाचि याही दिसताति दृष्टीं. ॥ २८
होऊनि शीतळ सुगंध [18]समीर जातो कृष्णाकडे तरि [19]पदांबुजिच्या रजां तो, ।
आणू म्हणूनि उचंबळुनि भुजा [20]तरंगा ज्या प्रार्थिती पवन दाउनि [21]अंतरंगा. ॥२९
कथिति येरिति ज्या [22]व्रजनायका वदति त्यांस दुज्या [23]व्रजनायका, ।
म्हणति हें परिसा नवल [24]क्षण त्रिभुवनेश्वर [25]मानवलक्षण. ॥ ३०

---

१. 'स्वागता' वृत्त. याचें लक्षण:—स्वागतेति रनभाद्गुरुयुग्मम्. २. मनोहर, सुंदर. ३. मोरांचीं पिसें (अध्याय २१ श्लोक ५ पहा.) ४. कमलें. ५. हे सखि ! ६. प्रेमरूप रंगांनीं. ७. तस्बीर काढिली. ८. गाईनीं. (गो हेंच धन) गायींच्या समुदायांनीं. ९. न जावें. 'वजावें' हें रूप गमनार्थक 'व्रज' धातूपासून उत्पन्न झालें आहे. १०. थांबून रहावें. ११. नद्या. १२. पुण्य. १३. कांहीं पुण्यें अपूर्ण राहिलीं, यास्तव त्यांस हरिसंग नाहीं. १४. अंतःकरणांत. १५. लहरीमध्यें १६. अश्रु (आवरून धरते.) १७. दैवीं. १८. वायु. [संस्कृत ग्रंथकार वायु त्रिविध मानतात:—मंद, शीत, आणि सुगंध.] १९. चरण कमळाच्या. २०. नदीचे तरंग (लाटा) हेच तिचे भुज (अध्याय २१ श्लोक १५.) २१. मनांतील आशय. २२. कृष्णास. २३. गोकुळांतील बालका. २४. क्षणभर. २५. मनुष्यलक्षणयुक्त असा. (कृष्ण.)

सुर[1] सरस[2] हरीच्या वर्णिती विक्रमातें,
अनुचर चरणाचे गाति कीर्तिक्रमातें, ।
परमपुरुष **विष्णु** श्रीश[3] हा वाटला, गे !
स्मरत चरित त्याला मुक्तिची वाट लागे. ॥ ३१

वनीं हा असे पर्वतीं सर्व गाई, तईं देखिलीं कौतुकें वो अगाई; ।
दुरूनी करूनी कृपा चारितो वो, स्ववंशीरवें[4] त्यांसि पोचारितो[5] वो[6]. ॥ ३२
फळें[7] मोक्षकाम्यें, सुखें पुष्पजाती, असें वेदवेदांत वर्णूनि जाती; ।
फळें दोनिही **विष्णु** देणार साचा, तया दाखवी नाद वंशीरसाचा[8]. ॥ ३३
फळें दोनि[9] हीं जे स्थळीं देव दावी, तनू तेचि साकार त्याची वदावी; ।
असा **विष्णु** वृक्षांलतांमाजि पांवा अहो ! दाखवी तो गुरुत्वें जपावा.॥ ३४
स्वशब्देंचि जो व्यापकालागिं दावी, स्वयें **विष्णु**ची मूर्ति ते ही वदावी; ।
फुलांची फळांची पडे वृष्टि भारी लतावृक्षरूपें[10] दिसे **कैठभारी**. ॥ ३५
लतामाजि कांटे तरूमाजि पानें, उभे रोमें[11] ते वेणुपीयूषपानें[12]; ।
फळीं आणि पुष्पीं तयीं वृक्षभारीं सुखें त्यां दीसे त्यांत तो **कैठभारी**. ॥ ३६
वृक्षां लतांसहि घडे गुरुभाव[13] लोकीं; कीं **विष्णु** दाविति जनास कृपावलोकीं, ।
प्रेमें सुखें करिति **विष्णु**निरूपणातें श्रेष्ठत्व साधिति लतात्वतरूपणातें. ॥ ३७
मुखें वर्षती **विष्णु**नामामृतातें सुधा[14] पाजिती मृत्युलोकीं मृतातें[15]; ।
रसस्राव ऐशापरी गोड भारी, जसा संत शब्दामधें **कैठभारी**. ॥ ३८

---

## प्रसंग दुसरा.

(श्लोक.)

दिसे जेथवां[16] जे रितीनें जिलों[17], हो ! तसा घेतसे ते मनामाजि लोहो[18]; ।
कितेकी अशा आणिखी गोपदारा प्रकारांतरें वर्णिती त्या उदारा. ॥ १

---

१. देव. २. रसाळ. ३. श्री+ईश=लक्ष्मी+स्वामी. ४. आपल्या वंशीच्या (वेणूच्या, पांव्याच्या) ध्वनीनें. ५. बोलावतो. ६. अहो. पंडितांच्या काव्यांतील यमकें सदासर्वदां भिन्नार्थक असतात असा नियम नाहीं. ७. कर्मांचीं फळें मोक्ष, आणि सुखें हीं पुष्पें होत असें वेदांतग्रंथांत वर्णन आहे ८. वंशी+रसाचा=वेणु+शब्दाचा. ९. काम्य आणि मोक्ष अशीं फळें. १०. लता आणि वृक्ष यांच्या रूपें हरि दिसला. लतावृक्ष जसे पुष्पफळाची वृष्टि करतात, तसा हरि सुखरूप पुष्पें आणि मोक्ष-काम्यरूप फळें यांचा वर्षाव करूं लागला. ११. रोमांच (अध्याय २१ श्लोक ९.) १२. अमृततुल्य असा वेणुरव ऐकिल्यानें. १३. लता आणि वृक्ष यांस गुरुपण प्राप्त झालें कारण ते कृष्ण फलपुष्पप्रद आहे असें शिकवितात. १४. अमृत. १५. मृत झालेल्यास. १६. ज्या वेळेस. १७. ज्या गोपवधूला. १८. लाभ.

म्हणे एक, 'म्यां कृष्णजी देखिला गे! असा कीं ललाटीं टिळा रेखिला गे!।
पहातां पहातां पहावाच वाटे, रुते चित्त जाऊनि नेत्रींच वाटे. ॥ २
आपाद माळा प्रभु कृष्णजीची सुधा पिती षट्पद कृष्ण जीची; ।
प्रदक्षिणा ते अवघे तिला, हो! करूनि [10]गुंजारव वेति लीहो. ॥ ३
गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें, वेणुध्वनी मिसळिला मृदु वासुदेवें; ।
आपादकंठ वैनमाळ असी विराजे, ते सेविती मधुप होउनि देवराजे. ॥ ४
वेष हो! रचियले भ्रमरांचे, वृंद ते ऋषिवरांमरांचे; ।
यामिषें स्तविति भक्तचि जाणा, सेविती हृदयसाक्षि सुजाणा. ॥ ५
त्यांस आदर करी अधरीं तो, वेणु ये रिति मुकुंद धरीतो, ।
कीं जया उठति षट्पदवाचा ते रिती रसहि वेणुरवाचा. ॥ ६
विमित्र त्या समयांतिल आयका, नवल कीं खग या व्रजनायका ।
भजति वेष्टुनियां अति वो! [21]रसें सुरस वेणुचियाच अवो! रसें. ॥ ७
वनीं राजहंसीं पिकांनीं शुकांनीं ध्वनी गोड तो आइकोनी सुकानीं, ।
त्वरें येउनी सेविलें श्रीहरीतें महापापही नाम ज्याचें हरीतें. ॥ ८
वदन लावुनि ते सकल क्षितीं नयन झांकुनि अन्य न लक्षिती; ।
स्थिर मनें करुनी स्थिर आसना करिति ते खग कृष्णउपासना. ॥ ९
त्या खगीं क्षिति कितेक चीवर व्यापिली प्रभु मधें जिचा वरें, ।
भोंवते विहंग शोभते धरा, श्रीपतीसह मनांत ते धरा. ॥ १०

---

१. वामनपंडितांच्या काव्यांत यमकांतील शब्द सदासर्वदां भिन्नार्थक असतात असा नियम
नाहीं, याचें हें एक उदाहरण आहे. २. कपाळावर. ३. गंधाचा ठिका, केंसराचा टिकला. [तिळक=
ढिळा, टिकला.] ४. नेत्रांच्या द्वारानें चित्त त्याचे ठिकाणीं गुंततें. ५. पायघोळ. ६. वैजयंती.
७. (माळेंतील) अमृतरस. ८. भ्रमर. [ज्याला सहा पाय असतात तो षट्पद; षट् पदान्यस्य.]
९. काळे. (काळे भुंगे.) १०. गुणगुण शब्द. ११. मला. १२. कोमळ (ध्वनि.) १३. कृष्णाच्या
गळ्यांतील माळ. [पृष्ठ ३२२ टीप २१ पहा.] १४. भ्रमर. १५. देव भ्रमर झाले—असा भाव.
१६. समुदाय. १७. कृष्ण. १८. भ्रमरांचा शब्द. १९.ऐश्वर्य. २०. पक्षी. २१. प्रीतीनें, प्रेमानें.
२२.'राजहंसास्तु ते चंचुचरणैर्लोहितैः सिताः' इत्यमरः २३.कोकिलांनीं २४.कीरांनीं. २५. महापापें
पांच आहेत:—'ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः। महान्ति पातकान्याहुस्तत्संसर्गश्च पंचमम् ॥'
[मनुस्मृति—११-५५.] याचा अर्थ:—ब्रह्महत्या, सुरापान, ब्राह्मणाचें दहा मासे किंवा अधिक
सोनें चोरणें, गुरुपत्नीगमन हीं चार ४ यांशीं संसर्ग करणें हें एक अशीं पांच महापातकें होत
असें मन्वादिक म्हणतात. २६. जमिनीस तोंड लावून. २७.'कृष्णोपासना' असें पाहिजे. २८.भूमि
मोजण्याचें एक प्रमाण आहे. (चाहूर.) २९. स्वामी. ३०. पक्षी. ३१. पृथ्वी.

क्रीडे असें आणिक पूतनारी तें गाति अन्यारत पूत नारी, ।
कीं ते वदे तें पैरिसा सैया! हो ध्या एक चित्तेंचि रैसास या, हो! ॥ ११
दिव्यहार बरवेच तुरे हो! कृष्ण रामहि असे चतुरे! हो! ।
तेधवां गिरितटीं निज पांवा वाजवी हरि तसाचि जपावा. ॥ १२
स्वयें तुष्ट संतुष्टवी तो जगातें अँगातें नगातें मृगातें खगातें, ।
असें क्रीडतां काळ मध्यान्ह झाला, घनें देखिलें तों सख्या त्या अजाला. ॥ १३
धरुनि साउलिही वरि हर्षतो, हळुहळू घन गर्जत वर्षतो ।
नवविधा निज भक्तिहि दावितो, समगुणें स्वसखा हरि भावितो. ॥ १४
जगज्जीवन श्रीहरी आणि काळा करीतो जगीं जीवनाच्या सुकाळा; ।
असो. मेघही यानिमित्तें सखा हो, सुहृद्भाव ऐसा नसे आणिकां, हो ! ॥ १५
क्षणीं उष्ण लागे सख्या केशवातें म्हणूनि त्वरें येउनी लेश वातें; ।
मुकुंदावरी मेघ तो छत्र झाला, करी स्वात्मदेहार्पण श्रीअजाला. ॥ १६
करुनि सख्य निजात्मनिवेदना घन भजे पहिले मधुसूदना; ।
प्रगट दास्यहि त्याचि मिषें करी, धरि धण्यावरि साउलि लौकरी. ॥ १७
छत्रात्मता अर्पुनियां अजाला, धरूनियां साउलि दास झाला; ।
करूनिही स्वात्मनिवेदनातें, दास्यें भजे श्रीपुरुषोत्तमातें. ॥ १८
आणीक भक्तिरस जो शुक सूचवीतो त्यांच्या क्रमेंच नृपें घेत असे चवी तो; ।
कीं मंदमंद घन गर्जतसे नभीं हो! शंका धरूनि तरि काय म्हणून भीहो? १९
मेघध्वनी मुरलिहूनि विशेष होतो, तेव्हां घडे महदतिक्रम कीं अहो! तो. ।
शंका असी तरि उगा घन कां असेना? हे मंदगर्जननिमित्त असें दिसेना. ॥ २०
नभींहूनि तेव्हां असी गर्जना ही करी वृष्टि मौन्यें तरी वर्ज नाहीं, ।

---

१. कृष्ण. २. पवित्र स्त्री. ३. ऐका. ४. गडे. ५. आनंदाला. ६. माळा. ७. पर्वतांस, वृक्षांस, मृगांस आणि पक्ष्यांस. ८. मेघानें. ९. कृष्णाला. १०. नऊ प्रकारची भक्ति:—'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥'. ११. सारख्या स्वभावामुळें. (मेघ लोकांचा ताप दूर करतो तसा कृष्णही करतो–असा भाव. अध्याय २१ श्लोक १६ पहा.) १२. मेघ हा समानगुण हरि आहे तेव्हां तो माझा मित्र होय असें मानितो. १३. जगताच्या स्थितीला कारण. १४. उदकाच्या, जीविताच्या. १५. होय. १६. मित्रपणा. १७. वायूनें. (वाऱ्याच्या झुळकीच्या योगानें.) १८. छत्री (अध्याय २१ श्लोक १६.) १९. आपल्या मनाचें व देहाचें दान. (अर्पण=निवेदन=दान.) २०. जन्मरहित जो परमेश्वर त्याला. (कृष्णाला.) २१. सेवा. २२. स्वामीवर (कृष्णावर). २३. राजा परीक्षिति. २४. भय पावतो. २५. मोठा अपराध.

घडी एक वर्षे, घडी एक राहे, उगा कां नसे मेघ, [1]टीका करा हे.॥ २१
श्रवणभक्तिमधें घनराज तो करुनि कीर्तनभक्ति विराजतो; ।
स्वमनिं भाव असा शुक नेघुनी कुशळबुद्धिसि बोढुनि ने मुनी. ॥ २२
हळहळू घन गर्जतसे नभीं मुरलिहूनि चढेल म्हणोन भी; ।
श्रवणभक्ति अतिक्रम वर्जतो, करित कीर्तनही घन गर्जतो. ॥ २३
मिळोनि गातां प्रभुवेणुसंगें क्षणी चढे गर्जत त्या प्रसंगें; ।
शंका जरी यावरि हे वदावी, तथापि भक्तिद्वयभाव दावी. ॥ २४
पुढें होउनी एक जो गाय नाचे, तसे संगतीं गाति त्यां गायनाचे; ।
असा वेणु ऐकूनिही मेघ गातो, करी एकदां सर्वभक्ती अगा ! तो ॥ २५
[5]रंगांत एक हरिचे गुण गाय नाचे, [6]संगी तसेच गुण गातिहि गायनाचे, ।
ते साधिती श्रवणभक्तिहि गात सारे, बोले नृपास शुक मेघ अगा ! तसा रे ! २६
वेगळ्या नवहि भक्तिरसांचा एकदांचि करि आदर साचा; ।
कीर्तन श्रवणभक्तिहिमाजी सूचवी शुक मुनींद्रसमाजीं. ॥ २७
या गर्जती श्रवणभक्ति नवांचमाजी, श्रीव्यास [7]तत्सुतहि त्यां उभयां समा जी; ।
तेथें दिसे स्मरणभक्तिचि सूचना ही, कीं विस्मृतीस अशि हे पदवीच नाहीं.॥ २८
गोडी दिल्ही प्रतिरसासहि जीवनानें, भक्षूनि ते विविधही जन [8]जीवना ने, ।
भक्ति स्वयें रिति जिणें स्मृतिजीवनानें, तेही नवांत गणिली [9]जगजीवनानें. ॥ २९
हे सूचली श्रवणभक्तिहि मानवांत, श्रेष्ठत्व दाखवि जिचा महिमा [10]नवांत; ।
भूमीवरी पडति मेघ[11]तुषार कांहीं तें [12]पादसेवन गमेचि शुकादिकांहीं. ॥ ३०
म्हणे मुनी कीं [13]सुमनें करूनी वर्षे सख्यातें घन त्यावरूनी; ।
धूतो जलत्वें पद या प्रकारें केलीं तुषारें [14]सुमनानुकारें. ॥ ३१

---

१. व्याख्या. घन क्षणभर जलवृष्टि करतो आणि क्षणभर थांबतो ह्याची व्याख्या करा. तर त्याचें कारण इतकेंच कीं घन श्रवणभक्ति करीत असतांही कीर्तनभक्ति करतो. (पुढचे श्लोक २२-२३ पहा.) २. याचा 'ध्वनि' हा कर्ता अध्याहृत आहे. ३. आपल्या गर्जनेनें मुरलीचा शब्द लुप्त झाला असतां नवविधभक्तींपैकीं श्रवणभक्तीचें उल्लंघन होईल या भयानें तें न व्हावें म्हणून हळू-हळू शब्द करतो. ४. टाळतो. ५. आनंदलहरींत. ६. 'ऐकोनि गाति सह गायक गाय नाचे। तैशा रिती श्रवणभक्ति हि गात सारे ॥' असा ही पाठ आहे. ७. त्याचा पुत्र शुक. ७. उदकानें. ८. जीवितास, प्राणास. ९. कृष्णानें. १०. नवविध भक्तींत. ११. बारीक पाण्याचे थेंब (अध्याय २१ श्लोक १६ पहा.) १२. हा एक भक्तीचाच प्रकार आहे. १३. पुष्पें. १४. पुष्पांप्रमाणें मेघानें पाय धुऊन त्यावर तुषारवृष्टि केली हीच कृष्णाची पुष्पपूजा केली—असा भाव.

भूमि हे चरण माधवजीचे सृष्टिवृष्टिहि[1] पदें भव जीचे; ।
वर्षतां क्षितिवरी सुमनातें[2] पादसेवन घडे सुमनातें[3]. ॥ ३२

वर्षे[4] तुषार परि ते सुमनें शुकानें भावें अशा कथियलीं अतिकौतुकानें; ।
ते मूर्तिचे पदहि धूडनि अंबुदानें[5] पुष्पांजळी[6] मग दिल्ही निज अंबुदानें[7]. ॥ ३३

चरणिं तोयद[8] सेवि तसा पडे, निववितां तनु अर्चन सांपडे; ।
स्नपन[9] देत भजे कुसुमांजुळी सुमनशब्दि तसा महिमा जुळी. ॥ ३४

नमस्कार सर्वात्मभावें करीती, तळींही तया देव तो एकरीती ।
वरूनी घन स्तब्ध तो वंदनाची करी भक्ति नंदाचिया नंदनाची[10]. ॥ ३५

गीतेंतही[11] अर्जुन वंदनातें श्रीविश्वरूपा यदुनंदनातें, ।
मागें पुढेंही करि सव्यसाची[12] सख्या नमी तो घनही तसाची. ॥ ३६

मागें पुढें वंदन तूजपायीं, तूं सर्व वंदूं तुज सर्व ठायीं; ।
अनंत सामर्थ्य पराक्रमी तूं, सर्वोपटीं[13] जाणसि सर्व तंतू. ॥ ३७

---

## प्रसंग तिसरा.

(श्लोक.)

नवविधा[14] असि भक्ति घना घडे, भ्रमकवाडहि[15] जीस्तव ऊघडे; ।
भजति आणिक गौळणि वायका म्हणति अद्भुत हें तुम्हि आयका. ॥ १

स्थळीं स्थळीं गौळणि या रितीच्या कथा करीती कमळापतीच्या; ।
कोणी यशोदेस समीप होत्या निरोपिती [16]तीप्रतिही अहो! त्या. ॥ २

---

१. 'तुष्टिपुष्टिही पदीं भव जीचे' असा एक पाठ आहे. २. पुष्पातें. ३. चांगल्या मनाच्या पुरुषातें. ४. या तुषारवृष्टीस शुक पुष्पवृष्टि मानिता झाला. ५. मेघानें. ६. हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ७. जलदानानें. ८. मेघ. ९. स्नान. १०. मुलाची. (कृष्णाची.) ११. भगवद्गीतेंत. 'नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व । अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥' (अध्याय ११ श्लोक ४०.) याचा भावार्थ:—हे सर्वरूपा, तुझें बल अनंत, तुझा पराक्रम अनंत, सर्व जगताला व्यापून आहेस, यास्तव तुझें नांव सर्व, तुला समोरून नमस्कार, आणि मागून नमस्कार असो; तुला सर्व दिशांकडून नमस्कार असो. १२. अर्जुन. (पृष्ठ १२५, १५८, १६५ यांतील टीपा पहा.) १३. सकळ वस्त्रांमधें. १४. या नवविध भक्तीचें वर्णन 'दासबोधां'त सविस्तर आहे. (दशक ४ पहा.) १५. भ्रांतिरूप दरवाजा. १६. यशोदेप्रती.

यशोदे! तुझा पुत्र वंशस्वरांनीं[१] सुधा[२] ओष्ठिंची वर्षतो या स्वरानीं[३]; ।
तईं भोंवते मोहती देवजाती[४] जयांचीं मनें उन्मनत्वास[५] जाती. ॥ ३
कमलसंभव[६] आणिक शंकर त्रिदशनाथ[७] सर्व सुर किंकर[८], ।
म्हणति सर्वहि त्यास 'नमो हरी' करुनि मोहित जो मन मोहरी[९]. ॥ ४
कीं ताळकीं मंद असें कळेना, रागस्वराचें धरें[१०] आकळेना; ।
रसाच[११]मध्यें अवघे बुडाले, विचार ज्यांच्या मतिचे उडाले. ॥ ५
भरें रसाच्या अतिनम्र माना मूर्ती अशा सर्वहि वर्तमाना; ।
सभोंवते येरिति देवजाती नादामृता[१२]माजी बुडोनि जाती. ॥ ६
टाकूनि लज्जा स्थिति लोकरीती[१३] वार्ता यशोदेप्रति त्या करीती; ।
निर्लज्जतेनें व्रजगोपदारा आणीकही वर्णिति त्या उदारा. ॥ ७
पशुखुरीं बहु खिन्न वसुंधरा[१४], सुत तुझा अवलोकुनि ते धरा; ।
अधरिं वेणु धरी, श्रम तो हरी, वर्षतो[१५] रस तो तिस तो हरी. ॥ ८
सुत तुझा क्षितिचें[१६] कुशल क्षणें[१७] करि पदें ध्वजअंकुशलक्षणें[१८]; ।
चरण लावुनि वो! जलजा[१९] तसे गजगती[२०] जगतीवरि[२१] जातसे. ॥ ९
मुखीं वेणु ऐसा वनामाजि वागे, गमे सौख्य देतो क्षितीच्या जिवा, गे! ।
यशोदे असे लावितां तीस पाय, स्मरें[२२] आमुचा थोर केला अपाय. ॥ १०
जो असे रिति वनांत हरी तो भूमिचा श्रम अशेष[२३] हरीतो; ।
वाजवी मुरलि दैत्यजनारी[२४] त्या रसेंचि भुलल्या व्रजनारी. ॥ ११
अशामाजि वो! चालिलों काननातें[२५] विलासें पहाया मृगांकाननातें[२६] ।
यशोदे! दुरूनीच तूझ्या कुमारें मनें मोहिलीं व्यापिलीं जैं कुमारें[२७]. ॥ १२
तरुस्तब्ध[२८] नेणे जशा लोकरीती, तशा गोपिका भाव तेव्हां करीती; ।
शिरीं मोकळे केश, वस्त्रें गळालीं, मनें मोहिलीं येरिती वेगळालीं. ॥ १३

---

१. वेणुनादानें. २. अमृत. ३. आपल्या अरण्यांत. ४. देवलोक. ५. ज्या स्थितींत मनाचाही लय होतो अशा (उन्मनी) स्थितीस. ६. ब्रह्मदेव. ७. इंद्र. ८. चाकर. ९. मोही. १०. स्थान. ११. आनंदरस. १२. वेणुस्वराच्या अमृतामध्यें. १३. लौकिक आचार. १४. पृथ्वी. १५. वृष्टि करतो. १६. पृथ्वीचें. १७. क्षणामध्यें. १८. हें 'पदें' याचें विशेषण. १९. कमलासारखे. २०. मंदगामी. २१. पृथ्वीवर. २२. कामानें. २३. सकल. २४. कृष्ण. [दैत्य+जन+अरी=दैत्य+समूह+शत्रु.] २५. अरण्यातें. २६. चंद्रवदन अशा कृष्णातें. (मृगांक=चंद्र.) २७. कु+मारें=दुष्ट+मदनानें. २८. वृक्षाप्रमाणें स्तब्ध झालेल्या गोपी.

दुरुनि[1]हो व्रजनाथनिरीक्षणीं गलित होउनि जाय [2]निरी [3]क्षणीं; ।
मन [4]पुरे पवनीं चळतां सरे शिथिल होउनि अंबर नी[5]सरे. ॥ १४
ऐशाच आणीकहि गोपदारा लीला हरीच्या वदती उदारा; ।
कीं भोजितो नंदकुमार गाई आश्चर्य तेव्हां करि बो! अगाई! ॥ १५
देव ज्यास म्हणताति '[6]नमो जी' तो वनांत हरि गो[7]धन भोजी; ।
[8]कंधरीं तुळसिहार करीतो, घेउनी गणित कृष्ण करी तो. ॥ १६
प्रिय [9]अनुचर गौळी धन्य खांदा तयांचा
तदुपरि भुज बो! या मुक्तिच्या [10]दें तयाचा; ।
धरुनि तुळसिमाळा दूसरा बाहु भारी,
[11]व्रजपशुगणनेला कैटभारी उभारी. ॥ १७
असा गोधनें भोजितो आणि गातो, करीतो सुखी वेणुनादें जगा तो; ।
अशाही विलासांत आश्चर्य दावी [12]मृगी मोहिल्या गोष्टि तेही वदावी. ॥ १८
व्रजवधूसम हो हरिणी हरी करि मनें मुरलीध्वनि जो हरी; ।
[13]वसति त्या धरुनी प्रभुसंगती पतिसुतादिसुखांत न रंगती. ॥ १९
वाटे न [14]ज्यांला [15]मृगकृष्ण नाथ स्वस्वामि हा मानिति कृष्णनाथ; ।
या कृष्णजीच्या [16]गृहिणी गणाया लेखा स्वसाम्यें हरिणी गणा या. ॥ २०
व्रजयुवति [17]गृहाशेपासुनी नित्य मुक्ता
फिरति धरुनि चित्तीं जेंवि या [18]निर्मुक्ता; ।
रुचि तशि न [12]मृगीला या मृगांकाननाची
तनु नयनिं पहाति [19]श्रीमृगांकाननाची. ॥ २१
हरिसमीपचि केवळ राहती [20]पंरिसतीं मुरली मुख पाहती; ।
व्रजवधूसम पावलि या गती, मग तसें अधरामृत [21]मागती. ॥ २२

१. अवलोकनीं. २. वस्त्रग्रंथि. ३. क्षणांत. ४. वस्त्र. ५. निसटून जाई. ६. नमस्कार असो. ७. गायींचा समुदाय. ८. कंठाचे ठायीं, गळ्यांत. ९. सेवक. १०. मोक्षप्रद कृष्णाचा. ११. गोकुळांतील पशु मोजण्यासाठीं. १२. हरिणी. (अध्याय २१ श्लोक ११.) १३. 'अवळि त्यांहि अशा पदसारसा अवळि ज्या न गमे मृगसारसा' असाही पाठ आहे. १४. हरिणीला. १५. पति. १६. स्त्रिया. १७. प्रपंचाच्या आशेपासून. १८. कृष्णाला. (जो कधींही बंधन पावत नाहीं त्याला.) १९. कृष्णाची. २०. 'मुरलि वाजवितां मुख पाहती' असाही पाठ आहे. २१. मागतात, मागून घेतात.

यशोदेपुढें आणिखी गोपदारा अशा वर्णिती कृष्णलीला उदारा; ।
म्हणे, 'निर्मिले दिव्य जे [1]दाम [2]कुंदीं यशोदे ! बहू शोभती ते मुकुंदीं.॥ २३
हार शोभति गळां व्रजपाळा, भोंवतां [3]पशुपगोव्रजपाळा; ।
वेणु गोड अधरीं स्वकरीं तो कौतुकेंच यमुनेंत करीतो. ॥ २४
म्हणति गौळणि, 'वत्स तुझा हरी व्रजवधूजनचित्त अवो ! [4]हरी; ।
मुरलिमाजि विनोदकळा करी म्हणतसे सुख देइन लोकरी'. ॥ २५
भिउं नका म्हणतो तुम्हि कामिनी दिवस जाउनि पातलि [5]यामिनी, ।
करिन जें अति इष्ट तुम्हा असे करि विनोदहि वेणुमध्यें असे. ॥ २६
असा उभा हो यमुनातटाकीं विनोदवाणी मुरलींत टाकी, ।
[6]समीर तेव्हां मलयाद्रिवासी हळू हळू सेवित माधवासि. ॥ २७
उभें भोंवतें [7]वृंद [8]वृंदारकांचें गळां हार वो ! [9]कुंदमंदारकांचे, ।
असे वेष्टुनि पूजिती सर्व देव दिसे हा स्वयें त्यांत देवाधिदेव. ॥ २८
असा गोधनाच्या श्रमातें हरीतो, कराया सुखी आमुतेंही हरी तो, ।
करीती नमस्कार तों वृद्ध वाटे तयां देखतां दुःख आम्हांस वाटे. ॥ २९
गोंविती [10]जठर नंदनंदना टोणपे पडति आड वंदना; ।
शीघ्र सोडिति तयाशि वाट ते, गोष्टि हे विषसमान वाटते. ॥ ३०
त्वरा यावयाची तुझ्या [11]नंदनातें न मानीच हो ! इष्ट त्या वंदनातें; ।
यशोदे ! असें वर्म त्यांला कळेना, मनोभाव वृद्धां तयां आकळेना. ॥ ३१
वनीं सेविती वृद्ध [12]पद्मासनादी व्रजीं चालतां वंदिती तो अनादी; ।
असा लागतां वेळ येतां उदारा व्रजीं [13]अंगुळ्या मोडिती गोपदारा. ॥ ३२
अशा संकटें पावतां गोकुळातें सुखें दे समूहा [14]वियोगाकुळातें; ।
तयावीण जो रोग नेत्रीं हरी तो [15]स्वसंदर्शनाच्या सुधेनें हरीतो. ॥ ३३
खुरांचा धुळोरा मुखीं आणि [16]हारीं व्रजीं येतसे कृष्ण ऐशा [17]विहारीं, ।
[18]दिनांतीं असा धेनुवृंदांत वाटे [19]शशी देवकीगर्भसंभूत वाटे. ॥ ३४

---

१. माळा. २. कुंदपुष्पांनीं. ३. गवळी आणि गोसमूह यांचा वेढा (पाळा). ४. हरण करी. ५. रात्री. ६. वायु. ७. समूह. ८. देवांचें. ९. कुंद आणि मंदार या पुष्पांचे. १०. वृद्ध. ११. पुत्रातें. १२. ब्रह्मदेवादि. १३. बोटें; अंगुळ्या मोडणें=बोट मोडणें=ईर्ष्यादि कारणामुळें कोणेकास उद्देशून अंगुलिभंग करणें. १४. विरहानें व्याकुळ झालेल्यातें. १५. आपल्या दर्शनामृतानें. १६. माळेवर. १७. क्रीडेनें. १८. सायंकाळीं. १९. चंद्र.

मंद[1]विघूर्णित वो नयनांचळ[2] व्रजवधूवरि ते करि चंचळ; ।
शशि[3] चकोरकुळीं सुख देतसे, विविध मान वधूंप्रति दे तसे, ॥ ३५
कुंडलें[4] जडित दीप्ति फांकली दाविती दिनमणीस[5] वांकुली[6]; ।
धूळिधूपितहि गंड[7]मंडळीं स्वप्रभा मिरवली मुकुंडलीं. ॥ ३६
यदुपति दिवसांतीं येरिती पातला[8] गे,
गजपति[9]गति येतां गोड चित्तांत लागे, ।
मुदित[10]वदन साजे ये जसा चंद्रमा, गे!
सुखकर पण ज्याला व्योमिंचा[11] चंद्र मागे. ॥ ३७
खगोधनें लक्षित[12] ये हरी तो दुःखें दिगंतींहुनिही हरीतो; ।
गाई सुखी येरितिनें करीतो देणार आम्हां सुख लौकरी तो. ॥ ३८
प्रतिदिनीं दिवसा व्रजनायका[13] स्मरति येरितिनें व्रजनायका[14]; ।
रमति त्याचसवें प्रतियामिनीं[15] हरिविणा क्षण नेणति कामिनी[16]. ॥ ३९
निशी[17] कृष्णध्यानीं प्रियविषयनिष्ठा[18] दिवस तो,
निजे रात्रीं जागा जडजन दिनीं त्या न वसतो; ।
हरीचे जे दास क्रमिति हरि गाऊनि दिसें[19] ते,
तिये रात्रीं ध्याती तरि असिच गोपींस दिसते. ॥ ४०
व्रजांत जो जागृत लोक सारा जों या कथा वर्णिति लोक सारा, ।
कृष्णांगसंगार्थ[20] निघोनि जाया या सिद्ध तों ते डुलती निजाया. ॥ ४१
अहा! भाग्यवंता महा गोपदारा, अशा गाति या कृष्णलीला उदारा, ।
असा बोलिला श्रीशुकाचार्य राया कथा या त्रिलोकांसही उद्धराया. ॥ ४२
वामनाननमिषें[21] वसुधेतें[22] धन्य कृष्ण करि 'वेणुसुधे[23]'तें; ।
वर्णनीयगुण वर्णुनि लोकीं तो कृतार्थ रस जो अवलोकीं. ॥ ४३

---

१. मदानें फिरणारे. २. नयनप्रांत. ३. चकोरपक्षी चंद्रकरामृतपान करून निर्वाह करतात—असा कविसमय आहे. ४. कर्णभूषणें. ५. सूर्याला. ६. वेडावून दाखविती. ७. गळप्रदेशीं. ८. आला. ९. हत्तीच्या गतीनें. १०. आनंदयुक्त. ११. आकाशांतील. १२. पाहत. १३. गोपिका. १४. कृष्णास. १५. प्रत्येक रात्रीस. १६. स्त्रिया. १७. रात्र. १८. भक्ति. १९. दिवस. २०. 'पावोनि सोयास मिळोनि जाया तो रात्रिंते होय तया निजाया' असाही पाठ आहे. २१. वामनपंडिताच्या मुखाच्या निमित्तानें. २२. पृथ्वीतें. २३. 'वेणुसुधा' हें आख्यान किंवा काव्य.

करी धन्य गोपाळजी [1]वामनातें [2]कथाछंद लावूनि त्याच्या मनातें; ।
महाभाग्य हें अन्यथा [3]काव्यरीती वृथा ज्या कवी लोकवार्ता करीती. ॥ ४४
हरिगुणामृत जींत पदोपदीं अशिहि '[4]वेणुसुधा' हरिच्या पदीं ।
रचुनि वंदुनि अर्पुनि वामनें धरियला हरि नित्य नवा [5]मनें. ॥ ४५

---

## [6]कात्यायनीव्रत.

(श्लोक.)

[7]जगपटव्यतिरेकमुखें हरी तदपि अन्वय दाउनि दे हरी ।
कथिन तोचि कथारस आरसा नमुनियां हरिच्या [8]पदसारसा. ॥ १
तनू गोकुळीं गोपिकासत्ववृत्ती हरीवीण अन्यत्र ज्यांला [9]निवृत्ती ।
तयाशींच त्या तन्मयत्वें रमाया व्रजीं पूजिली [10]ब्रह्मविद्यादिमाया. ॥ २
अशा दिव्य [11]अध्यात्मरूपें हरी तो करूनी कथा ते [12]अविद्या [13]हरीतो; ।
करी भक्तिची यावरी सूचना ही विना भक्ति विज्ञान कांहींच नाहीं. ॥ ३
मतीचे पती जे [14]अहंगोप होते, हरी देखतां होति निःसार हो ! ते. ।
दिसे ज्यांस आत्मा स्वयें कंसहंता, तयां कां रुचे कांतरूपें अहंता? ॥ ४
परब्रह्मविद्येसि जेव्हां भजावें तयीं द्वैतसंस्काररूपा त्यजावें; ।
विसंबों नये सर्वथा ब्रह्म[15]विद्या तरी बोध बिंबोनि नासे [12]अविद्या. ॥ ५

---

१. वामनकवीला. २. कथेचा नाद. ३. अन्य विषयावर काव्य रचणें हें व्यर्थ, हरिकथापर काव्य रचणें हें महाभाग्य. यावरून पंडितांस काव्यरचनेस योग्य विषय कोणता वाटत असे याचें दिग्दर्शन होतें. लौकिक विषयांवर काव्य रचणें त्यांस पसंत नव्हतें असे दिसतें. ४. 'वेणुसुधा' नामक कविता. ५. मनानें. ६. हें प्रकरण दशम स्कंध अध्याय २२ याच्या आधारें रचिलें आहे. गोपकन्यांनीं हविष्यान्न भक्षण करून, अरुणोदयीं उठून, यमुनेच्या उदकांत स्नान करून, तिच्या तीरावर कात्यायनी देवीची वालुकामय प्रतिमा करून, तिची गंधपुष्पफळधूपदीपादि उपचारांनीं पूजा करून आणि 'हे कात्यायनि! महामाये! कृष्ण मला पति मिळो' अशी नमस्कारपूर्वक प्रार्थना करून, कात्यायनीव्रत पाळिलें ही कथा यामध्यें आहे यास्तव या काव्यास 'कात्यायनीव्रत' असें म्हणतात. कालिंदीनदींत स्नान करणाऱ्या गोपकन्यांचीं तीरावरील वस्त्रें कृष्णानें अकस्मात् येऊन हरण केलीं अशी कथा यांत आहे म्हणून याला 'गोपीवस्त्रहरण' असेंही म्हणतात. गोपकन्या शरण आल्यावर कृष्णानें त्यांचीं वस्त्रें परत दिलीं. आणि 'तुम्ही जो उद्देश धरून हें कात्यायनीचें पूजनरूप व्रत केलें तो पुढें सफळ होईल' असें अभिवचन दिलें इत्यादि कथा या प्रकरणांत आहे. कात्यायनी=पार्वती, गौरी, उमा. ७. जगद्रूप पटाच्या ठायीं व्यतिरेकरूपें. ८. पदकमलास. ९. निःसंगत्व. १०. ज्ञानरूप आदिमाया. ११. ज्ञानानें. १२. अज्ञान. १३. नाशितो. १४. अहंकाररूपी. १५. ज्ञान.

आत्मता गुरुमुखें समजावी, बोधरीति हि अशी सम जावी; ।
चित्त चिन्मय[1] करी अशि विद्या सेवितांचि वितुळेचि अविद्या. ॥ ६
असा देखुनी कृष्ण आत्मा वधूंनीं[2] रमायासि त्याशीं अविद्या वधूनी[3], ।
तयाची तिहीं सेविली स्वैर[4] माया तदैक्यें तया श्रीहरीशीं रमाया. ॥ ७
विद्या हरीप्राप्तिस हेतु वाटे, ते सेवितां ताप तयां न वाटे; ।
न द्वैत जाळी मग काळजाला हेमंत तो वास्तव काळ जाला. ॥ ८
कृष्णानिमित्त भजतां हरिची सुविद्या तो काळ होउनि हरी[5] च हरी[6] अविद्या[7] ।
'मी मार्गशीर्ष'[8] म्हणुनी स्वमुखें वदे तो जो या कथारसिं असे रिति भाव देतो. ॥ ९
गीतेमध्यें पुरुष तोचि सहस्त्रशीर्षा[9], मासास आत्मपण दे प्रभु मार्गशीर्षा. ।
कीं हा फिटे विरहभेद तया च मासीं, द्वैतत्त्व दे पद तया पुरुषोत्तमासी.॥ १०
शुक्तीमधें[10] रजत[11] योग्य दिसे भजाया, मायेसि पूजिति हरींतचि गोपजाया, ।
कीं मार्गशीर्ष हरिरूप तयाचि मासीं पूजूनि तीस[12] रमल्या पुरुषोत्तमाशीं. ॥ ११
एवं हरीची हरिमाजि माया, त्या पूजिती या हरिशीं रमाया, ।
चित्तंतु तो वस्त्र जड[13]भ्रमातें हरूनि दे त्याच सुमध्यमातें[14]. ॥ १२
अध्यात्मरीतीं[15] च कथा वदावी म्हणोनि तो कृष्णचि भाव दावी, ।
परंतु साधारण माधवाची वाचा मुखें हो ! महिमा नवाची[16]. ॥ १३
यालागिं सर्वांस कथा कळाया श्रीव्यास विख्यात करी कळा या, ।
म्हणोनि दाऊनि रवी रसाचा बोले सुधास्वाद सुधारसाचा. ॥ १४
हेमंत शीतल ऋतू सकळां जनांसीं, श्रीमार्गशीर्ष पहिला हरिरूप मासीं, ।
मासांत त्यांत फळ दे प्रभुशक्ति माया पूजूनि तीसचि तदैक्यपणें रमाया. ॥ १५
म्हणोनि गोपी हरिशीं रमाया, आराधिती सर्व मिळोनि माया[17]; ।
हेमंत काळीं प्रथमींच मासीं क्रीडावया श्रीपुरुषोत्तमाशीं. ॥ १६

---

१. ज्ञानानंदमय. २. स्त्रियांनीं. ३. नाश करून. ४. यथेच्छ. ५. कृष्ण. ६. हरण करी. ७. अज्ञान. ८. 'मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः' (भगवद्गीता—अध्याय १० श्लोक ४५). याचें तात्पर्य:—मासांमध्यें मी मार्गशीर्ष मास, ऋतूंमध्यें मी वसंत. ९. हजार आहेत मस्तकें ज्यास असा विराट पुरुष. १०. शिंपी. ११. रुपें. शिंपीच्या ठायीं रुप्याचा भास होऊन अज्ञ पुरुष तें रुपें समजून घेतो त्याप्रमाणें गोपी हरीच्या ठिकाणीं मायेचा भास मानून तिला भजूं लागल्या—असा भावार्थ. १२. मायेला. माया ही कृष्णाची पत्नी, तेव्हां तिच्या अनुमोदनाशिवाय कृष्णाची प्राप्ति निर्विघ्नपणें व्हावयाची नाहीं म्हणून गोपींनीं इतर देवतांचें पूजन न करितां कृष्णपत्नीचें (मायादेवीचें) पूजन केलें आणि तद्वारा तिजपासून इष्टार्थ मागून घेतला. (भक्तिरसायन.) १३. जड पदार्थ जें वस्त्र त्यांत तंतुरूपानें असणारा ईश्वर. १४. सुंदर स्त्रियांतें. १५. ज्ञानमार्गानें. १६. नूतन. १७. हरिपत्नी.

त्यजुनि अन्न हविष्यचि[1] भक्षिती निजति गोमयलिप्त[2] शुभक्षिती; ।
नियम आणिक सर्वहि रक्षिती फळपणें[3] हृदयीं हरि लक्षिती. ॥ १७

उषःकाळीं[4] स्नानें करिति येजिती[5] श्रीभगवती[6],
नदीतीरीं जेव्हां किरण अरुणाचे[7] उगवती; ।
करूनी देवीची सुतनु[8] सिकतामूर्ति[9] जपती
तिच्या मंत्रातें कीं व्रजपसुत[10] हा हो निजपती. ॥ १८

तटीं कालिंदीच्या प्रति दिवस मासव्रतधरा[11]
करीती श्रीपूजा स्मरति फळरूपें गिरिधरा[12], ।
पहातां ही माया फळ परम चिद्रूप गवसे
अलंकारीं नाना निज घनपणें हेमचि[13] वसे. ॥ १९

फळाचे आशेनें स्मरत असतो तेंवि भलता,
अनायासें कृष्णस्मृति पसरली ते शुभ लता[14], ।
हरी ध्याती गाती स्मरति युवती त्यास सकळा,
स्त्रियांचे या लागीं व्रत सफळ झालें अविकळा[15]. ॥ २०

सफळ कर्म करी हरिची स्मृती[16] 'हरि हरी' म्हणतां म्हणते स्मृती[17], ।
परि तयास हि सद्य 'नमो[18] हरी' जरि म्हणे हरिचें मन मोहरी[19].॥ २१

स्मृति मनीं, हरिनाम मुखीं परी, नमन सत्य घडे न तद्रूपरी, ।
म्हणुनि वंदुनि घेउनि अंबरें[20] हरुनि ही दिधलीं कनकांबरें[21]. ॥ २२

कर्मार्पणाचा क्रम सांग[22] जाला, तैं लाधल्या त्या पशुपांगजाला[23]. ।
अध्यात्मरीती हरि पावला हो! ध्यावा असा यावरि भाव लाहो[24]. ॥ २३

अन्यदेव तनु[25] ही जरि पूजी सर्वही सुर सुरारिरिपू[26] जी ।
कीं समस्त नगही[27] कनकाचे[28] देवदेह विधिच्या[29] जनकाचे[30]. ॥ २४

---

१. यज्ञास योग्य असें अन्न. २. गाईच्या शेणानें सारवलेल्या जमिनीवर. (गोमय=गोपुरीष; 'गोविट् गोमयमस्त्रियाम्'.) ३. व्रताच्या फळाकडे म्हणजे कृष्णसंगलाभाकडे लक्ष लावून. ४. प्रातः-काळीं. ५. पूजिती. ६. कात्यायनी देवी. (अध्याय २२ श्लोक १-२ पहा.) ७. सूर्यसारथ्याचे. ८. सुंदर (गोपकन्या.) ९. वाळूची प्रतिमा. १०. व्रजाचा (गोकुळाचा) पालक जो नंद त्याचा सुत (कृष्ण.) हा आपला पति होवो अशा मंत्रातें जपती. ११. एक महिना व्रत करणाऱ्या. १२. गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्या कृष्णास. १३. सोनें. १४. लतेप्रमाणें स्मृति पसरली. १५. संपूर्ण. १६. स्मरण. १७. मन्वादिकांनीं केलेलें शास्त्र. १८. नमस्कार. १९. मोहविणारें. २०. वस्त्रें. २१. कृष्णानें. २२. यथासांग, परिपूर्ण. २३. नंदाच्या मुलाला. २४. प्राप्त होवो. २५. मूर्ति. २६. दैत्यारि, विष्णु. २७. अलंकार. २८. सोन्याचे. २९. ब्रह्मदेव. ३०. बाप.

परंतु जीं जीं अवतारसत्वें देती फळें स्वात्म सुधारसत्वें, ।
ब्रह्मादिही या सुरराज साचा विलास जो राजसतामसाचा. ॥ २५

म्हणउनि पद गा ते मस्तकार्हत्व नाहीं,
श्रुतिशिरसुख कैंचें श्रीमुकुंदाविना हीं; ।
जरि सकळ फळें तो देव गीतेंत वर्णी
परि पद नग साजे जेंवि शोभा सुवर्णी. ॥ २६

जो सर्वरूप हरि आपण पूज्य झाला, लागे समस्त फळदत्वहि त्या अजाला ।
शोभे जसें चरणभूषणही सुवर्णें तें शोभतें कनक आपुलिया सुवर्णें ॥ २७

परि पदीं पदमात्रचि शोभवी, कनक येरिति कामुक जे भवी, ।
इतर आप्त फळें इतराकृती हरिस सेवुनि घेति न जे कृती. ॥ २८

एवं हरी इतर दैवतकल्पकांहीं, देतो फळें तदनुरूपचि अल्प कांहीं; ।
तों गोपिका फळहि मानुनि देवराया भाग्योदयें भजति त्या प्रभुतें वराया.॥२९

फळमिसेंचि असा करि जो पण, प्रभुचि तो फळ केवळ आपण, ।
म्हणवुनी स्वतनू फळरूपिणी स्ववर दे मतिही स्वनिरूपणीं. ॥ ३०

कात्यायनीपूजन बायकांचें तें अर्चन श्रीव्रजनायकाचें; ।
तत्रापि त्यांचें फळ हाचि जाला, जपोनियां मागति त्या अजाला. ॥ ३१

ज्यांचा असे विदित अंतरभाव याला, आला स्वयें वरद तो वर द्यावयाला; ।
जों भजनें करिति त्या यमुनेंत नारी तों ये कितिक गोडि घेउनि पूतनारी. ३२

प्रतिदिनीं उदकांत दिगंबरा निघति पोंहति ठेवुनि अंबरा, ।
हरि अशा समयीं चरमे दिनीं करित ये पदपावन मेदिनी. ॥ ३३

हरी आला ऐशी खुण विदित नाहीं निपट ते;
अशा काळीं तीरीं प्रभु उचलि येऊनि पट ते; ।
कदंबाच्या स्कंधीं कपटपटतंतूचि हरि तो
चढे तो मिथ्यत्वें प्रथम जड वस्त्रेंचि हरितो. ॥ ३४

अनात्मत्व वस्त्रें पहिलें हरीतो, दावूनि चित्तंतुस दे हरी तो, ।
म्हणोनि शाखेवरि आपणातें, दावूनि त्यांसी करि या पणातें. ॥ ३५

१. अमृत. २. 'परि चरणनगातें मस्तकार्हत्व नाहीं' असा पाठभेद आहे. ३. वेदांत सुख. ४. 'पितळपदिं न साजे' असा एक पाठ आहे. ५. भूषण. ६. सोनें. ७. रंग. ८. संसारी. ९. पूजन. १०. श्रीकृष्णाचें. ११. जन्मरहित अशा कृष्णाला. १२. मनांतील भाव. १३. वर देणारा. १४. स्नानें. १५. नग्न. [दिग्=दिशा आहे अंबर ज्याचें तो.] १६. वस्त्रा. १७. चरम=शेवटचा. १८. पायानें पवित्र. १९. पृथ्वी. २०. स्पष्ट. २१. वस्त्र. २२. माया.

देखोनि हांसति गडी प्रभु माधवाचे, त्यांतें वदे हरि सहास्य अगाध[1] वाचे; ।
कीं अंबरें तरि च देइन गोपदारा तीरीं जरी म्हणति कीं 'अजि! दे उदारा[2]! ॥
जळीं खेळतां पोंहतां बायकांनीं असा शब्द हा ऐकिलासे स्वकानीं, ।
फिरोनी पहातांचि त्या स्त्रीकदंबीं[3] हरी देखिला वक्रदृष्टी कदंबीं[4]. ॥ ३७
प्रपंचद्रुमाचीच शाखा अहंता, चिदात्मा दिसे ये रिती कंसहंता, ।
फिरोनी द्रुमीं[5] लक्षितां दृष्टिवृत्ती जडत्याग तो होय शाखानिवृत्ती. ॥ ३८
जड पट निरसीतो श्रीगुरु श्रीहरी तो,
उघडचि मग तंतू जो अविद्या[6] हरीतो; ।
हरितनु[7] हरिवस्त्रें ज्ञानतंतू प्रभा ते,
निरखित उफराटे दृष्टिनें सुप्रभाते[8]. ॥ ३९
स्वहृदयांत अखंडचि रेखिला, वस्त्रपटहारक[9] तो हरि देखिला; ।
बसति येउनियां उथळा जळीं, विनविती प्रभुलागिं कृतांजळी[10]. ॥ ४०
बैसोनियां कंठजळांत[11] नारी, त्या कांपती प्रार्थिति पूतनारी, ।
सामोपचारें व्रजगोपदारा, आधीं असें बोलति त्या उदारा. ॥ ४१
कीं योग्यता[12] ज्याकरितां व्रजाला[13], जाणो तया तूज अधोक्षजाला[14]; ।
भला कसा सत्वर अंबरांतें[15], द्या जी, दयासिंधु[16]! दिगंबरांतें[17]. ॥ ४२
भला नंद हा, कीर्ति लोकांत साची, भला[18] पुत्र त्याचा तूंही तसाची ।
जळीं बैसलों तीव्र दे शीत[19] कंपा, तयां अंबरें दे अजी! सानुकंपा[20]! ॥ ४३
गोष्टीस प्रत्युत्तर ही वदेना, सामें[21] स्ववस्त्रें व्रजराज[22] देना, ।
तों दान[23] आरंभिति गोपजाया, मिसें तया मन्मथकोप[24] जाया. ॥ ४४
करिशिल जशि आज्ञा तूं तसें अंग नाचे,
करुं तुज वश ऐसे देह हे अंगनांचे[25]; ।
गृहिणि[26] हि परि होऊं सुंदरा क्षिप्र[27] दासी,
तुज तनु हि समर्पूं सर्वसौख्यप्रदासी. ॥ ४५

---

१. गंभीर. २. हे उदारा कृष्णा! वसनें दे असें म्हणतील तर. ३. स्त्रीसमूहानें. ४. वृक्षविशेषावर. ५. वृक्ष. ६. अज्ञान. ७. शरीर. ८. प्रातःकाळीं. ९. आपलीं वसनें हरणकर्ता. १०. हात जोडून. ११. जेथें कंठापर्यंत पाणी आहे अशा स्थळीं. १२. योग्यता. १३. गोकुळ. १४. कृष्ण. १५. वस्त्रें. १६. दयासागर. १७. नग्न. १८. 'तयाचा भला पुत्र तूंही तसाची' असें असतें तर छंदोभंग झाला नसता. १९. थंडी. २०. हे सकृपा. २१. साम, दान, भेद व दंड यांपैकीं एक. सामोपचारानें, सख्यानें. २२. गोकुळस्वामी. २३. दुसरा उपाय—दान. २४. प्रीतिक्रोध. २५. स्त्रियांचे. २६. गृहिणी साध्वी. २७. लौकर.

मदनपाशबळें हि न आंवळे[1], हरि नदान परी वचना वळे; ।
निमिषें[2] विस्मित होउनि राहती, मतिस भेद[3] करूं मग पाहती.॥ ४६
म्हणति धर्म समस्त हि जाणतां, न करि येरिति पाप सुजाणता[4], ।
करुनि सार विचार करीं बरा, त्वरित दे वसनें[5] कनकांबरा[6] ! ॥ ४७
मतिस भेद करोनिहि पाहिला, गण[7] म्हणे न उगा हरि राहिला, ।
मग चतुर्थ[8] उपाय हि दाविती, भिडनि देइल हें मनिं भाविती. ॥ ४८
चारी उपाय कथिले, कथिले चि सारे, आत्मार्पणाविण वळेल हरी कसा रे? ।
दानांत ते घडतसे तनुसंपदा ते अर्पूं म्हणोनि म्हणती हरिच्या पदातें. ॥ ४९
अंबरें[9] अजि न कां पर देशी, काय तूज गमतों परदेशी[10]; ।
हा तुझा निववुं दंडक[11] राया, जो समर्थ खळदंड[12] कराया. ॥ ५०
आत्मार्पणेंचि हरिचे फळतील पाय, कीं भक्ति हे परि तिहीं गणिला उपाय; ।
अंगीकरी प्रभु न यास्तव त्या क्रमानें, जोडे कधीं न हरि अन्य पराक्रमानें. ॥
परंतु त्यांची कनकांगदानें[13], न मान्य केलीं कनकांगदानें[14], ।
वाटे हरी फार उदार त्यांला, हें दुःख जाणे बहुधा सत्यांला[15]. ॥ ५२
रतिसुखविषयीं त्या सर्व जाल्या निरास[16],
व्रत फळ पण नाहीं वाटला तो निरास[17] ।
म्हणुनिच हरि योजी त्यांस त्याचि प्रसंगीं
निजसुखअभिलाषीं[18] घातल्या क्षिप्रें[19] संगीं. ॥ ५३
म्हणे, 'दासी होतां, वचन जरि माझें करितसा,
करा जो मी स्वामी विधि[20] वदतसे लौकरि तसा; ।
न बैसावें नीरीं[21] मजजवळीं येऊनि बरवें,
म्हणावें 'दे वस्त्रें' निज हसितवक्त्रें[22] शुभ रवें[23]'. ॥ ५४
हरिवचन असें जों त्यांचिया जाय कानीं,
व्रत सफल तिहीं तें मानिलें बायकांनीं; ।
म्हणति भलतसें हो! बोळला अंगदानें,
तदुचित रचिला हो! यत्न रत्नांगदानें[24]. ॥ ५५

१. न आकळे. २. अल्पकाळीं. ३. सामादिकापैकीं एक (फितुरी). ४. शहाणा. ५. वस्त्रें. ६. हे पीतांबरधारी कृष्णा. ७. स्त्रीसमुदाय. ८. चवथा उपाय–दंड. ९. वस्त्रें. १०. निराश्रित. ११. बाहु. १२. दुष्टाला शिक्षा. १३. सुवर्णांगअर्पण. १४. सुवर्णाचीं बाहुभूषणें धारण करणाऱ्यानें. १५. स्त्रियांस. १६. आशारहित. १७. नाश. १८. इच्छा. १९. सत्वर. २०. प्रकार. २१. पाण्यांत. २२. हास्ययुक्त मुख. २३. शब्द. २४. रत्नांची अंगदें धारण करणाऱ्यानें.

निवाल्या कालिंदी[1]मधुनि सकळा इंदुवदना[2]
करद्वंद्वें[3] गोपी लपवुनि उभ्या कामसदना[4]; ।
पुढें एकी एकी प्रति ढकलिती आणि लपती,
नदीतीरीं ऐशा तरुवरि[5] उभा गोकुळपती. ॥ ५६
तरुस्कंधीं[6] वस्त्रें सित[7] हरित[8] आरक्त[9] असितें[10]
अनेकां[11] रंगांचीं परि सकळ तंतूंचि असितें; ।
कदंबाचे शाखेवरि नवघन[12]श्यामल[13] हरी
वधूवृंदीं[14] दृष्टी पसरि करुणासिंधु[15]लहरी[16]. ॥ ५७
कृपापांगें[17] प्रीत प्रभु बहुत जाला परि हरी
स्थळें जीं कामाचीं करयुगुळ[18] देखे तदुपरी, ।
क्रिया कामस्थानीं भजनविषयीं लाज दवडी
जसा कामी भक्त प्रभुवर तसें त्यास निवडी. ॥ ५८
क्रिया सर्व हाते असे दोनि हात स्वकामस्थळीं हें असें तो पहात, ।
सकामा जरी सेवितां लाज नाहीं, नसे वश्य ऐशा स्वभक्तां जनांही. ॥ ५९
द्यावा निजांग[19]सुखलाभ वधूजनातें ऐशी कृपा उपजली भवभंजनातें[20], ।
तों आड कामसदना[21]वरि दोनि पाणी ते काढिल्याविण न दे वर चक्रपाणी[22]. ६०
परंतु गीतेंत[23] रथांगपाणी[24] करि प्रतिज्ञा उचलोनि पाणी[25], ।
कीं भक्त माझा न वंजाय[26] वांया हें सत्य पार्थी वद मानवा या. ॥ ६१
दुराचारी भारी भजन जरि माझें करितसे
कृपेनें तो माझ्या त्यजित गुण ही लौकरि तसे ।
स्ववाणी गीता हे निजबिरिदें[27] सांभाळित असे,
'न झांकावें हस्तीं स्मरगृह[28]' वदे शब्दचि असे. ॥ ६२

---

१. यमुना नदी. २. चंद्रमुखी. ३. दोन हातांनीं. ४. योनि. ५. कदंबाच्या वृक्षावर. ६. फांदी. ७. पांढरें. ८. पिवळें. ९. तांबडें. १०. काळें. ११. 'निजस्कंधीं कांहीं वदन मिरवे मंद हसितें' असा पाठभेद आहे. १२. मेघ. १३. सांवळा. १४. स्त्रीसमूह. १५. समुद्र. १६. लाटा. १७. दयायुक्त कटाक्ष (अपांग). 'कृपापांगें' असा अन्य पाठ आहे. १८. दोन हात. १९. आपल्या शरीरसुखाचा लाभ. २०. संसारांतक. (कृष्ण.) २१. योनि, भग. २२. पृष्ठ ३१७ टीप ३ पहा. २३. भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक ३१ पहा. 'क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति । कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥' याचा भावार्थ:—त्याची बुद्धि धर्माकडे त्वरित लागते आणि त्याला शाश्वत शांति प्राप्त होते. हे कौंतेया, पक्केपणें समज कीं, माझा भक्त कधींही नाश पावत नाहीं. २४. चक्र. २५. हात. २६. आगें. २७. बिरुद. २८. मदनगृह.

कामालयावरुनि काढुनि दोन्हि पाणी कृष्णाकडे करिति कीं, 'अजि चक्रपाणी ! ।
दे अंबरें' म्हणुनि मागति गोपदारा हें युक्तिनेंचि करणें पडिलें उदारा. ॥ ६३

म्हणे केलें देवीव्रत तुम्हि विचारूनिच परी,
विवस्त्र स्नानें या मलिनपण जालें तदुपरी; ।
तया प्रक्षाळाया मज निजकरद्वंद्वनमनें
करा, ऐशा शब्दीं हरि हरि जगन्मोहन मनें. ॥ ६४

व्रताच्या फळीं ठेविला प्राण सारा, जयां इच्छिती मुक्त ही सर्व सांरा, ।
स्वयें तोचि हे गोष्टि ही बोलताहे, गमे निष्फळास क्रियेची लता हे. ॥६५

अंगहीन म्हणतांचि निरास भाव हा धरुनियां करि आस ।
प्राण न त्यजुनि मानव देहा तो कृपाब्धि निज मान वदे हा. ॥ ६६

अशा शब्दबाणें निघों प्राण पाहे परी स्तंभनीं हेतु जाली कृपा हे ।
म्हणे, 'शीघ्र वंदा मला' यावरूनी, फळाशा बळें राहिल्या सांवरूनी. ॥६७

केले नमस्कार परंतु कांहीं लज्जा तिहीं रक्षिलि बायकांहीं, ।
कीं कामगेहावरि एक पाणी एका करें वंदिति चक्रपाणी. ॥ ६८

एके करें वंदिति त्या अंजाला कामस्थळें कामहि वास जाला, ।
परंतु कामावरि एक हात हाही हरी तोचि असे पहात. ॥ ६९

त्यजुनिहि फळवांछा काम्य कर्मे करीती,
प्रिय हरिस नव्हे ते सर्वथा लोक रीती. ।
सकळफळद कर्मत्याग संन्यास साचा
म्हणुनि उमज होतो या कथेच्या रसाचा. ॥ ७०

कामालयाउपरि ठेउनि एक पाणी एका त्यजूनि नमिला प्रभु चक्रपाणी. ।
जो काम्य कर्म करि आणि मनीं अकाम, मानी तसे व्रजवधूजन पूर्णकाम. ॥७१

असोनि हीं काम्य नदीतटाकीं त्या कामना जो निज भक्त टाकी ।
तो अर्ध संन्यास हरीच सारा करी हरी काम्य पथा असारा. ॥ ७२

कर्में स्वसक्त करितो परि काम नाहीं, ते टाकवे हरि नसे जरि कामना ही; ।
याच्यागिं कामसदनावरि एक पाणी तोही तयांकडुनि काढवि चक्रपाणी. ॥७३

---

१. हात. २. वस्त्रें. ३. क्रिया. ४. विचारपूर्वक. ५. नग्न. ६. आपल्या दोन हातांनीं नमस्कार. ७. कृष्ण. ८. हरण करी. ९. मोक्षास गेलेले. १०. कृष्ण. (ईश्वर.) ११. प्रतिबंध. १२. ईश्वर. (कृष्ण.) १३. हात. १४. निष्काम. १५. कृष्ण. १६. मार्ग. १७. निःसार. १८. इच्छा.

म्हणे प्रायश्चित्त स्वविहित विचारें न घडलें,
दुजें या दोषाचें परिहरणही आड पडलें. ।
गुरूतें देवातें नमन करि एका जरि करें,
तयाचा छेदावा कर म्हणति धर्मज्ञ निकरें. ॥ ७४
परी प्रायश्चित्तें स्वपदनमनीं सर्व घडती,
फळप्राप्तिद्वारें त्वरित अवघीं ही न घडती; ।
म्हणे श्रीकांता त्या मज करयुगें वंदन करा,
मग प्रेमें मागा, वदतिच खुणा वस्त्रनिकरा. ॥ ७५
स्वहित मानुनियां व्रजभामिनी करयुगें नमिती गजगामिनी, ।
उचलुनी भुज, मागति अंबरा, पसरुनी करयुग्म दिगंबरा. ॥ ७६
एकि येउनि पुढें स्वदुकूला मागती जसि महा अनुकूला ।
जें तितें इतर अंबर दावी, गोष्टि ते सरस काय वदावी? ॥ ७७
वनीं गोपिकांतें हरी चाळवीतो, तिचें वस्त्र नेदी दुजें दाखवीतो, ।
हरीतें म्हणे गोपिका सारसाक्षी, तुझे हातिचें पैल तें सर्वसाक्षी.॥ ७८
कौतुकें अशिच सर्व करी तो, जो मुकुंद भवबंध हरीतो, ।
गोपिकांस दिधलें वसनातें हर्षयुक्त करितो वश नातें. ॥ ७९
नेसोनि वस्त्रें मग गोपदारा तीरीं उभ्या पाहति त्या उदारा, ।
तेव्हांच त्या श्रीपतिशीं रमाया त्या दाविती नेत्रविकारमाया. ॥ ८०
इतुकियांत रवी तिहिं देखिला उगवतां, निजशत्रुच लेखिला. ।
करुनि अंगुलिभंग तयास त्या अति निखंदिति त्या समक्षीं सख्या. ॥ ८१
जो वियोग हरिशीं करि मित्रे त्यासि तो म्हणति सर्व अमित्र, ।
तत्व यांत इतुकें अवलोकी धन्य तोचि जन मानव लोकीं. ॥ ८२
रति न लाधलिया कुमुदेक्षणी, उगवला रवि ज्यास्तव ते क्षणीं ।
म्हणति मागति, 'योग कधीं घडे, स्वसुख दारवटा कइं ऊघडे.'॥ ८३

---

१. निरसन. २. जोरानें, लागलेंच. ३. माझ्या पायांच्या वंदनानें. ४. लक्ष्मीपति. ५. समूह. ६. स्त्रिया. ७. गजगती. ८. वस्त्र. ९. नग्न. १०. वस्त्र. ११. मलतेंच वस्त्र. १२. गोड. १३. कमलनेत्रा. (सारस=कमल, अक्ष=नयन.) १४. सर्वद्रष्टा. (ईश्वर, कृष्ण.) १५. संसारपाश. १६. नेत्रकटाक्ष. १७. मानिला. १८. बोटें मोडणें. १९. निंदिती. २०. सख्या=गोपकन्या. २१. सूर्य. २२. शत्रु. २३. कमलाक्षी. २४. दरवाजा.

कई घडेल अशी परमा गती म्हणुनि ये विषयीं वर मागती ।
परि मनांतचि तो हरि जाणतो सकळ साक्षि दयाळु सुजाण तो. ॥८४
भाव ही समजलाच हरी जो मुकुंद भवबंध हरीतो, ।
धन्य त्यांसि करितो वरदानें तैं असा वर दिला वरदानें. ॥ ८५
'भोगाल वेगें मज देवराया' गोपींस दामोदर दे वरा या, ।
दामोदरार्थी शुकभाव दावी ते व्यासवाणी रचना वदावी. ॥ ८६
दामोदरार्थी शुक भाव देतो कीं नावडे त्यासि मनें वदे तो, ।
कीं गोष्टि जेव्हां न रुचे मला हो! तनूंत दामोदर नांम लाहो. ॥ ८७
व्रज प्रेमबद्ध स्वपोटीं सदा मी यशोदा करी बद्ध ऐशास दामीं, ।
व्रजीं याचिया गोपिका स्त्री स्वभावें रतिप्रीतिनें रंगल्या सस्वभावें. ॥८८
'नेदूं कसा यांत हि मी वरातें' म्हणोनि वाटे कमळावरातें, ।
आतांचि भोगूं तरि हे पहांट ग्रामस्थ येतांचि भरेल हाट. ॥ ८९
म्हणोनियां लावुनि सैंध वाटे पुढें रमावें मनिं हेंचि वाटे, ।
या लागिं दामोदर हेचि वाणी बोले फळाची न करोनि वाणी. ॥९०
'व्रजा जा ये वेळे तुम्हि, सकळ सिद्धाच अबळा,
व्रताची हे चर्या त्वरित फळ देईल सबळा. ।
शरंद्रात्री येती, तरु फळति, नाशी शशि तमा,
रमाल श्यामा हो! तुम्हि भजसिं तेव्हां प्रियतमा.' ॥ ९१
प्रकाशी तो तीतें तरि तसिहि ते होय सबळा
निजानंदप्राप्ती पद निजवरें दे निजबळा ।
नव्हे माया वस्तु प्रकृति पुरुषावीण अबळा
व्रजस्त्रीतें तेथें म्हणुनि म्हणतो देव अबळा. ॥ ९२
'वृत्ती तुम्ही' हरि म्हणे 'अबळा असिद्धा सिद्धा तथापि मज आत्मपणें प्रसिद्धा,
सिद्धांत कीं अनुभवाल तुम्ही सुजाणा, जाणा मला भजति संत जया सुजाणा.' ९३
प्रवृत्ति प्रसंगांत दावी निवृत्ती तया माधवातें समर्पूनि वृत्ती, ।
कथा वर्णिली वामनें केशवाची, जगीं धन्य तो यांत जो लेश वाची. ९४

---

१. ब्राह्मणा. २. दावें. ३. लक्ष्मीपतीतें. ४. प्रभात. ५. गांवांतील लोक. ६. बाजार. ७. आतां. ८. मार्ग. ९. उणीव. १०. शरदृतूंतील रात्री. ११. चंद्र. १२. काळोख. १३. षोडशवार्षिकी स्त्रिया (तरुणी). १४. मनोवृत्ती. १५. अल्प.

## कात्यायनीव्रत (द्वितीय.)

(मत्तगयंद[1] वृत्त.)

श्रीमधुवंशपते ! मधुसूदन ! यादवनंदन ! ते[2] सुचरित्रं
त्वां [3]प्रणिपत्य रमाधरणीप्रियमं[4]बुजलोचनमं[5]बुदगात्रम् ।
ब्रह्मशिवादिसुरैर्यदि तर्क्यमहो चरितं तव देव ! पवित्रं
त्वत्कृपया करुणांबुनिधे ! तव [6]जातु वदामि चरित्रविचित्रम्. ॥ १
एकदिनीं व्रजगोपनि[7]तंबिनि जाउनियां यमुनेप्रति तीरीं,
ठेवुनि [8]अंबर न्हाति दि[9]गंबर होउनियां अतिशीतळ [10]नीरीं; ।
येउनियां हरि तीं वसनें [11]हारे [12]बंधे कदंबतरूवरि [13]शौरी,
देखुनियां[बहु]लाजलिया मनिं पाहति लोचनिं मे[14]घशरीरी. ॥ २
जोडुनि अंजलि बोलति मंजुल को[15]किलवैखरि गोकुलनारी,
'दे' म्हणती, 'लुगडीं उवडीं हरि ! बापुडिं कांपतसों बहु नीरीं, ।
तूं व्रजपाळकबाळक होउनि हे अनुवाळि करीशि मुरारी !
श्रीहरि ! चोरिहि थोरि नव्हे तुज, नागविया जळिं पाहसि पोरी.' ३
शीत जळें बहु व्याकुळ होउनि काकुळती करि गोकुळनारी,
लुगडिं त्यासि घडीघडि मागति ऊघडिया उदकांत कुमारी; ।
गोपनितंबिनिचीं वदनें जसिं पद्मवनें अति शोभति नीरीं,
ऊदकबिंदु [16]मरंद तयांवरि [17]षट्पद ते [18]कुटिलालक भारी. ॥ ४
'सूर्य [19]समीरजवें चढतां हरि ! चीर[20] दे होत उशीर मुकुंदा !
सासुरवाशिणि आम्हि सुवासिनि [21]शंकरराणि पुजूं सुखकंदा ! ।
सासु जशी घरिं [22]थीवसि दारुण, त्याहुनि गांजिति [23]लौसि नणंदा,
नेदिसि तूं वसनें तरि होइल या [24]व्यसनें हरि ! तूजहि निंदा.' ॥५

---

१. या वृत्ताचें लक्षण चिंतामणिकविकृत छंदविचारांत दिलें आहे:—'सात भगण गुरुजुगलजुत सो कहि मत्तगयंद'. याचा भावार्थ:—ज्याच्या प्रत्येक पादांत सात भगण आणि दोन गुरु अक्षरें असतात त्या वृत्ताला 'मत्तगयंद' म्हणावें. २. तुझें. ३. प्रणाम करून. ४. कमलनेत्रास. ५. मेघशरीरास. ६. कदाचित्. ७. स्त्रिया. ८. वस्त्रें. ९. नग्न. १०. पाण्यांत. ११. हरण करी. १२. चढे. १३. शूरसेनाचा पौत्र. १४. मेघश्याम. १५. कोकिळेसारखी वाणी. १६. पुष्परस. १७. भ्रमर. १८. कुरळे केश. १९. वायुवेगानें. २०. वस्त्र. २१. पार्वती. (कात्यायनी देवी.) २२. विनशी=अखीण. २३. मांजरी. २४. संकटानें.

'वंदुनि निंदुनि भोंदुनि यापरि या उपरी लुगडीं तुज मागों,
देसिल तूं तरि दासि तुझ्या, तुजपाशिं असों, चरणासिहि लागों.'।
ऐसें परोपरि वीनवि सुंदरि त्या करुणा करि ना किति सांगों?
आण न वाहे तुझी लटकी हरि! जाण तुझ्या बटकीपरि वागों. ॥६
ऐसें परोपरि बोलति सुंदरि एकट जाउनि तेथ मुरारी,
मोहित [1]पंचशरें रहती मग पाहति तल्लिन गोपकुमारी.।
देखुनियां उदयाद्रिवरी शशि ऊगवलीं कुमुदें जसिं नीरीं,
कृष्ण कदंबतरूवरि जीवनिं [2]उत्पललोचनि त्या व्रजनारी. ॥ ७
त्यांप्रति कृष्ण वदे, 'उदकांतुनि बाहिर या तुम्हि, देइन चीरें[3].'
आयकुनी म्हणती व्रजकामिनि, 'केलें निलाजिरें या यदुवीरें'.।
जाणुनियां हटवादि मुरारि करें कर झांकुनि कामशरीरें,
तीरिं निघोनि उभ्या युवती अति लाजति कांपति शीत [4]समीरें. ॥८
एकि करें [5]मदनालय झांकुनि, नेसुनि एकि [6]सरोरुहपानें,
ऊघडि एकि बसोनि रतीपतिमंदिर त्या लपवीत [7]ऊरुनें,।
एकिस एकि पुढें करुनी निजवंश शरीर [8]त्रपा अभिमानें,
तीरिं उभ्या व्रजगोपकुमारि तरी न करी हरि [9]अंबरदानें. ॥ ९
लोचन ऊर कपाळ अलौकिक आणिक सुंदर ही तनुयष्टी,
श्रीहरिची अतिसुंदर देखुनि कामिनिंची जडली दृढ दृष्टी.।
वाटतसे करिताति [10]नितंबिनि त्यावरि तो [11]नयनांबुजवृष्टी,
येणें मिसें तरि देइल अंबर मानुनि [12]सिंधुसुतापति [13]तुष्टी. ॥ १०
विव्हल पंचशरें तंव होउनि वीसरल्या वसनें व्रजनारी,
ऊर्ध्वमुखें करिं पाहति सुंदरि दृष्टि समर्पिलि कृष्णशरीरीं;।
जेथ पडे जिचि ते हुचडे मग चित्त रमें त जडे दृढ भारी,
वर्ण जसे न निघेत कदापि हि पुस्तकिं जें लिहिलें लिहिणारीं. ॥११
लुगडिं ही हरिलागिं न मागति, वीसरल्या निज सर्वहि धंदा,
हासुनि बोले विनोद मुकुंद तदा [14]व्रजगोपनितंबिनिवृंदा.।

---

१. मदनानें. २. कमळनेत्री. ३. वस्त्रें. ४. वायूनें. ५. कामालय. ६. कमलपत्रें. ७. मांडीनें. ८. लज्जा. ९. वस्त्रदानें. १०. स्त्रिया. ११. नेत्रकमळ. १२. लक्ष्मीपति. १३. संतोष, समाधान. १४. गोपकन्यांचा समूह.

'होउनि नागविया यमुनाजलिं [1]मज्जन केलें, अशा तुम्हि मंदा
ओंजळिया शिरिं दोहिं करें कर जोडुनि शीघ्र [2]दिवाकर वंदा.'॥ १२
बोलति त्या व्रजनारि परोपरि, 'आम्हुतें तूं छळितोसि मुरारी!
हेंहि करूं, परि या उपरी तरि पीडुं नको व्रजगोपकुमारी'. ।
जोडुनियां कर दोनि दिवाकर वंदिति [3]सूर्यसुताजलतीरीं,
जालें सुखी निज अंतरिं श्रीहरि देखुनि कामगृहें अतिगोरीं. ॥ १३
बोले हरि, 'तुम्हि जोडुनि अंजलि वेगळिं वेगळिं [4]अंबरें मागा,
येकलि येकलि या जवळी, निज लुगडियाचि बरी खुण सांगा; ।
देइन मी वसनें, मग सत्वर नेसुनि झांकुनि आत्मवरांगा,
पूजुनि पार्वति, जा सदनाप्रति निर्भय सर्व सुखी करिं नागा'. ॥ १४
गोपि [5]अनन्यगती अति होउनि जाणुनि श्रीहरिचा हठ भारी,
येकलि येकलि येउनि मागति [6]अंबर ऊर्ध्व करें [7]व्रजनारी; ।
पाहे न्यहाळुनि कृष्ण गिन्हाइकवृत्ति करूनि तयाचि शरीरीं,
हांसुनि दे वसनें यदुनंदन गोप [8]नितंबिनीचा सुखकारी. ॥ १५
कोणि म्हणे, 'हरि! दे चुनडी बरि'; एक ते मागतसे [9]दुरवानें,
सांगति गोपि कृशोदरि सुंदरि लुगडियांचिं अशीं [10]अभिधानें; ।
देउनि श्रीपति हांसति त्यांप्रति घेउनि त्या करिती परिधानें,
खोवजती युवती अति लाजति जाति घरा मग सौख्यसमानें. ॥ १६
ऐसें परोपरि नित्य कृशोदरि भूलवि अंतरि मेघशरीरी,
त्याच रिती श्रवणें करि श्रीहरि मुक्ति [11]मुमुक्षुसि कामहि तारी; ।
[12]अंबुजनेत्रचरित्र विचित्र पवित्र जनासि करी सुखकारी,
कृष्ण मुकुंद रमावरणीप्रिय वामनमानसहंस मुरारी. ॥ १७

---

१. स्नान. २. सूर्य. ३. यमुनातीरीं. ४. वस्त्रें, लुगडीं. ५. दुसरा उपाय नाहीं ज्यांस अशा. ६. वस्त्रें. ७. गोकुळांतील स्त्रिया. ८. स्त्रियेचा. ९. दोरवा. १०. नांवें. ११. मोक्षेच्छूस. १२. कमळनयन.

## यज्ञपत्न्याख्यान.

(श्लोक.)

सलज्जांची लज्जा हरि परिहरी आशु भजनीं,
असा गोपीवस्त्रें हरुनि विभु दावी शुभजनीं; ।
स्वभक्तां नारीही नर भजति त्याहूनिहि बरा
द्विजस्त्री प्रेमें हें स्फुट करिं नमो त्या यदुविरा. ॥ १
म्हणूनी गोपीचीं वरद वसनें जे दिनिं हरी,
द्विजस्त्रीभक्तीनें प्रगट दिवसीं त्या करि हरी; ।
स्वकांता ते विप्र स्तविति निजधिक्कार करिती,
कथाब्धी यामध्यें चतुर जन ते तत्व [11]मंथिती. ॥ २

---

१. एके दिवशीं श्रीकृष्ण परमात्मा बळरामासह वनांत आहे असें पाहून त्याचे पाठोपाठ गोपाळही वनांत गेले. परंतु त्यांनीं आपल्या शिदोऱ्या बरोबर नेल्या नव्हत्या. सबब त्यांस भूक लागतांच ते श्रीकृष्णाजवळ अन्न मागूं लागले. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला, 'येथें जवळच जो एक मोठा मंडप सिद्ध केला आहे, तेथें वेदपाठी ब्राह्मण स्वर्गप्राप्तीच्या इच्छेनें 'बृहस्पतिसत्र' या नांवाचा यज्ञ करीत आहेत. तेथें जा, आणि महासमर्थ बळरामाचें व माझें नांव सांगून अन्न मागा.' अशी श्रीकृष्णानें आज्ञा दिली. त्याप्रमाणें ते तेथें जाऊन अन्न मागूं लागले, व म्हणाले कीं, 'आम्हांस अन्न द्या, आम्हीं यज्ञदीक्षा घेतली आहे; आतां यज्ञांतील अन्न भक्षण केल असतां दोष लागेल अशी शंका घेण्याचें कारण नाहीं'. अशा प्रकारें त्यांनीं बरीच याचना केली. परंतु त्यांची तेथें दाद न लागल्यामुळें ते निराशेनें परत आले व त्यांनीं सर्व प्रकार श्रीकृष्णास निवेदन केला. हें ऐकून श्रीकृष्णास हंसूं आलें व तो गोपाळांस पुन: म्हणाला, 'गोपहो ! बळरामासह मी येथें आलों आहें असें ब्राह्मणांच्या स्त्रियांस सांगा म्हणजे त्या तुम्हांस यथेच्छ अन्न देतील.' हें ऐकून गोपाळ यज्ञमंडपाजवळ असलेल्या पत्नीशाळेंत गेले. तेथें महार्हभूषणालंकृत अशा विप्रस्त्रिया त्यांच्या दृष्टीस पडल्या. त्या महासाध्वींना नमस्कार करून नम्रपणानें श्रीकृष्णाचा निरोप त्यांस सांगितला. तो ऐकतांच त्या स्त्रिया पति भाऊ वगैरे आप्तांनीं प्रतिबंध केला असतांही श्रीकृष्णाकडे चतुर्विध अन्न घेऊन आल्या. तें पाहून कृष्ण प्रसन्न झाला आणि त्यानें त्या स्त्रियांस 'पतिगृहीं गृहस्थाश्रमव्रत चालविण्यास परत जा', असें सांगितलें. नंतर आणिलेलें चतुर्विध अन्न गोपाळांस देऊन स्वतांही श्रीकृष्णानें भोजन केलें. ब्राह्मणांस स्वकर्माचा पश्चात्ताप झाला, व ते स्वत:ची निंदा करूं लागले. नंतर ते श्रीकृष्णास शरण गेले. तेव्हां त्यानें त्यांजवर अनुग्रह केला. यज्ञपत्न्यांची म्हणजे विप्रस्त्रियांची कथा या काव्यांत आहे, म्हणून याला **'यज्ञपत्न्याख्यान'** किंवा **'ऋषिपत्न्याख्यान'** असें अन्वर्थक नांव पंडितांनीं दिलें आहे. हें प्रकरण दशम स्कंध–अध्याय २३ वा याच्या आधारें रचिलेलें आहे. २. लज्जाशील गोपिकांची. ३. लवकर. ४. प्रभु. ५. यादवश्रेष्ठ कृष्णा. ६. वस्त्रें. ७. हरण करी. ८. आपल्या स्त्रियांस. ९. ब्राह्मण; द्विज स्वकांतांची स्तुति करतात आणि आपला धिक्कार करतात, कारण त्यांनीं कृष्णास ओळखिलें आणि स्वत: आपण ओळखिलें नाहीं, असें या कथासागरापासून तत्व (तात्पर्य) चतुर लोक काढितात. १० कथासागर. ११ मंथन करून काढतात.

करुनि नमन कृष्णा तैं कथातत्व वाचे
कथिन मि गुण कांहीं त्यामध्यें माधवाचे, ।
नें भजत हरि झाले नष्ट थोर द्विजाती,
प्रिय हरि अबळा त्या त्या सुमुक्तीस जाती. ॥ ३
अंबरें हरुनियां वरदानें गोपिकांसि दिधलीं वरदानें; ।
धांवले पशुप गोवळ सारे 'काय हा' जन म्हणे, 'वळसा रे'. ॥ ४
सिदोऱ्या न घेताचि टाकूनि जाती, सवें आपुल्याल्या चतुष्पादजाती; ।
मिळाल्या त्वरेनें मृगांकाननातें असे धांवले गोप ते काननातें. ॥ ५
हरि बहुत पहाटे दूर गेला वनातें,
म्हणउनि पशुपाळीं मांडिलें धांवनातें. ।
जसि दिलि गमनाज्ञा गोपकन्यासि देवें
चहुंकडुनि मिळालीं गोपवृंदें सदैवें. ॥ ६
जाय त्यांसह हरी परभारा, दावितो द्रुमशिरीं परभारा. ।
'हे' म्हणे 'तरु परार्थचि सारे, धन्य मानव दयाळु कसा रे!' ॥ ७
हे परार्थक विलास कळांचें देह भूरुहवरां सकळांचें. ।
घे करें वदत हें फळ पानें सेविती पशु तृणें जळपानें. ॥ ८
सभाग्या तरूच्या फळां पल्लवांतें स्वयें घ्या वदे येरिती बल्लवांतें; ।
कृपायुक्त नम्रावरी हात टाकी, वसे त्या स्थळीं भानुकन्यातटाकीं. ॥ ९
असा दूरि टाकूनि वृंदावनातें हरी पाहुनी धेनुवृंदीं वनातें; ।
बसे देखुनी पुष्पिता काननातें, गडी सेविती श्रीमृगांकाननातें. ॥ १०

---

१. लक्ष्मीवल्लभाचे गुण. २. न भजल्यामुळें. ३. ब्राह्मण. ४. त्या आवडत्या द्विजभार्या. ५. उत्तमगतीला. ६. वस्त्रें [अंबर=आकाश; वस्त्र.] ७. वर देणारा जो कृष्ण त्यानें. ८ वररूप दानें. ९. पशुपालक असे गवळी. [गोपाळ=गोवळ, गवळी.] १० वेडा. ११. न्याहारी, शिधा. १२. गाईगुरें. १३. चंद्रवदन जो कृष्ण त्याजकडे. १४. वनातें. १५. प्रभातीं. १६. पळणें. १७. गोपाळांचे समुदाय. १८. परस्पर. १९. वृक्षाच्या मस्तकावर. २०. वृक्षाच्या शिरावर जो फलपुष्पांचा भार असतो तो परभार म्हणजे दुसऱ्यासाठीं भार आहे. २१. भूरुह+वर=वृक्ष+श्रेष्ठ. २२. गवत. २३. गोपाळांतें. २४. यमुनातीरीं. २५. वृंदावन=वृंदारण्य=गोकुलसमीपवर्ती अरण्य. [वृंदा=जालंधर नामक असुराची पत्नी तिचें वन; वृंदा ही सती गेल्यावर तुळसीच्या रुपानें उत्पन्न झाली—अशी कथा आहे.] २६. वृंद=समुदाय. २७. उदकातें. ['वनं सलिलकानने इत्यमरः; 'क्लीबं स्यात् कानने नीरे निवासे निलये वनम्' इति रभसः] २८. फुललेल्या (अरण्यातें.) 'पुष्पिता' हें 'काननातें' याचें विशेषण आहे. कवितेंत अकारान्त विशेषणाचें केव्हां केव्हां सामान्यरूप 'आ' असें होतें, या नियमाचें हें उदाहरण आहे. २९. मृगांक+आनन=चंद्र+मुख; चंद्रवदन असा कृष्ण त्याला.

तेथें क्षुधेंकरुनि त्यां पशुपालकांनीं हे घातली विनवणी [1]व्रजपालकानीं; ।
कीं, 'प्राण [2]आजि [3]अजि! भूक हरी! हरीते, देऊनि अन्न बहु तृप्त करीं हरी! ते'. ११

[4]म्हणे हरी, 'येथुनि [5]यज्ञशाला समीप हे जे दिसती विशाळा, ।
[6]स्वर्गानिमित्तें [7]यजनें करीती, तेथें असे अन्न अनेकरीती. ॥ १२
म्हणाल आम्ही [8]पशुपाळजाती, ते श्रेष्ठ शास्त्रज्ञ [9]महाद्विजाती, ।
मागों कसें अन्न तयां द्विजांतें? द्यावें, परी तें निज पुण्य जातें. ॥ १३
तरीं स्वयें जात तुम्ही नसा रे! मागा मदाज्ञेंच करूनि सारे; ।
कीं नाम माझें [10]ममअग्रजाचें सांगा तुम्ही सैन्य समग्र [11]ज्यांचें.' ॥ १४
निरोप ऐसा पशुपांसि झाला, [12]ते मागती अन्न तयां द्विजांला; ।
कीं, 'येथुनी संनिध कृष्ण [13]राम आले स्वयें [14]विश्वमनोभिराम. ॥ १५
हे थोर, कोण्हीच न यांसमान, द्यावाच यांच्या वचनासि मान, ।
द्या अन्न ऐसें जरि [15]साच वाटे, आम्हांस लावा अथवा [16]खंवाटे.' ॥ १६
हें ऐकिलें कीं [17]वसुधामरांनीं, न मान्य केलें तरि [18]पामरानीं; ।
'[19]नेदूं' असेंही परि ते द्विजाती, न [20]बोलेंतां, गोप [21]निराश जाती. ॥१७
वृत्तांत ऐसा पशुपालकांनीं निवेदितां, घे पशुपाल कानीं; ।
[22]लक्षूनि माया, करि [23]मंदहास, केला जिणें मोह [24]महामहास. ॥ १८

---

१. व्रजपालाच्या (कृष्णाच्या) कानांत. २. आज. ३. अहो. ४. दशम स्कंध—अध्याय २३ श्लोक ३-४ पहा. ५. यज्ञभूमि. ६. स्वर्गप्राप्तीच्या इच्छेनें. ७. यज्ञ. ८. गोवळी. ९. थोर ब्राह्मण. (द्विजाति=दोनदां जन्म पावलेला जो तो; एक मातेच्या उदरांतून येतो त्यावेळीं, दुसरा उपनयनाच्या वेळीं. 'द्विजः स्याद्ब्राह्मणक्षात्त्रवैश्यदंतांडजेषु ना' इति मेदिनी.) १०. बलरामाचें, आणि माझें नांव सांगा आणि अन्न मागा. ११. ज्या माझें तुम्ही समग्र सैन्य आहां. १२. क्षुधित गोपाल. १३. बळराम. १४. मनोहर. १५. आमचें वचन खरें वाटत असेल तर. १६. किंवा आम्हांस वाटेला लावा, देत नाहीं असें सांगून जाण्यास सांगा. १७. वसुधा+अमर=भू+देव=ब्राह्मण. १८. पामर=क्षुद्र. १९. देत नाहीं. २०. 'होय' अथवा 'नाहीं' असें द्विज न बोलल्यामुळें गोप निराश झाले व रामकृष्णांकडे परत आले. २१. भग्नाश. (श्लोक १२ पहा.) २२. हे द्विज मायापाशांत पडले आहेत असें जाणून. २३. स्मित. २४. मोठमोठ्यांस. कोणत्याही गुणाचें आधिक्य दाखविणें असल्यास तद्बोधक विशेषणाची द्विरुक्ति करितात, असा नियम आहे, त्यास अनुसरून येथें 'महामहास' असा प्रयोग केला आहे. येथें 'महामहा' म्हणजे मोठमोठे लोक असा अर्थ आहे. जेथें विशेषणाचें विशेष्य सहज कळण्यासारखें असतें तेथें त्या विशेषणास नाम मानून त्याचा तसा उपयोग करण्याचा प्रघात अनेक भाषांत आहे, या नियमाप्रमाणें 'महामहास'. याचा प्रयोग या स्थळीं केला आहे.

बोले पुन्हा हरि तयांप्रति लोकरीती[1], कीं, 'येक यत्न नेव्हतां[2] दुसरा करिती[3], ।
प्रार्था अशाचि तुम्हि जाउनि विप्रदारा[4] त्या अन्न देतिल तुम्हांसि महाउदारा. १९
अत्यंत मी प्रिय जयांसि जगन्निवास[5], ज्यांच्या मतीस[6] मजमाजि सदा निवास[7]; ।
माझ्या कथा बहुरुची[8] परिसोनि[9] कानीं ध्यानीं तिहीं स्तवियेलें मज गायकानीं.॥
स्नेह स्वभाव सहज स्वत एव साचा, तत्रापि वास मजमाजिच मानसाचा[10]; ।
तो मीं असें जवळि हें परिसोनि वाणी, देतील अन्न बहु त्या, न करूनि वाणी[11].'॥
ऐकूनि हे शब्द अगाध[12] वाचे, गेडी[13] पुन्हा धांवति माधवाचे. ।
ते यज्ञशाळेचमधें द्विजाती, तों पत्निशाळेप्रति[14] गोप जाती. ॥ २२
विप्रस्त्रिया सारुनि पाक सारा, ध्याती मुकुंदा जगदेकसारा[15]; ।
अलंकृता मौक्तिकमाणिकानीं[16] मनीं मुखीं माधव आणि कानीं. ॥ २३
देखूनियां हे हरिदास[17] त्यांतें[18] 'नमो' म्हणूनी नमिती सत्यांतें[19]. ।
सन्मान देऊनि अनेक रीति 'आला हरी' हें श्रुत ते करीती. ॥ २४
'द्विजांच्या पत्न्या हो! वचन वदतों हें मनिं धरा,
तुम्ही प्रेमें चित्तीं स्मरत असतां ज्या गिरिधरा[20]; ।
स्वयें आला आहे बहुत जवळी येथुनि हरी,
तया द्या[21] अन्नें जो खजनजठराग्नी[22] परिहरी[23].' ॥ २५
ऐकतां निकट[24] आगमनातें, नावरेच[25] अनुराग[26] मनातें. ।
अन्न षड्रस[27] चतुर्विधजाती[28] घेउनी हरिस संनिध जाती. ॥ २६

---

१. लौकिक व्यवहारास अनुसरून. २. सफळ न होतां. ३. कार्यसाधु पुरुष पुन: पुन: यत्न करतात, ते खेद करीत नाहींत. (श्लोक १३ पहा.) ४. विप्रपत्न्या. ५. जगदाधार. ६. ज्यांची बुद्धि निरंतर माझ्याच चिंतनांत निमग्न आहे. ७. वसति. ८. मोठ्या गोडीनें. ९. ऐकून. १०. मनाचा. ११. कमताई. १२. गंभीर. १३. गोपाळ. १४. ब्राह्मणस्त्रियांचे मंदिराप्रत. [येथें छंदोभंग न व्हावा म्हणून 'पत्नी' शब्द ऱ्हस्व घातला आहे.] १५. जगांत एक श्रेष्ठ अशा. १६. मोत्यांनीं आणि माणिकांनीं भूषित अशा. (श्लोक १५ पहा.) १७. गोपाळ. १८. द्विजपत्न्यांतें. १९. पतिव्रतांतें. २०. गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्याला. (कृष्णाला.) २१. श्लोक १६-१७ पहा. २२. उदरस्थ अग्नि (क्षुधा). २३. शमवितो. २४. समीप. २५. न आवरे. २६. प्रीति. २७. रस सहा आहेत त्यांचीं नांवें:—'रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः । षड् द्रव्यमाश्रितास्ते तु यथापूर्वं बलवहाः ॥' [वाग्भट—सूत्रस्थान—अध्याय १ श्लोक १४-१५]; गोड, आंबट, खारट, कडु, तिखट, तुरट असे द्रव्यांमध्यें सहा रस आहेत. २८. लेह्य, पेय, खाद्य, चोष्य या चार जातींचें. लेह्य=चाटण्याजोगें, श्रीखंड इत्यादि; पेय=पिण्याजोगें, दुग्ध इत्यादि; खाद्य=खाण्याजोगें, लाडू इत्यादि, चोष्य=चोखण्याजोगें, उस शेंगण्याच्या शेंगा इत्यादि.

समुद्रातें[1] उच्चस्थळिंहुनि मिळों जाति सरिता,[2]
सुखाब्धीतें[3] जाती त्वरितचि तशा प्रेमभरिता.[4] ।
पिता पुत्र भ्राता जिस तिस निवारी[5] निजपती,
तरी गेल्या तेथें पशुपजनयुक्त[6] व्रजपती.[7] ॥ २७
गडी गाती कीर्ति स्तविति वडिलाबंधुस बळा;[8]
पहाती ते दृष्टींकरुनि अबळा[9] भाग्य सबळा; ।
तटीं कालिंदीच्या सुललित[10] अशोकद्रुमवनीं,[11]
खगोपालामध्यें करि पदरजें धन्य अवनी.[12] ॥ २८
सजल जलद गात्रें त्यांत रत्नें सुवर्णें,[13]
झळकति वसनेंही[14] वीज जाणों सुवर्णें;[15] ।
मृदु तनु वरि नाना पीत आरक्त चित्रें,
पशुप करिती तैसी रेखिलीं जें विचित्रें. ॥ २९
अंडकोटिहि धरूनि न टाचा त्याचिया तनुस वेष नटाचा ।
श्रीकरें फिरवितो कमळातें, नाशितो स्वजनशोकमळातें. ॥ ३०
अशोकतरुच्या तळीं फिरवि वर्तुळ श्रीहरी,
सरोज[16] करि शून्य तें स्वजन शोक जाणों हरी. ।
असो विविध भाव जे शुककथारसीं सूचवी
वदेल किती कोणते? परि अशा तयाच्या चवी.[17] ॥ ३१
पळांत अति उत्तमें श्रवणिं आपुल्या जें पळें
म्हणूनी हरि सूचवी श्रवणिं दावि तो उत्पळें[18] ।
उदारपण ज्या पळां म्हणति उत्पळें तें कवी
मनीं हरिच वामनीं परम अर्थ हा सूचवी. ॥ ३२
ऐकोनि जो स्वहृदयांतचि रेखिलो,[19] हो! प्रत्यक्ष तोचि नयनीं हरि देखिला हो! ।
आलिंगिला निज मनें प्रभु त्या सत्यांनीं, केलें तयाउपरि वंदन त्यास त्यांनीं.[20] ॥

---

१. श्लोक १९ पहा. 'समुद्रमिव निम्नगाः' असें मूळांतच आहे. २. नद्या. ३. सुखसागरातें. (कृष्णातें.) ४. प्रेमरूप उदकानें भरलेल्या. ५. जाण्याचा निषेध केला तरी. ६. गोपाळांच्या समुदायानें युक्त. [जन=समूह.] ७. कृष्ण. ८. बळरामास. ९. स्त्रिया. १०. सुंदर. ११. अशोक नामक वृक्षांच्या वनांत. (श्लोक २१ पहा.) १२. पृथ्वी. १३. सोनें. १४. वस्त्रें. १५. उत्तम वर्णानें. १६. कमळ. १७. रुची. १८. कमळें. १९. लिहिला. २०. त्या सतींनीं.

श्रुति[1]सहि वदवेना जो हृषीकेश[2] याचे
पुसिति कुरळकेशीं[3] पाय त्या केशवाचे; ।
चरणकमळयुग्मीं श्यामला[4] भृंगमाला[5]
मिरविति सुख तेव्हां स्थावरा जंगमाला. ॥ ३४

हरी म्हणे कीं, 'तुम्हि विप्रदारा महासभाग्या[6] परमा उदारा, ।
पहावया पातलियाच मातें अलभ्य जो मी त्रिदशोत्तमातें[7]. ॥ ३५

जडा अनर्थांत समान साचा, जो अर्थ तो मी प्रियमानसाचा; ।
सर्वांसही गोडचि वाटलों कीं, प्रीतीस ही एकचि वाट लोकीं. ॥ ३६

स्वयें स्वात्मा तो हा हरि म्हणुनि या पावन कळे,
न घेती भक्तीचा परम निज सद्भाव न कळे. ।
स्वभक्तीमुक्तीचें विरजण न नामीं प्रियपणा,
विलंबें सिद्धीची उडवि रुचि ते भक्ति कृपणा. ॥ ३७

अशा प्रियातें[8] पुरुषोत्तमातें, पहावया पातलियाच मातें; ।
हे युक्ति कीं मी प्रिय मानसाचा, सर्वां प्रियामाजि समान साचा.॥ ३८

तनुधनविषयांचा सर्व जो जो पसारा,
अनृत[10]चि, परि माझा त्यामधें व्याप सारा; ।
लहरि[11]हि तृषितातें गोड ते जीवनानें[12],
प्रिय सकळहि केले म्यां जगज्जीवनानें[13]. ॥ ३९

प्रियें सारीं जेणें प्रिय परम तो वो स्वभजनीं,
असा मी त्या मातें तुम्हि गवसिलें प्रेमभजनीं; ।
असें जें हें केलें बहु उचित वाटे मजपरी
पती जेथें तेथें गमन करणें एतदुपरी[14]. ॥ ४०

तुम्ही जावें जेथें स्वपति करिती देवयजन[15],
स्त्रियांच्या[16] योगें तें करितिल समाप्ती द्विजजन.' ।

१. वेदालाही. २. हृषीक+ईश=इंद्रिय+स्वामी. (कृष्ण.) ३. आपल्या कुरळ केशांनीं कृष्णाचे पाय पुसले. ४. कृष्णवर्ण. ५. भ्रमरपंक्ति. ६. श्लोक २५ पहा. ७. इंद्रातें. (त्रिदश+उत्तम=देव+श्रेष्ठ.) ८. 'प्रियातें' हें 'पुरुषोत्तमातें' याचें विशेषण आहे. कवितेंत विशेषणें हीं विशेष्यानुरोधानें वचन, लिंग व विभक्ति यांच्या योगें बदलतात, या नियमाचें हें उदाहरण आहे. ९. मल. १०. खोटा. ११. लाटा. १२. उदकानें. १३. जगताच्या स्थितीला कारण जो मी त्यानें. १४. या नंतर. १५. देवांची पूजा. (श्लोक २७-२८.) १६. धर्मपत्नीविना कोणतेंही धर्मकर्म यथाविधि होत नाहीं या समजुतीकडे येथें कटाक्ष आहे.

सुखाच्या त्या गोष्टी वदत सुख दे श्रीहरि, परी
बहु क्लेशी झाल्या, [1]गमन वदला जें तदुपरी. ॥ ४१
बहु क्लेशी झाल्या श्रवणिं पडतां हें [2]द्विजसत्या,
[3]जळातें नेत्रांच्या पुसुनि, वदति श्रीपतिस त्या. ।
'[4]अहाहा ! देवा ! तूं परमकरुणासागर हरी
तयाहीमध्यें हें नवल उठिली क्रूर [5]लहरी. ॥ ४२
हे [6]शब्द योग्य न तुतें पुरुषोत्तमातें, मिथ्या नको करुं तुझ्या [7]निगमागमातें; ।
वायां न जाय निज भक्ति असी [8]स्ववाणी, साची करूनि न करी करुणेसि [9]वाणी. ॥
पदापासीं आलों चरणरज, [10]निर्माल्यें तुळसी,
धराया [11]माथां जे ढकलिसि पदें तें अतुळसी; ।
परी पुत्र भ्राते [12]सुहृदजन [13]लंघूनि सकळां,
निघालों त्या आम्हा, [14]गति न तुजवांचूनि [15]विकळां. ॥ ४४
[16]अंगीकरील न पती न पिता न बंधु, आम्हासि तूंचि गति यावरि दीनबंधु ! ।
ज्याच्या पदाजवळि [17]लोकुनियां प्रकारें, द्यावें न अंतर तयां अजि [18]निर्विकारें. ४५
पद जयांसि तुझें [19]परमागती, त्यजिसि त्यांसि अतःपर मागती, ।
वदसि यावरि शब्द झणी असा म्हण पदाजवळीच तुम्ही [20]असा.' ॥ ४६
करुनि हास्य [21]म्हणे हरि, 'कां पती त्यजिति, सर्व तुम्हासचि [22]कांपती; ।
धुडनि ते तुमच्या [23]पदपंकजा पितिल तो अतिपार न [24]पंकें ज्या. ॥ ४७

---

१. पतीकडे जा असें जें सांगितलें तें. २. विप्रभार्या. ३. बाष्पातें. ४. श्लोक २९ पहा. ५. तूं करुणासागर असून त्यांत क्रूरतेची लाट उठली हें नवल होय. ६. परत जा असे शब्द. ७. वेदांतज्ञानातें. ८. 'माझा भक्त नाश पावत नाहीं' अशी वाणी. 'क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति । कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥' [भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक ३१ पहा.] याचा भावार्थः–मला जो भजतो त्याची बुद्धि धर्माकडे त्वरित लागते आणि त्याला सर्वकाळची शांति प्राप्त होते; कौंतेया, पक्कें समज कीं माझा भक्त नष्ट होत नाहीं. ९. कमताई. १०. पुष्पें. ११. श्लोक २९ पहा. १२. येथें 'सुहृज्जन' असें सामासिक पद होतें, परंतु छंदोभंग न व्हावा म्हणून 'सुहृदजन' असें घातलें आहे. १३. आप्तस्वकीयांच्या आज्ञांचें उल्लंघन करून. १४. आधार, आश्रय. १५. कळाहीन, केंगण्या. १६. अंगीकार करणार नाहींत. [श्लोक ३० पहा.] १७. पाहून. १८. त्वां विकाररहिततानें. १९. उत्तम आश्रयस्थान. २०. रहा. २१. श्लोक ३१ पहा. २२. तुम्हासच भितात. २३. पदकमळास. २४. मळ, चिखल, धूळ.

किमपि दोष तुम्हासि कदापि ते पति न लाविति आणि [1]सखे [2]पिते, ।
सकळ ते सहबंधु [3]सहोदर स्मरति हे तुमचा [4]गुणसागर. ॥ ४८

अहो ! तुमचिया द्विजां [5]सुकृतपुण्यसांठा किती ?
तुम्हासि [6]सुर वंदिती, [7]नभिहुनी फुलें टाकिती; ।
म्हणोनि तुम्हि जा गृहा, त्यजुनि शीघ्र या आग्रहा,
म्हणे तुम्हि करा मनीं स्वपदभक्तिच्या [9]संग्रहा. ॥ ४९

'[10]घडे भक्ति जैसी मनाच्या प्रसंगें, न साधे तसी माझिया [11]अंगसंगें; ।
मनीं ध्या मला, शीघ्र पावाल मातें, स्मरा अंतरीं सर्व सर्वोत्तमातें.' ॥ ५०

[12]शुक म्हणे हरिची असि [13]वैखरी, द्वि[14]जसत्या मनिं मानुनियां खरी, ।
परतल्या अवघ्या [15]स्वसुखालया, [16]अशन अर्पुनियां [17]स्वसुखालया. ॥ ५१

द्विज न [18]लेशहि वाइट लेखिती, परम सादर [19]त्यांसिच मानिती; ।
दिधलि सद्य जिला परमा गती, स्मरति तीसचि [20]मागुतिमागुती. ॥ ५२

[21]जातां हरी जवळि एक सती पतीतें, जें सांपडे हरिमनींच समीप तीतें; ।
ध्यानीं दिसे तनु सुटे सहलिंगदेहा, [22]सारूप्यमोक्ष निज तीस मुकुंद दे हा. ॥ ५३

देखूनि कृष्णपदभक्तिचिया प्रतापा, [23]स्वान्याय आठविति पावति विप्र [24]तापा; ।
धन्यत्व वर्णिति तया [25]अबळाजनांचें; सांनिध्य ज्यांसि घडलें [26]भवभंजनाचें. ॥ ५४

शुक [27]म्हणे, 'द्विज ते [28]अनुतापले, स्मरति जे [29]अपराधहि आपुले; ।
स्तविति आपुलिया अबळाजना जिहिं [30]सदन्न दिल्हें भवभंजना. ॥ ५५

[31]श्रीकांतभक्ति अवलोकुनि त्या सत्यांची, ते वाटली परम [32]सन्मति [33]त्यांस त्यांची; ।

१. मित्र. २. मातापितर. ३. सख्खे बंधु. ४. तुमचे अनेक गुण. ५. पुण्यसंचय. ६. देव. (श्लोक ३१.) ७. आकाशांतून. ८. देव देखील या गोष्टीला अनुमोदन देतात—असें सुचविलें. ९. संचया. १०. श्लोक ३२ पहा. ११. शरीराच्या समागमानें. १२. शुकाचार्य. १३. वाणी. १४. ऋषिपत्नी. १५. जेथें स्वतांला सुख आहे अशा आलयाला (गृहाला); यज्ञस्थानाला. १६. नैवेद्य. १७. स्वसुखाचें आलय (स्थान) जो कृष्ण त्याला. १८. आपल्या भार्या न विचारतां गेल्या म्हणून ब्राह्मणांना किमपि वाईट वाटलें नाहीं. पतींनीं आपल्या बायकांना न विचारतां गेल्या म्हणून दोष दिला नाहीं. १९. आपल्या स्त्रियांना. २०. पुनः पुनः. २१. एक स्त्री अन्न घेऊन कृष्णाकडे जात असतां, तिच्या पतीनें तिला धरुन ठेविलें, तेव्हां ती स्वदेहाला पतीपाशीं ठेवून (प्राण सोडून) चैतन्यरूपानें कृष्णाजवळ आली. (श्लोक ३४.) २२. मागें पृष्ठ २२१ टीप ४, पृष्ठ १८१ टीप १० पहा. २३. स्वापराध. २४. पश्चात्ताप, अनुताप. २५. स्त्रीजनांचें. २६. भव(संसार)नाशक कृष्णाचें. २७. श्लोक ३७ पहा. २८. पश्चात्ताप पावले. २९. प्रभुयाचनाभंग हा अपराध. ३०. उत्तम अन्न. ३१. लक्ष्मीपतिभक्ति. ३२. उत्तम वासना. ३३. त्या विप्रांना.

यालागिं वानिति[1] अशा अबळापणातें[2], धिक्कारिती[3] निज गुणासह आपणातें. ॥९६
'विश्वंभर त्रिभुवनेश्वर विश्वपाळी, तो मागतो, म्हणुनियां स्फुट[4] धेनुपाळीं[5] ।
सांगीतलें, तरि तया दिधलें न कांहीं, तें अन्न नेउनि दिल्हें निजबायकांहीं. ॥ ९७
आम्ही गुरू[6] सर्व दिनां द्विजाती, दावूं जना मार्ग तसेचि जाती. ।
ऐशांसही[7] तें[8] करिते भ्रमाया, तया हरीची तरवे न माया. ॥ ९८
माया असी म्हणुनि जे वदतों जनातें, तेंही नसों समजलों भवभंजनातें. ।
मायापतीसहि[10] करी भ्रम विष्णुमाया जीवित्व जी करुनि तोचि धरी रमाया. ॥ ९९
पहा हो! नारींचें हरिचरणपद्मप्रियपण[11],
द्विजां आम्हां नाहीं, पढतपशु जे मूर्ख कृपण[12], ।
अहो! ज्या सद्भावें जननमरणाचा उपरम[13],
स्त्रियांच्या ठायीं तो, द्विज म्हणति आश्चर्य परम. ॥ ६०
ज्या अंगना[14] कधिं न आचरल्या तपातें[15], सोसूनिही परम वर्षहिमातपातें[16], ।
लावी न ज्यांस निज अद्वयलाभवार्ता जे मुक्तिमार्गपद दाखवितो भवार्ता[17]. ६१
अहो! आम्ही शास्त्रें पढत, पद त्यांचें[18] विसरलों,
पथें दिव्या जातां मतित गृहकूपीं घसरलों; ।
म्हणूनी अन्नाचें मिषें[19] करुनी आम्हांसहि हरी
मुखें गोपाळांच्या स्मरण निजदेवीं स्मृति हरी. ॥ ६२
अन्यथा त्रिभुवनेश्वर साचा, काय तो क्षुधित अन्नरसाचा? ।
मानवी तनु धरूनि हरी तो सत्कथा करुनि, बंधं[20] हरीतो[21]. ॥ ६३
अनंत ब्रह्मांडें धरुनिही अनंतत्व न सरे,
स्वयें तो हे यज्ञा क्षितिहि मखें[22] जींमाजि पसरे; ।

१. वर्णिति, स्तविती. २. स्त्रीत्वातें. ३. आपण कृष्णभक्ति केली नाहीं म्हणून ते स्वतांची निंदा करूं लागले. (श्लोक ३८-५१.) ४. स्पष्टपणें. ५. गोपाळांनीं सांगितलें असतां. ६. आम्ही द्विज म्हणून सर्व दीनांचे गुरु आहोंत. ७. आम्हांसारख्यांनाही. ८. ते माया. ९. भगवंताची माया योगिजनाला देखील मोह घालिते, आम्ही ब्राह्मण सर्व मनुष्यांचे गुरु असून आम्हांलाच स्वार्थीविषयीं मोह पडला, यावरून भगवंताची माया तरून जाणें दुष्कर आहे. (श्लोक ४०.) १०. मायेचा स्वामी त्यालाही माया भ्रमण करावयास लावते. ११. कृष्णपादकमलानुराग. १२. श्लोक ४८ पहा. १३. लय, नाश. स्त्रियांचा जन्ममरणपाश भक्तीनें लयास गेला, त्यांचा मृत्युपाश तुटला. १४. स्त्रिया. १५. श्लोक ४२ पहा. १६. वृष्टि, हिमकाल आणि उष्णकाल. १७ संसारानें त्रासलेल्यांस. १८. त्या कृष्णाचे. १९. निमित्त. २०. जन्ममरणपाश. २१. दूर करतो. २२. यज्ञ.

यदूच्या वंशीं तो तैनु धरुनि आहे व्रजजनीं,
कळूनि हें ऐसें मति न भरली कृष्णभजनीं. ॥ ६४
स्वकांतासत्संगें करुनि अनुतप्त द्विज, परि
न गेले दुःसंगें हरिपद पहाया तैंदुपरि; ।
स्वदेशाचा कंस क्षितिपैति तयाचें भय मनीं,
अभाग्यांनीं केलें म्हणउनिच आलस्य उमनीं. ॥ ६५
'सभाग्या स्त्रिया निर्भया त्या पदातें पहातां पहा पावल्या संपदाते.' ।
करीती जनीं शोक ऐसें द्विजाती तरी कंसधाकें न भेटीस जाती. ॥ ६६
धर्मार्थकामपुरुषार्थ अतिप्रसिद्ध पावूनिही पुरुष माथुर विप्रसिद्ध; ।
भक्तीविणें हरिचिया गुण ते उडाले त्यांच्या स्त्रिया तरलिया, नर ते बुडाले. ॥
पुरुष ते अबळा अति उत्तमा जरि अनन्य भजे पुरुषोत्तमा ।
नर न हें नररूप जरी खरा, प्रिय मुकुंद न सव्य जयां खरा. ॥ ६८
संसार तो द्विजपणीं अबळांसि नाहीं, ज्याला नसे गुरुपणीं सदुपासनांहीं; ।
ऐशाहि भक्ति पद अंबुजपाणिजीची आम्हा अशा द्विजवरांसहि वाणि जीची. ६९
पुरुष ते भजती अबलाजना, स्मरत वामन त्या भवभंजना; ।
म्हणतसे कमलापुरुषा त्वैरें मनिं धरील तया पुँरुषत्व रे ! ॥ ७०

---

## रासक्रीडा.

(श्लोक.)

करुनि नैमन गोपीवैल्लभा श्रीपतीतें,
कथिन चरित त्याचें जें भवातें हरीतें; ।

---

१. शरीर. २. स्वपत्नींच्या समागमानें पश्चात्ताप पावलेले ब्राह्मण. ३. त्यानंतर. ४. राजा. ५. कृष्णाची. ६. लौकर. ७. पुरुषपण. ८. 'रासक्रीडा' हें प्रकरण दशमस्कंधांतील 'रासपंचाध्यायी' म्हणजे अध्याय २९-३३ यांच्या आधारें रचिलें आहे. कात्यायनीव्रताचे अखेरीस कृष्णानें गोपींस वर दिला होता (कात्यायनीव्रत श्लोक ८३-९१) त्याला अनुसरून शरत्कालीं पौर्णिमेच्या रात्रीं त्यानें गोपींना बरोबर घेऊन यमुनेच्या वाळवंटांत प्रवेश केला आणि त्या स्थलीं रासक्रीडा करून त्यांचे मनोरथ पूर्ण केले, म्हणून या प्रकरणास **'रासक्रीडा,' 'रासलीला'** किंवा **'रासोल्हास'** असें नांव वामनपंडितांनीं दिलें आहे. रास म्हणजे अनेक स्त्रियांनीं अथवा दोन स्त्रियांनीं एकत्र जमून हात धरून मंडलाकार उभें राहून एका पुरुषाबरोबर नृत्यगायन करणें. ९. "वामनाच्या प्रत्येक ग्रंथाच्या आरंभीं बहुतकरून परमात्म्यास वंदनरूप मंगलाचरण केलेलें आढळतें. ही गोष्ट पंडितानें वृद्धपरंपरेनें ग्रहण केली असावी. अथवा पंडित मोठा भगवन्निष्ट होता यास्तव कोणत्याही

वरद[1] वर दयेनें दे व्रजीं[2] कामिनींला[3]
मनिं धरि रमणेच्छा[4] देखतां यामिनीला[5]. ॥ १
'प्रकटतील शरदृतुयामिनी[6], तइं तुम्हीं मजशीं व्रजकामिनी ।
रति[7] रमाल' तमालतनू[8] असा वर वदूनि म्हणे 'स्वसुखें असा.' ॥ २
शरत्कालरातीं फुलें पुष्पजाती[9] नंदीचे[10] तिरीं[11] मोगरे[12] कुंद जाती[13], ।
असें देखतां आपल्या त्या वरातें[14] करूं सत्य हें वाटलें श्रीवरातें[15]. ॥ ३
पूर्वेस पूर्ण उगवे शशि[16] त्या सुकाळीं दे औषधींस[17] सुख तो स्वकुळा[18] सुकाळीं[19] ।

---

कामास प्रवृत्त होतांना भगवच्चरणीं लीन व्हावें हें त्यास स्वाभाविकच झालें होतें असेंही मानतां येईल. कसेंही असलें तथापि ग्रंथारंभीं मंगलाचरण करण्याचा संप्रदाय तत्वत: फार चांगला आहे असें आम्हांस वाटतें. ग्रंथारंभीं मंगलाचरण केल्यानें ग्रंथास मंगलमुखता प्राप्त होत्ये. तिजपासून ग्रंथ रचण्यास अथवा वाचण्यास आरंभ केल्याबरोबर कर्त्याच्या अथवा वाचकाचे हृदयांत प्रेम आविर्भूत होऊन तो भक्तिमान् होतो. दुसरें भक्तिमान् झाल्यानें मनाच्या तामसादि वृत्ति मावळून, सात्विकभाव उत्पन्न होऊं लागतात; यामुळें मन निर्मळ होऊन ग्रंथांत मार्दव, माधुर्य, प्रसाद हे गुण सहज येतात. तिसरें अनंत कालानंतर अशा ग्रंथाच्या अवलोकनानें, प्राचीन काळीं ईश्वरभक्ति कितपत जागृत होती हें समजण्यास साधन होतें. याशिवाय ईश्वराविषयीं कृतज्ञता व पूज्यबुद्धि प्रकट केल्यानें अंशत: कृतार्थ झाल्याचा निर्मलानंदही होतो. याप्रमाणें मंगलाचरणापासून पुष्कळ हित आहे. यांत संशय नाहीं. आतां कित्येक नास्तिकमताचे अथवा अभक्तिमान् लोक, मंगलाचरण करणें हें कालाचा व्यर्थ व्यय करणें आहे असें कदाचित् मानतील; परंतु मनुष्य कितीही ज्ञानी असो तो भक्तिमान् नसेल तर त्याला कधींही समाधान होणार नाहीं. ह्या सिद्धान्ताप्रमाणें भक्तीचें लक्षण मनांत आणिलें म्हणजे मंगलाचरणांत जो ग्रंथकाराचा काल गेला तो कालाचा अत्यंत उपयोगी व्यय झाला असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं." (वामनावरील निबंध–पृष्ठें २१-२२.) १०. 'गोपीवल्लभाच्या पदातें' असा अन्य पाठ आहे. ११. संसारातें.

१. वर देणारा. (कृष्ण.) २. गोकुळांत. ३. गोपिकांना. ४. क्रीडा करण्याची इच्छा, खेळ खेळण्याची इच्छा. ५. रात्रीला. ६. शरत्कालच्या रात्री. (अध्याय २२ श्लोक २७ पहा.) ७. विहार कराल, शुद्ध आनंद सेवाल. ८. तमाल वृक्षाचे पानासारखा सांवळा. ९. पुष्पसमूह. १०. यमुनेचें तीरीं. ११. छंदोभंग न व्हावा म्हणून हा शब्द ऱ्हस्व घातला आहे. १२. मल्लिकावल्ली. [मोगरे शरत्कालीं फुलत नाहींत, पण कृष्णाच्या प्रभावानें वृंदावनांत सर्व ऋतूंची पुष्पशोभा नित्य दृष्टीस पडे. (अध्याय १८ श्लोक ३-८ पहा.)] १३. जाई. १४. कात्यायनीव्रताचे अखेरीस दिलेल्या वरातें. १५. लक्ष्मीपतीला. १६. चंद्र. (अध्याय २९ श्लोक २.) १७. चंद्राला 'ओषधीश' 'ओषधिनाथ' असें नांव आहे, कारण तो त्या ओषधींचें पोषण करतो. 'पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः' (गीता १५-१३)=मी रसमय सोम होऊन सर्व औषधींचें पोषण करतों.—या प्राचीन समजुतीस अनुलक्षून हें वर्णन आहे. १८. 'मग त्या', 'स्वकला' असेंही पाठ आहेत. स्वकला=आपल्या षोडश चंद्रकला. १९. विपुल.

दिक्सुंदरीमुख[1] उटी[2] पति यामिनीचा[3] जाणों[4] घुसुंकुमकरें[5] प्रिय कामिनीचा. ॥ ४
चंद्रप्रभा करित थोर खमंडलाला[6] देखूनि त्या हरि अखंडित मंडलाला; ।
जो वाजवी स्वैरगती[7] व्रजराज[8] पांवा[9] नाशावया[10] मरण[11] तीव्र जरा जपावा. ॥ ५
तो [12]इंदुसुंदररमावदनासमान देखूनि दे व्रजवधूवदनास मान; ।
कीं 'या अगे' म्हणुनियां[13] व्रजराज पांवा जो वाजवी हरि, मनीं चतुरीं[14] जपावा. ६

कृष्णानुरक्ता[15] पहिल्याच होत्या वेणुध्वनी आयकतां अहो! त्या; ।
आधींच कृष्णीं सकला सकामा[16] पांवा करी फारचि वृद्धि कामा[17]. ॥ ७
वेणु तो परिसतां व्रजदारा[18], चालिल्या त्यजुनियां गृहदारा[19]; ।
टाकिलीं सकल ही गृहकामें, व्याकुळा परम होउनि कामें[20]. ॥ ८
[21]दुहिति त्या त्यजिती निजदोहनें[22], मन असें हरिलें मनमोहनें[23], ।
त्यजुनि [24]रांधण वाढण धांवल्या, त्वरित कृष्णपदाप्रति पावल्या. ॥ ९
[25]स्तन धरूनि मुखीं पिति लेंकुरें, त्वरित लोटुनियां निकरें[26] करें; ।
द्विरदराजगतीं[27] गजगामिनी[28], हरिस पावलिया व्रजकामिनी[29]. ॥ १०

त्यजुनि पतिस एकी[30], सेवितां त्या पतीतें,
मधुरमुरलिमोहें पावल्या श्रीपतीतें. ।

---

१. पूर्व दिशा ही चंद्राची प्रियभार्या तिच्या मुखाला लेप लावी. २. उज्ज्वल करी. ३. रात्रीचा पति=चंद्र. ४. हा उत्प्रेक्षालंकार होय. ५. उत्तम कुंकुमाच्या (केशराच्या) करांनीं (हातांनीं—किरणांनीं). [पति प्रवासास गेला असतां स्त्रिया केशरचंदनादि पदार्थ सेवन करीत नाहींत, पण पति परत गृहीं आल्यावर त्या मुखाला केशराचा लेप वगैरे करतात तो पतीनेंच केल्याप्रमाणें होय. येथें पूर्वदिशा ही कामिनी आणि चंद्र हा तिचा कांत असें समजावें.] ६. आकाशमंडळाला. ७. स्वेच्छ. ८. कृष्ण. ९. मुरली. १०. 'तो यामिनीदिन सखा ह्रदयीं जपावा' असाही पाठ आहे. ११. जन्ममरणांपासून मुक्त होण्यासाठीं. १२. चंद्राप्रमाणें मनोहर आणि लक्ष्मीवदनासारखें सुंदर असें गोपिकामुख (व्रजवधूवदन) पाहून त्यास मान दे. १३. 'अगे तुम्हीं गोपींनो, इकडे या' असें म्हणून. १४. चतुर जनांनीं. १५. अनुरक्त, सप्रेमांत:करण. १६. 'सांतचि' असाही पाठ आहे. १७. मदनाची वृद्धि. १८. गोकुळस्त्रिया. १९. घरदार. २०. मदनानें व्याकुळ (व्यथित). २१. 'दुहित त्यजुनि त्या निजदोहनें' असाही पाठ आहे. दुहित=दोहन करीत असतां. २२. धारा काढणें, गाईचें दूध काढणें. (श्लोक ५ पहा). २३. मनास मोहित करणाऱ्या कृष्णानें. २४. स्वयंपाक. (श्लोक ६ पहा.) 'गोधन' असाही पाठ आहे. २५. 'पाययंत्य: पय: शिशून्' इत्यादि श्लोक ६ पहा. २६. आवेशानें, धडकून, भरारां, झपाट्यानें. २७. द्विरद+राज+गतीं=गज (ज्याला द्वि=दोन, रद=दांत असतात तो)+प्रभु+चालण्याच्या प्रकारें=हत्तीच्या गतीनें. २८. गजगती. २९. व्रजांतील (गोकुळांतील) कामिनी (स्त्रिया) गोपांगना. ३०. एकजण, एक गोपी.

त्यजुनि अशन आल्या, त्याचिया आननांत
केवळ हरिस त्याही पावल्या काननांत. ॥ ११

कृष्णगीत रुचतां श्रवणातें, कर्मकांड रुचि दे कवणातें? ।
भीक कां नृपतिनें उकळावी? या कथेंत अशि गोष्ट कळावी. ॥ १२

परिसतां व्रजराजकथारसा, मधुपचित्त वळे पदसारसा, ।
करिति कर्महि ते नर मागुती, हरि कथाचि तयां परमा गती. ॥ १३

कथारसीं चित्त निमग्न सारें, कर्में जडें सर्व तया असारें, ।
व्यस्त[13] होतो जिहिं तें करावें कां काननीं नीर[15] चिरें[16] भरावें? ॥ १४

सव्यें करूनि करितो पितृतर्पणातें, यज्ञोपवीत अपसव्य सुरार्पणातें. ।
देवां स्वधा म्हणवुनी यजितां वदे तो, स्वाहा म्हणूनि पितरां तिळपिंड देतो. १५

व्यस्त ऐसें करि कर्म सारें, ज्याला हरीचें श्रवणादि सारें, ।
आल्या तशा वेणुरवें करूनी, व्यत्यस्त वस्त्राभरणें धरूनी. ॥ १६

कटीं[23] शेले शाला कनकमय ओळीं मिरविती
शिरीं नेसायांचीं धरिति वसनें दिव्यें युवती; ।
पंखेवाळ्या नाकीं, श्रवणिं झळके नासिकमणी,
हरीतें जे पावे वरि भलतशी तेचि रमणी. ॥ १७

---

१. भोजन, भक्षण. २. घांस तोंडांत असतांच त्या कृष्णाकडे आल्या. ३. घांस. ४. वनांत. ५. कानातें. ६. यज्ञयागादि कर्में. (कर्मकांड, उपासनाकांड आणि ज्ञानकांड असे वेदाचे तीन भाग आहेत. कर्मप्रतिपादक जो भाग तो कर्मकांड.) ज्ञानकांड प्राप्त झाल्यावर मनुष्यानें कर्मकांडावर आसक्ति कां धरावी? धरूं नये व तो ती धरीतही नाहीं. ७. कवणातेंही रुचि देत नाहीं—असें उत्तर समजावें. ८. उकळणें=वसूल करणें, उघाई करणें. [मूळचा निर्धन असला तरी राज्यपद प्राप्त झाल्यावर मनुष्यानें भिक्षा काय म्हणून उकळावी=घरोघर जाऊन मागून घ्यावी? भिक्षा मागूं नये हें उत्तर.] ९. व्रजराज (कृष्ण) त्याच्या कथारसातें. १०. चित्त हें मधुप (भ्रमर) होऊन पदसारसाकडे (चरणकमळाकडे) वळतें. ११. सारस=कमळ. १२. उत्तम गति, सद्गति, मुक्ति. १३. विपरीत, उलट. १४. 'व्यत्यस्त होतें जरि तें करावें' असाही पाठ आहे. १५. पाणी. १६. वस्त्रानें. १७. अपसव्य करून सुरांचें (देवतांचें) तर्पण करतो. १८. देवांना हविर्भाग देतांना 'स्वधा' म्हणतात आणि पितरांस देतांना 'स्वाहा' म्हणतात. १९. तिलांजलियुक्त पिंड. २०. उलटें. २१. सारभूत. २२. ज्यांचीं वस्त्रें व भूषणें तेथें न घालतां. याचा खुलासा पुढच्या श्लोकांत आहे. २३. श्लोक ७ पहा. कटीं=कमरेंत. २४. जरीच्या काड्यांनीं युक्त असे शेले शाला. २५. नेसायाचीं दिव्य वस्त्रें डोक्यास गुंडाळलीं. २६. कानांतील अलंकार पंखवाळ्या. २७. नाकांतील नथ. [नासिकमणि—पूर्वी वामनाच्या वेळीं नाकांत नथ घालण्याचा प्रचार नसून नासिकमणि घालण्याचा संप्रदाय असावा असें दिसतें. आलीकडे ज्या

न[1] हो वीतरागी, धरी लोकरीती, हरिप्राप्तिविघ्नें अशीं जे करीती, ।
स्वमाता पिता बंधु संतान[2] वैरी[3] तयां मानिती अंतरे दानवारी[4]. ॥ १८
स्वजनवर्जित [5]जे हरिसेवनीं कुशल लंघुनि त्यांत वसे वनीं, ।
व्रजवधूगमनीं शुकवैखरी प्रकट गोष्टि अशीच वदे खरी. ॥ १९
पिता माता भ्राता स्वजन जरि गोपींस वैरजी[6],
तरी आल्या तेथें वनि कमलजाप्राणवर[7] जी! ।
हरीतें पावावें त्यजुनि सकळांतें शुभ जनीं
प्रवर्तावें ऐसें कुशल मतिनें[8] आशु[9] भजनीं. ॥ २०
आल्या अशा जवळि ज्या व्रजगोपदारा देणें असे सुखचि त्यांस तया उदारा; ।
ऐसें असूनि हि विपर्ययताचि[10] दावी, शब्दांत कीं स्वगतभक्ति तयीं वदावी.॥२१
'सभाग्या[11] हो! येणें मजजवळि हें उत्तम, परी
करूं[12] कैसें बोला प्रिय तुमचिया[13] ही तदुपरी; ।
व्रजें[14] स्वस्थ क्षेम प्रथम मज सांगाच सकळा,
कळावें '[15]कीं ऐशा पळत तुम्हि आल्यात विकळा[16]'. ॥ २२

---

प्रकारची नथ प्रचारांत आली आहे त्या प्रकारची नथ (जिला जोडी, लालडी, चौकडी, बहादुरी, तुरे (सर्जे), हलकडी इत्यादि सामान लागतें) वामनाच्या वेळीं खचित प्रचारांत नसावी. सोन्याचें सुकलें आणि त्यांत एक सोन्याचा मणि अथवा प्रवालमणि असला म्हणजे नासिकमणि झाला. तेव्हां कोठें प्रचारातीत पूर्वकालीन बिचारा नासिकमणि आणि कोठें प्रचारपवित्र सद्यःकालीन झुपकेदार नथ!]

१. जे स्वमाता पिता बंधु संतान वीतरागी (वैरागी, विरक्त) न हो (न व्हा) लोकरीती धरी (धरा) अशीं हरिप्राप्तिविघ्नें करीती तयां दानवारी (कृष्ण) अंतरे (अंतरला) [असें गोपी] मानिती. २. पुत्र. (श्लोक ८ पहा.) ३. निवारण करी, प्रतिबंध करी. ४. दानवांचा अरी. (कृष्ण.) ५. स्वजनाला टाकून विरक्त पुरुष हरिप्राप्तीसाठीं वनांत जाऊन राहतो तसें गोपींनीं केलें असें शुकाची वैखरी (वाणी) वदे. जे हरिसेवनीं म्हणजे हरीच्या भक्तीकरितां स्वजन वर्जितात, ते (ऐहिक) कुशल लंघुनि त्यांत (हरिसेवनांत) मग्न होऊन अरण्यांत राहतात. व्रजांतील बायका रात्रीं हरिदर्शनार्थ गेल्या अशी जी शुकोक्ति आहे तिचा तात्पर्यार्थ पूर्वोक्त अर्थात व्यक्त आहे असें हरि वदे. ६. आड येई, निषेधी. ७. कमलजा+प्राणवर=लक्ष्मी+प्राणपति=कृष्ण. ८. 'मती ह्यांच्या तेव्हां सकळ जडल्या आशु भजनीं' असाही पाठ आहे. ९. लौकर. १०. विपरीत भाव. ११. हे महाभाग्यसंपन्न गोपींनो. १२. श्लोक १८ पहा. १३. 'करूं कैसे बोला प्रियहि तुमचें एतदुपरी' असा अन्य पाठ आहे. १४. गोकुळांतील सर्व लोक कुशल आहेतना? [येथें 'व्रज' म्हणजे व्रजस्थ जन— असा अर्थ उपादानलक्षणेनें घेतला पाहिजे.] १५. तुम्ही येथें कोणत्या उद्देशानें आलां? १६. व्यथित, दुःखी.

म्हणे गोपिकांतें अघाचा [1]अराती, 'तुम्ही [2]गोजिऱ्या आणि हे घोर [3]राती, ।
जयांचा दिसे सूक्ष्म दृष्टीस [4]माज स्त्रियांचा असा या वनीं कां [5]समाज ? ॥ २३
करीती गजव्याघ्र मोठे [6]चपेटे, विषें [7]तक्षकाच्या भडाग्नीच पेटे; ।
मरे जो [8]भरे या वनीं आड वाटे तयाची तुम्हा काय हो! [9]चाड वाटे ? ॥ २४
यालागिं मूढपण हें सहसा त्यजावें, वेगें [10]व्रजासि परतोनि अगत्य जावें'. ।
काढी मुखामधुनि शब्द असा हरी तो जाणों तयां प्रबळ [11]अंतकसा [12]हरी तो. ॥ २५
मुखपणें [13]मुखइंदुचि बोलतो, परि करी [14]प्रळयार्कचि बोल तो, ।
म्हणुनि पाहति त्या न [15]तदानना प्रभु म्हणे, 'अवलोकिति [16]काननाः.' ॥ २६
'पहायासि आलों असों काननातें' अहा! वाटलें हें [17]मृगांकाननातें. ।
[18]असें त्यासि वाटे म्हणूनी हरी तो स्वशब्दार्थ दाऊनि चित्तें [19]हरीतो. ॥ २७
'[20]वनें विचित्र असें तुम्हि देखिलें, स्वहृदयीं [21]कुसुमांकित रेखिलें, ।
लखलखी परिपूर्ण [22]सुधाकरें [23]निववि जो अवघी [24]वसुधा [25]करें. ॥ २८
मंद वेग यमुनापवनाचे, [26]लोल पल्लव समीप वनाचे, ।
देखिल्या सकळ कौतुकरीती, ज्या मनास सुखहेतु करीती. ॥ २९
वन असें तुम्हि सुंदर पाहिलें, परि गृहीं गृहकारण राहिलें, ।
[27]हुडकिती सुत बंधु पिता पती, तडफडूनि [28]तुम्हांवरि तापती. ॥ ३०
हरिकडे न पहाति, चहूंकडे नयन चाळिति, तों [29]शरें रोकडे ।
हृदय भेदिति, यास्तव त्या वधू प्रभुसि पाहति कीं वधितो [30]विधू. ॥ ३१
जरी पावल्या दुःख पोटांत नारी, पहातीच सप्रेम त्या [31]पूतनारी; ।

---

१. अघासुराचा शत्रु. (कृष्ण.) २. सुकुमार, सुमध्यमा. ३. भयंकर रात्र. (श्लोक १९ पहा.) ४. कंबर. ५. समुदाय. ६. दुर्दशा अथवा नाश. चपेट=पंजा, पंजा मारणें, घाला घालणें. ७. सापाच्या. ८. शिरतो. ९. आवड. १०. गोकुळास. ११. यमाप्रमाणें. १२. जणूं काय तो हरीचा शब्द प्रबळ अंतकसा (बलाढ्य यमाप्रमाणें) तयां (त्या गोपांगनांला) हरी (ठार करी, संहरी), यांत उत्प्रेक्षा आहे. १३. त्या कृष्णाचा मुखइंदु (मुखचंद्रमा) बोलला. येथें रूपक केलें असून 'बोलतो' हें अनुरूपगुणविरोधक पद कसें योजिलें अशी कवीस आशंका येऊन तिचें निरसन 'मुखपणें' (तोंड या नात्यानें—या शब्दयोजनेनें) कवीनें केलें आहे. १४. प्रलयकाळचा सूर्य. १५. त्या कृष्णाच्या प्रलयार्कसदृश मुखाला. १६. वनाला. १७. चंद्रवदन कृष्णातें. १८. 'गमो त्यांस ऐसें म्हणूनि हरी तो । असे शब्द बोलोनि चित्ता हरीतो ॥' असाही पाठ आहे. १९. हरण करितो. २०. श्लोक २१-२२ पहा. २१. पुष्पांनीं मंडित असें. २२. चंद्रानें. २३. शांत करी. २४. पृथ्वी. २५. किरणानें. २६. लोल, चंचल. २७. शोधिती. २८. 'तुम्हांप्रति दापती' असाही पाठ आहे. २९. कृष्णाकडे पाहिलें असतां मदनशर (बाण) लागून हृदयभेद होई. ३०. कृष्ण चंद्र असूनही त्रास देतो. ३१. पूतनेचा शत्रु. (कृष्ण.)

अशांतें पुन्हा होय जे [1]शैल्यवाणी वदे ते न जीमाजि [2]कौशल्यवाणी. ॥ ३२

'अशा स्नेहीं माझ्या जरि खवळल्या, आशय असा,
तरी ध्यानीं कीर्ति श्रवण गुणगानीं तुम्हि असा; ।
अशी ध्यातां, गातां, श्रवण करितां, भक्ति कवळे
न तैशी कामानें मजजवळि अत्यंत विकळे. ॥ ३३

[3]होतो स्वधर्म, मज अर्पिति मान वाचा तो एक [4]यौग करि भक्तिसुखा नवाचा. ।
स्त्रीधर्म यास्तव तुम्हीं पहिले करावे, [5]संक्षिप्त भक्तिनिधि ते मग ऊतरावे[6]. ॥ ३४

निशिदिनिं पतिसेवेकारणें अंग [7]नाँचे,
[8]कपटरहित धर्म श्रेष्ठ ही अंगनांचे, ।
प्रिय जनहि तयांचें पोसणें [9]संततीचें
कुळ सफळ म्हणूनी मानिती [10]'संत तीचें.' ॥ ३५

बहुत धर्म तिचे कथिले [11]प्रियें, गमति तीं वचनें अति अप्रियें, ।
[12]सुरतभग्नमनोरथ झालिया, नयनिं [13]शोकनया [14]स्फुट आलिया. ॥ ३६

---

१. शल्याप्रमाणें टोंचणारी वाणी. २. कुशलतेची कमताई. ३. देवाला वाचा (वाणीनें) [वाचा हें संस्कृताप्रमाणें तृतीयेचें एकवचन होय.] मान अर्पिती–सन्मान दिला म्हणजे स्वधर्मोचि होतो. म्हणजे कृष्ण गोपीस म्हणतो कीं नुसता वाणीनें देवाला मान दिला असतां तो स्वधर्म होतो, अंगदानाची जरूरी नाहीं. तुम्ही मूर्ख म्हणून येथें आलां आहांत. स्वधर्म करणें हाच एक याग. स्वधर्मासारखें दुसरें यागसाधन नाहीं. तो एक (मुख्य) याग नांवाच्या भक्तिसुखाकरि– म्हणजे नऊ प्रकारची जी भक्ति आहे तिच्या सुखाला हा याग करी (उत्पन्न करितो, देतो.) म्हणजे नवविधा भक्ति करून जें सुख मिळायाचें तें सगळें त्या एका यागापासून (स्वधर्माचरणापासून) मिळतें. याकरितां तुम्हीं स्वधर्म म्हणजे स्त्रीधर्म (श्लोक ३५ त सांगितलेले) पहिल्यानें–प्रथमतः करावे, नंतर संक्षिप्त (एकवटलेले, संपुटांत आलेले द्वितीय चरणांत सांगितल्याप्रमाणें) भक्तिनिधी (निधी=द्रव्याचे खजिने. हे कुबेराचे निधी नऊ आहेत त्यांचीं नांवें:–'पद्मोऽस्त्रियां महापद्मः शंखो मकरकच्छपौ। मुकुंदकुंदनीलाश्च खर्वश्च निधयो नवः॥' इति शब्दार्णवः) हें उतरून पार जावें. म्हणजे तें कार्य सुकर व सुखकर होईल. या पद्यांत 'याग'स्थानीं 'योग' असा पाठ आहे. हा पाठ घेतला तरी चालेल. वर जेथें जेथें 'याग'शब्द आला आहे तेथें तेथें 'योग' हा शब्द घातला म्हणजे अर्थ नीट जुळतो. ४. 'योग' पाठांतर. ५. 'निक्षेप' पाठभेद. ६. 'संक्षिप्त भक्तनिधितें मग ऊकरावें' असा एक पाठ आहे. ७. चाले, परिश्रम करी. ८. पतिसेवेसाठीं शरीरश्रम करणें हे अंगनांचे (स्त्रियांचे) श्रेष्ठ धर्म होत. (अध्याय २९ श्लोक २४ पहा.) ९. अपत्यांचें पोषण करणें. १०. त्या अबलेचें कुल सफळ झालें असें साधु मानतात. ११. कृष्णें. १२. मनांतील सुरतेच्छा विफळ झाल्यामुळें. १३. शोकानें अश्रूंच्या नद्या. १४. व्यक्त, स्पष्ट.

ऐकूनि हे प्रियमुखें सुखहीन वाणी[1], केली रडोनि वदनें अतिदीनवाणी[2], ।
चिंताब्धिमग्न[3] मन भग्नमनोरथानें निःकुंकुमें[4] करि सकज्जल नीर[5] थानें[6]. ॥ ३७
ज्या कारणें त्यजिति सर्वहि गोपदारा[7], तो शत्रुतुल्य वदतो प्रिय त्या उदारा; ।
सप्रेमकोपसहिता[8] पशुपाळकांता[9] हें बोलती पुसुनि नेत्रजल स्वकांता[10]. ॥ ३८

'अहा हो! गोविंदा! वचनशर[11] हे भग्न हृदया
करीती थे वांचे[12], न दिसति तुझ्या योग्य, सदया! ।
पदांपाशीं आलों, त्यजुनि अबळा[12] सर्व विषयां[13],
न आम्हा या योग्या अतिकठिण गोष्टी सविनया[14]. ॥ ३९

आलोंचि ज्या, त्यजुनि सर्व, तुतें वराया, त्यांशीं कसा वदसि अप्रिय? देवराया!
जैसे मुमुक्षु[15] जन सेविति वासुदेवा, तैशाच कीं भजतसों तुज वामसु[16] देवा[17]! ४०
तरि मुमुक्षु[15] जनासि दया करीं, युवति या धरिं, रे! सदया! करीं[18]; ।
न[19] धनमुक्तिचिही बरि कामना तुजविणें छळिती हरि! कां मना? ॥ ४१
आतां स्त्रियांस पतिपुत्रजनानुवृत्ती[20] धर्मज्ञ[21]! तूं वदसि धर्मपथप्रवृत्ती[22], ।
तो तूंचि सर्व जगदीश[23] गुरु विशेष जालासि; तें तव पदींच पडो अशेष[24]. ४२
चर अचर तरंग[25], श्रीगुरु[26] सिंधु[27] सारा, तरि इतर जडत्वें भाविजे कां पसारा[28]?।
म्हणुनि म्हणति गोपी, 'तूं गुरु देवराया! पति सुत[29] पद तूझें तेचि हो! दे वरा या.'

---

१. भाषण. २. गरीबासारखीं. ['वाणा' हा प्रत्यय विशेषणास लागून त्यापासून सादृश्यबोधक अथवा न्यूनतार्थक दुसरीं विशेषणें होतात; जसें काकळूतवाणा, दीनवाणा, काजिरवाणा, केविलवाणा.] ३. चिंतासागरांत बुडालेलें. ४. केशररहित. ५. पाणी. ६. स्तन. स्तनावरील केशराची उटी अश्रुप्रवाहानें धुऊन गेली—असा भाव. ['शृंगारी पुरुष स्वहस्तानें कुंकुम केशरादि सुगंध द्रव्यांनीं आपल्या प्रियांच्या स्तनगळावयवांवर मकरपत्राकार वेलबुट्टी काढितात' असें वर्णन संस्कृत शृंगाररसप्रधान काव्यांत पुष्कळ आढळतें.] ७. गवळिणी. ८. प्रीति आणि कोप यांनीं युक्त अशा. ९. आपल्या प्रभूला. (कांत=भर्ता, पति.) १०. वाग्बाण. ११. या वाणीनें. १२. बळहीना, आश्रयरहिता. १३. समस्त ऐहिक सुखविषयांचा त्याग करून. १४. 'सविष या' असा अन्य पाठ. १५. मोक्षेच्छु. १६. सुंदर स्त्रिया. १७. 'तुज देवदेवा!' असा अन्य पाठ. १८. करीं धरिं=आश्रय दे, हातांत धरून (पाणिग्रहण करून) आश्रय दे. १९. 'न धरुं मुक्तिचिही परि कामना, तुजविणें छळिती हरि कां मना' असा अन्य पाठ. २०. पति, पुत्र इत्यादि जनांशीं त्यांच्याप्रमाणें वर्तन. २१. अध्याय २९ श्लोक ३२ पहा. २२. धर्ममार्गानुसरण. २३. जगताचा स्वामी. (पतिपुत्र इत्यादिकांचा आधारभूत ईश.) २४. सकल, सर्व. २५. लाटा. चराचर पदार्थ हे श्रीगुरुसागराचे तरंग होत. २६. श्रीगुरु हा सिंधु (सागर) होय. २७. समुद्र. 'सिंधुराया' असा पाठभेद. २८. 'तराया' असा पाठभेद. २९. तुझें पद हेंच आम्हास पति सुत होय. यास्तव हे देवराया! तेंच पद वराया दे.

धरुनि अद्वय[1] आश्रय कामिनी निजगळां पडती गजगामिनी. ।
'म्हणसि तूं जरि हें भजले असें' भजनमार्ग अनादिच[2] हा असे. ॥ ४४
दुःखापदा त्यजुनि सर्व गृहक्रतूतें[3], नित्य प्रिया भजति संत अवक्र[4] तूतें ।
एवं दिला वर कृपा बरि तेचि साची, कां छेदिशी तुझिच आस[5] बहु दिसांची ?॥
स्वर्गासि रक्षक मुकुंद तसा व्रजाला[6] हा विश्वमंगल[7] तुझा अवतार जाला; ।
यालागिं 'ठेवुनि करा[8] अभयप्रदासि तप्त[9] स्तनीं शिरिं हि,' या विनवीत दासी.॥
गृहस्थांच्या दारा[10] त्यजुनि गृहदारा[11] स्वबटकी[12]
फुका कां होती या म्हणुनि हरि! हो! गोष्ट लटकी ।
झणी मानी ऐसें मनिं भिउनि गोपी झडकरी[13]
तुझें रूपें केल्या म्हणति गरती या विधिकरीं. ॥ ४७
वक्त्र[14] [15]मंडित सुरत्नकुंडलीं[16], तेज तें उभयगंडमंडलीं[17], ।
देखतां सरळ रम्य नासिका[18], होतसों फुकट[19] सर्व दासिका. ॥ ४८
अधर [20]शोणित पातळ चांगले खदिरपर्णरसें[21] अति रंगले, ।
अमृत[22] इच्छुनियां दिनयामिनी[23] बटकि होत असों व्रजकामिनी[24]. ॥ ४९
भ्रमर वाटति केशचि मस्तकीं[25], मुखसरोरुहलंपट[26] मस्त[27] कीं, ।
सरस हास्य [28]निरीक्षण जें करी वदन[29] तें करितें अजि किंकरी[30]. ॥ ५०
रक्षिले शरण लोक उदंड[31] ते हरी! अजि तुझे भुजदंड ।
योजिति स्मर[32] मनीं प्रमदांसी[33] होतसों फुकट यास्तव दासी. ॥ ५१

---

१. समस्त जगत् ब्रह्मभिन्न नाहीं—असा भाव. २. फार प्राचीन. ३. गृहयज्ञातें, गृहकृत्यातें. ४. सरल. ५. आशा. ६. गोकुळाला. ७. विश्वास शुभप्रद असा. ८. तुझे शीतल व अभयप्रद कर आमच्या तप्त स्तनीं व शिरीं ठेव. (श्लोक ४१ पहा.) ९. स्मरसंतप्त. १०. स्त्रिया. ११. घरदार. १२. तुझ्या दासी. १३. सत्वर. १४. मुख. [वच्+त्र=बोलण्याचें साधन. 'त्र' हा प्रत्यय धातूस लागून त्यापासून क्रियेचें साधन अशा अर्थाचीं नपुंसकलिंगी नामें होतात:—जसें नेत्र (नेण्याचें साधन), शस्त्र (तोडण्याचें साधन), शास्त्र (उपदेश करण्याचें साधन), स्तोत्र (स्तुति करण्याचें साधन), तोत्र (इजा देण्याचें साधन—चाबूक), सेक्त्र (पाणी—शिंपडण्याचें साधन—शेलपें). अशींच दुसरीं उदाहरणें आहेत.] १५. भूषित. १६. रत्नखचित कर्णभूषणांनीं. १७. उभय गालांवर. १८. नाक. १९. हें सर्व पाहून आम्ही तुझ्या दासी झालों आहों. (श्लोक ३९ पहा.) २०. लाल. २१. कात व पान यांच्या रसानें. २२. तुझें अधरामृत. २३. दिवसरात्र. २४. गोकुळवासी स्त्रिया. २५. तुझ्या मस्तकावरचे केश हे भ्रमर होत असें वाटतें. २६. मुखकमलाचे ठायीं लुब्ध. २७. मातलेले. २८. पाहाणें. २९. जें तुझें वदन मनोरम हसित आणि निरीक्षण करतें तें आज आम्हांस तुझ्या दासी बनवितें. ३०. दासी. 'वदन तें अजि या स्तवि किंकरी,' 'वदन तें, अजि ! यास्तव दासी' असे पाठभेद आहेत. ३१. पुष्कळ. ३२. मदन. ३३. हे तुझे भुजदंड स्त्रियांच्या मनांत मदन उत्पन्न करतात.

या सुंदरा देखुनियां उरा[1] रे! दासी[2] नव्हे कोण? हरे मुरारे! ।
शोभेस त्या लुब्ध रमा रमाया तूझी अजी नंदकुमार! माया. ॥ १२
ज्या अशा त्वदधरामृतदासी जाळिशी[3] स्मरदवें[4] प्रमदांसी. ।
नेदिशी[5] जरी जितामृतलाहो[6] मेलियावरि धरूं तुजला, हो! ॥ १३
जालिया फुकट ज्या निजदासी, जाळितोसि हरि! त्या प्रमदांसी. ।
या मरोनिहि तुलेंचि धरीती, हे नव्हे, हरि! तुझी सुधरीती[7]. ॥ १४
स्मरण मरणकाळीं सद्य[8] होतांचि वाचे,
परमपद[9] पदातें नेति ज्या माधवाचे, ।
स्मरत मरत आहों त्यासि त्यांचे वियोगें
तरि गति हरि! आम्हां योगिया जेंवि योगें[10]. ॥ १५
तुझ्या गोडा गीतीं हसित अवलोकीं[11] उजळतो[12]
तया कामाग्नीनें व्रजजनवधूवृंद[13] जळतो, ।
म्हणुनी जी! पाजीं त्वरित अधराच्या स्वअमृता[14],
वियोगाग्नीनें जों नव्हति तुझिया भस्महि मृता[15]. ॥ १६
'स्मरहुताशन[16] हे तुमचे पती विझविती,' म्हणशील[17] रमापती! ।
तरि तुझें पद हें जइं देखिलें, न तइंपासुनि ते प्रिये[18] लेखिले. ॥ १७
मुखसुधारस[19] टाकुनि कां मना मृगजळीं उपजे अजि कामना[20]? ।
म्हणुनि पाजुनियां अधरामृता जिववि, सत्वर अद्रिधरा[21]! मृता. ॥ १८

---

१. वक्षस्थळा. 'शरीरीं' असा पाठभेद आहे. २. दासी कोण होणार नाहीं? सर्वच दासी होतील--असें उत्तर समजावें. ३. 'गाळिशी स्वहृदयें प्रमदांसी' असा पाठभेद आहे. ४. मदनाग्नीनें. ५. 'नेदिसी जरि जितां निजलाहो' असा अन्यपाठ. ६. जितांला अमृताचा लाभ. ७. सुजनाची आचरणपद्धति. ८. 'शब्द' असाही पाठ आहे. ९. ज्या माधवाचे पद परमपदातें (मोक्षातें) नेति--असा अन्वय. १०. श्लोक ३५ पहा. ११. सुहास्य अवलोकनानें व मधुर गायनानें. (श्लोक ३५ पहा.) १२. प्रज्वलित होतो, पेट घेतो. १३. गोकुळांतील स्त्रीसमूह. १४. यास्तव अहो, आपल्या अधरामृता त्वरित पाजा. १५. तुमच्या वियोगानें मृत होऊन भस्म झालों नाहीं तों अधरामृत पाजा. अधरामृत देऊन कामाग्नि विझवून टाका--असा भाव. १६. मदनाग्नि. १७. तुमचे पति तुमचा कामाग्नि शांत करतील असें जर आशंका घेऊन म्हणशील तर. १८. ते पति प्रिय मानिले नाहींत. १९. मुखामृतसागर. 'सुखसुधारस' असा पाठभेद. २०. इच्छा. २१. गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्या. ['ज्या काळीं इंद्रानें अतिवृष्टि करून गोकुळ बुडविण्याचें भय प्रदर्शित केलें, आणि जेव्हां त्या भयानें सर्व व्रजवासी लोक कृष्णाला शरण आले, त्याकाळीं दयार्द्रांतःकरण होत्साता त्यानें गोवर्धन पर्वत आपल्या कनिष्ठिकेच्या अग्रभागीं छत्राप्रमाणें धरून त्याच्या अधोभागीं त्यांचें रक्षण केलें; आणि तेव्हांपासून तो 'गोवर्धनधारी' असें प्रसिद्ध नाम पावला या पुराणप्रसिद्ध कथेचें येथें अर्थसंदर्भानें अनुसंधान केलें आहे.]

'पर नर जरि गातो गोड तो चांगला ही
न करिति कुलनारी आपुली [1]अंगलाही.' ।
[2]म्हणशिल, तरि कोण स्त्री तुतें जी न [3]मोहे ?
इतरपुरुषवार्ता देवदेवा! नमो हे. ॥ ५९
तुझ्या या [4]वेणूचा ध्वनि मृदु [5]जगन्मोहन मनीं,
निघे जीच्या ते स्त्री कवण असि जे मोह न [6]मनी ? ।
जया रूपें गाई मृग तृण अगाई! [7]विसरती,
[8]कुळाचारी नारी तुजविण हरी! केंवि [9]सरती ? ॥ ६०
[10]अनायासें चित्तें हरुनि म्हणसी 'जा [11]स्वसदना'
कसें जावें? सांगा, त्यजुनि मन, जी! [12]इंदुवदना! ।
न तूं राहूं देशी, न पद चळतें पाउल, हरी!
कसें जावें ऐसें तरि अजि! म्हणावें 'हरि हरी'. ॥ ६१
खुपेल हा शब्दचि जेंवि कांटा, म्हणेल 'येथूनि तुम्ही [13]निघा.' ।
यालागिं पोटांतिल कोप जाया [14]काकूळती बोलति गोपजाया. ॥ ६२
चित्तें जया ये स्थळिंहूनि जावें, चित्तें जया भर्तृसुखा भजावें, ।
तें चित्त चित्तें अवघें हरूनी कां 'जा' म्हणावें [15]हटे हा धरूनी ? ॥ ६३
जाऊनि गेहीं गृहकृत्य कांहीं करावया शक्ति करांदिकांही ।
चित्तेंचि येते, परि ते हरूनी कां 'जा' म्हणावें हट हा धरूनी ? ॥ ६४
'ये स्थळींहुनि कशा तरि जाच' स्वामि! तूं करिशि हा जरि [16]जाच, ।
पाय [17]पाउल न येथुनि जाती, चित्तहीन [18]विषयेंद्रियजाती. ॥ ६५
[19]स्वकर्म हें याहि कुळीं कराया, चित्ताविणें शक्ति न, देवराया! ।
आतां अजी! काय तरी करावें, मार्गी तरी जी! कवण्या [20]भरावें ? ॥ ६६
[21]अघटित हरि! आतां तूजपासूनि जाणें,
तदपि करणि तूझी आयकावी सुकानें, ।

---

१. आपल्या अंगाचा संताप. २. असें--पहिल्या दोन चरणांत वर्णिल्याप्रमाणें--जर म्हणशील तर. ३. भुले, तुला पाहून मोह पावे. ४. मुरलीचा. (श्लोक ४० पहा.) ५. विश्वमोहक. ६. मानीत नाहीं. ७. तुझें रूप पाहून गाई आणि पशु यांस देहभान नाहींसें होतें. ८. स्वकुलाचारास अनुसरून वागणाऱ्या नारी. ९. व्यवहार करिती, संसारधंदा करिती. १०. सहज, श्रमावांचून. ११. आपल्या गृहास जा. १२. चंद्रमुखा. (कृष्णा.) १३. निघून जा. १४. काकूळतीनें, करुणस्वरें, काकळूत करून. १५. आग्रह. १६. त्रास, पीडा. १७. पाऊलभर सुद्धां. १८. विषय आणि इंद्रियें यांची जाती चित्तहीन (जड) आहे. १९. 'स्वकर्म पादादि कुळीं कराया' असाही पाठ आहे. २०. शिरावें, जावें. २१. अशक्य.

चळति[1] चरण तूझे, चित्त तें जो हरी तो
निजपद तिकडे ही जीकडे श्रीहरी तो. ॥ ६७
न येथूनी जेव्हां ढळत पद, येथें तुम्हि असा[2],
'स्वयें जातों वेगें[3]' म्हणुनि पळशी तूं जरि असा, ।
तुझ्या पायीं चित्तें चलन तुज संगेंचि चरणा,
न सोडों जी! तूतें, त्यजसिल कसा सांग शरणा? ॥ ६८
धावों सवें, तूं जरि तीव्र जासी, परंतु जाऊं न कधीं व्रजासीं[4], ।
कीं देहचक्रा[5] हरि चित्त दोरी, शिंक्यासवें जेंवि फिरे शिदोरी.' ॥ ६९
हे आयकूनि शरणागति कामिनींची[6], देखूनि भक्ति मंदकुंजरगामिनींची[7], ।
हांसे[8], दयें करुनियां सकळांस पाहे, त्यांशीं रमे[9]; करि रमेहुनि कीं कृपा[10] हे. ७०
सदयहृदय जेव्हां कृष्ण गोपींस पाहे,
विकसित[11] मुखपद्में[12] होति, होतां कृपा हे, ।
उडुपतिसह[13] तारा[14], येरिती गोपदारा[15],
मिरवति यदुवीराभोंवत्या त्या उदारा[16]. ॥ ७०
कृष्ण गायनविलासकलांतें[17], त्यांस[18] दावित असे सकळां तें[19], ।
वेढनी फिरतसे गजरानें[20], हस्तिनींसह जसा गज रानें[21]. ॥ ७१

---

१. जातात, चालतात. २. रहा, वसति करा. ३. सत्वर. ४. गोकुळीं. ५. चाकास जशी दोरी ओढते त्याप्रमाणें देहास चित्त ओढतें. जिकडे आमचें चित्त तिकडे आमचा देह. ६. स्त्रियांची. ७. मत्त हत्तींसारखी मंद आहे गति ज्यांची अशा कामिनींची. ८. या श्लोकांत हांसे, पाहे, रमे करि, हीं क्रियापदें आहेत, त्यांचा प्रयोग रीतिभूतकाळीं नसून शुद्ध भूतकाळीं केला आहे. असा फरक गद्यात्मक आणि पद्यात्मक ग्रंथभाषेंत वारंवार आढळतो. "मराठी गद्यात्मक ग्रंथांतल्या व कवितेंतल्या क्रियापदांत तर पुष्कळच भेद आहे. कवितेंतल्या क्रियापदांचीं रूपें केवळ निराळीं असतात इतकेंच नाहीं, तर क्रियापदांचें एकच रूप गद्यात्मक ग्रंथांत व कवितेंत भिन्नभिन्न काळीं असतें. गद्यात्मक ग्रंथांत ज्याकाळीं जो प्रयोग मुळींच होत नाहीं, किंवा क्वचित् आढळतो, तो कवितेंत पुष्कळ वेळ आढळतो." (पद्यरत्नावली–पृष्ठ ८६-८७ पहा.) ९. सप्रेमांतःकरणानें वागे, वनविहार करी. १०. त्या कामिनींवर लक्ष्मीपेक्षां अधिक कृपा करी. ११. प्रफुल्लित. १२. मुखकमलें. १३. उडु+पति=नक्षत्र+स्वामी. चंद्र. १४. नक्षत्रें. १५. गवळ्यांच्या स्त्रिया. १६. अध्याय २९ श्लोक ४३ पहा. १७. कृष्णाचें गाणें व विलास या विषयीं ज्या उत्कंठित आहेत अशांतें. १८. त्या गोपींला. १९. सर्व स्त्रियांतें. २०. गजर करुन, जयजयकार करुन. २१. अध्याय २९ श्लोक ४४ पहा.

[1]स्त्रीवृंद [2]आधिन करून मनांत टाकी, आणी तयां हरि अशा [3]यमुनातटाकीं, ।
[4]जेथें [5]समीर सुख दे [6]स्थिरजंगमाला, सेवूनियां [7]कुमुद मंद [8]तरंगमाला. ॥ ७२

दाखवी [9]स्मरविलासकळांतें, कोण वर्णिल तयां सकळांतें? ।
[10]चेतवी मदन तृप्त करूनी, [11]बाळचंद्रकरजीं [12]उकरूनी. ॥ ७३

आत्मत्वयोग परिपक्कहि दक्ष जाला, होवोनि तृप्तहि भजेच अधोक्षजाला. ।
कामाग्नि येरिति विझोनि [13]रतिप्रसंगें, पेटे पुन्हा त्वरित [14]माधवविप्रसंगें. ॥ ७४

क्रीडेंत जे सुरत[18]संभ्रमभाव दावी, ते [15]कामशास्त्रगति काय [16]विभा वदावी? ।
संक्षेपरूप म्हणऊनिच ते शुकानें, [17]श्लोकैकमात्र कथिली रतिकौतुकानें. ॥ ७५

इत्यादि देतां [19]रतिरंगलाहो, गोपींस वाटे, 'हरि रंगला, हो! ।
आम्ही [20]सुरूपा त्रिजगांत नारी, हा मोहला वास्तव [21]पूतनारी.' ॥ ७६

मनींच इत्यादिक गर्व झाला, या गोष्टिचा देव न तो भुकेला. ।
हा गर्व जेथें न वसे हरी तो, सा शत्रु [22]कामादिक जो हरीतो. ॥ ७७

त्यांचा [23]हरावा [24]मगें गर्व सारा, तेव्हां गमे यारिति [25]विश्वसारा, ।
[26]अदृश्य त्यांच्या नयनांसि जाला, [27]कीं गर्व सोसे न अधोक्षजाला. ॥ ७८

बहु धन [28]अधनाचें हारपे सांपडूनि,
त्यजुनि सकळ धुंडी मोहफासां पडूनी, ।
हरिविण [29]हरिपीसें लागलें कामिनींतें
करुनि हरिचरित्रें [30]कंठिती [31]यामिनींतें. ॥ ७९

---

१. स्त्रियांचा समूह. २. स्वाधीन. ३. अध्याय २९ श्लोक ४५ पहा. ४. 'संतोष दे हरि अशा स्थिरजंगमाला' असाही अन्य पाठ आहे. ५. वायु. ६. चराचरांला. (पृष्ठ १८२ टीप ३ पहा.) ७. कमल. ८. लाटांची पंक्ति. ९. मदन. १०. जागृत करी. ११. बालचंद्राप्रमाणें (प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें) शोभणाऱ्या करजांनीं (नखांनीं). १२. अध्याय २९ श्लोक ४६ पहा. १३. सुरतसमयीं. १४. कृष्णरूपी ब्राह्मणाच्या समागमानें. 'माधवअंगसंगें' असाही पाठ आहे. १५. कामशास्त्रनिपुणता. [श्रीवात्स्यायनप्रणीत 'कामसूत्र' नांवाचा ग्रंथ कै० महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद यांनीं प्रसिद्ध केला आहे अशासारख्या कामशास्त्रप्रतिपादक ग्रंथांतील रहस्यांची अध्ययनानें आणि अनुभवानें प्राप्त होणारी माहिती–निपुणता.] १६. तेज, सौंदर्य. 'किती वदावी' असा अन्य पाठ. १७. एका श्लोकांत मात्र. १८. 'संभ्रमानें' असाही पाठ आहे. १९. रतिसुखाचा लाभ. २०. रूपवती, लावण्यवती. २१. पूतनेचा शत्रु. (कृष्ण.) २२. कामादिक षड्रिपु–काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर आणि मोह. २३. अध्याय २९ श्लोक ४७-४८ पहा. २४. 'मद' असा अन्य पाठ आहे. २५. सर्व जगताचें सार असा. (कृष्ण.) २६. गोपींचा गर्व कमी करावा म्हणून तो कृष्ण तेथेंच गुप्त झाला. २७. कारण. २८. निर्धनाचें. २९. कृष्णाचें वेड. ३०. घालवितात, लोटितात. ३१. रात्रींतें.

मिळूनि गाती सकळा हरीतें, गाणें जयाचें अशुभा [2]हरीतें; ।
[1]या नंतरें त्या [4]व्रजगोपदारा रात्री वनीं [5]धुंडिति त्या उदारा. ॥ ८०

'वदें हो! [6]कल्याणी! हरिचरणगोडी [7]अतुळसी
दिसे तूझ्या ठायीं, म्हणुनि पुसतों, माय! तुळसी! ।
तुझी माला कंठीं [8]भव[9]कलभ[10]कंठीरव धरी,
असे कोठें जाळी [11]अनल विरहाचा हरि [12]हरी. ॥ ८१

जैसा तरंगांत समुद्र साचा, प्रपंच ऐसा निज चिद्रसाचा, ।
त्या धुंडिती त्या पुरुषोत्तमातें, दावा म्हणूनी पूसती [13]द्रुमातें. ॥ ८२

रे चंपका! [14]कुरबका! तिलका! अशोका! छेदा अरे त्वरित कृष्णवियोगशोका,
जो दे तुम्हांसि सुख लावुनियां करातें, दावा तया स्वसुख[15]सिंधु[16]सुधाकरातें.'॥८३

कोणी तयांत अबला पुसते [17]क्षितीतें, रोमांचरूप दिसतो तृणवृक्ष जीतें ।
कीं [18]कृष्णपादतळ लागलिया विना ही होणार जें सुख, असें घडणार नाहीं. ॥

'तूझ्या तपा न [19]तुलना क्षिति! लेश वाचे [20]मोजूनि पाय जिस लागति केशवाचे,
जो [21]स्पर्शउत्सव मनांतिल भाव दावी, प्रेमांकुरीं तनुचि ही किति [22]भा वदावी?॥
[23]गोवर्धनस्तनतटीं हरिच्या पदातें स्पर्शोनि दाविसि अशा [24]तनुसंपदांतें, ।
पाय [25]त्रिविक्रमपणीं तइं तूज लागे, हें काय तें सुख पुसों, क्षिति! तूजला, गे!
कृष्ण त्रिविक्रमतनूद्वयपाद[26]पद्मा तूं स्पर्शलीस करि वास जयांत [27]पद्मा, ।
किंवा [28]वराहपणिं हें सुख पावलीस? आलिंगनें करुनि फार सुखावलीस.'॥८७

---

१. अध्याय ३० श्लोक ४ पहा. २. संहार करतें. ३. 'उन्मत्त रीती' असा पाठ आहे. ४. गवळणी. ५. शोधिती. ६. कल्याणकारिणी (तुलसी). [अध्याय ३० श्लोक ७पहा.] ७. जीस तुलना नाहीं अशी. ८. संसार. ९. कलभ=हत्तीचा छावा. १०. सिंह. संसाररुप गजबालकाचा हंता सिंह. (कृष्ण.) ११. अग्नि. १२. याप्रमाणें गोपी तुळसीला कृष्ण कोठें पाहिलास काय असें विचारतात. १३. वृक्षांतें. १४. अध्याय ३० श्लोक ६ पहा. १५. समुद्र. १६. चंद्र. [तुमच्या सुखसागरास सुधाकराप्रमाणें (चंद्राप्रमाणें) वृद्धि करणारा.] १७. पृथ्वीतें. (श्लोक १०पहा.) १८. ज्या गोपीला पृथ्वीवरील तृण वृक्ष हे रोमांचाप्रमाणें वाटले ती पृथ्वीला विचारते–श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शावांचून तुला रोमांचदर्शन-सुख झालें नाहीं, तेव्हां तो कोठें आहे हें तुला विदित आहे. १९. बरोबरी. २०. वामनावतारांत तीन पावलें भूमि मोजून घेतां. [वामनावतारीं विरोचनात्मज बळीपासून त्रिपाद भूमिदान घेण्याच्या समयीं भगवंतांनीं बळीच्या मस्तकावर पदन्यास करून त्यास पाताळीं बसविलें–इत्यादि कथा सुप्रसिद्ध आहे.] २१. स्पर्शसुख. २२. शोभा. २३. गोवर्धन पर्वत हा पृथ्वीचा स्तन होय. २४. तृण वृक्ष इत्यादि शरीरवैभवातें. २५. वामनावतारीं. २६. कमल. २७. लक्ष्मी. २८. वराहअवतारीं. यज्ञसूकरतनु धारण करून आपल्या दाढेच्या अग्रभागानें पृथ्वी उचलून धरिली–या कथेवर कविकटाक्ष आहे.

अशा छुंडिती तों लता एक वाटे, दिसे तीस तो ठाउका कृष्ण वाटे, ।
फुलें खुंडिलीं कृष्णजींनीं सदैवें नखस्पर्श केला म्हणे ईस देवें. ॥ ८८
नखें आपणा स्पर्शतां कैटभारी गुढ्या देहिं रोमांचरूपें उभारी, ।
लतेच्या शरीरासि कांटे स्वभावें म्हणे ते नखांच्या सुखाच्या प्रभावें. ॥ ८९
तरू नम्र भारें फळापल्लवांच्या, तया पूसती त्या स्त्रिया वल्लवांच्या, ।
असें कां करीतां तया वंदनातें? दुरूनीच नंदाचिया नंदनातें. ॥ ९०
असें धुंडितां देखिले पाय त्याचे वनीं आत्मयाच्या प्रिया आत्मयाचे, ।
निशा चांदणी पादविन्यासमुद्रा पहाती स्मरूनी तया चित्समुद्रा. ॥ ९१
'अगाई ! कृष्णाचे चरणतळ हे कीं मिरवती,
ध्वजी पद्मी वज्री करुनि म्हणती सर्व युवती; ।
अचित्याच्या पायांविण परम चिन्हेंचि नसती'
अशी जे ते बोले भरुनि उदकें लोचन सती. ॥ ९२
उत्पन्न येथें जलजाक्ष झाला, जाणों तदारम्य अधोक्षजाला, ।
तो आमुचा नंदकुमार साचा, हा मार्ग त्याच्या पदसारसाचा. ॥ ९३
जो रेणु दुर्लभ सुरांसि महा उपायीं, देखूनि ते धरणि मंडित कृष्णपायीं, ।
अन्योन्य त्या वदति दुर्लभलाभवार्ता, आरोग्य ज्या श्रुतिसुखें करिती भवार्ता. ॥
चरणरज सयां हो! धन्य या श्रीपतीचें,
शिरिं धरुनि कृतार्था होतसे श्री पतीचें, ।
भवकमलभवादी आपुला ताप जाया
मिरविति मुकुटीं तें लाधलों गोपजाया. ॥ ९५
वदति गौळणि येरिति लोळती, हरिपदाब्जरजीं अजि! लोळती, ।

१. अध्याय ३० श्लोक १३ पहा. २. मार्गात. ३. 'फुलें तोडितां बापुडीचीं सदैवें' असा पाठभेद. ४. कैटभ दैत्याचा शत्रु. (कृष्ण.) ५. आनंददर्शक ध्वजतोरणें. ६. लतांचे कांटे हेच रोमांच भासले. ७. अध्याय ३० श्लोक १२ पहा. ८. गवळ्यांच्या. ९. पायांचें ठेवणें. १०. खुणा. ११. कृष्णा. १२. 'अगाई' हें आश्चर्यद्योतक केवळप्रयोगी अव्यय होय. याचा प्रयोग बहुधा स्त्रिया व मुलें यांच्या भाषणांत फार होत असतो. 'अगाई' हें 'अगे आई' याचें संक्षिप्त रूप होय. १३. ध्वज, पद्म, वज्र इत्यादि चिन्हांनीं युक्त. १४. तरुणी. १५. 'असीं त्याच्या' असाही पाठ आहे. १६. डोळे. १७. कमलनेत्र. (कृष्ण.) १८. त्यावेळेपासून जाणतों. १९. पदकमलांचा. २०. रज:कण. २१. पृथ्वी. २२. भूषित. २३. एकमेकींस. २४. संसाररोगानें पीडितास. २५. हे सख्यांनों. २६. सफलेच्छ. २७. लक्ष्मी. २८. शिव. २९. ब्रह्मदेवादि. ३०. 'प्रीतिनें' असाही पाठ आहे. ३१. चरणरज. ३२. पदकमळांच्या धुळींत.

बसति मागुति विस्मित बोलति, त्यजुनि शब्द मुखें मग डोलती. ॥ ९६
असें धुंडितां धुंडितां त्याच मार्गें, पदें दूसरीं देखिलीं त्याच मार्गें, ।
हरीच्या पदाच्या रजा[1]चेचि संगें वधूचीं पदें देखिलीं त्या प्रसंगें. ॥ ९७
दुःखाग्नि[2] जों किमपि कृष्णपदीं विझाला[4], तों दीप्त मत्सर समीर[3] समीप आला; ।
गोष्टी मुकुंदपदभक्तिचिया उडाल्या सापत्नमत्सरजळीं[5] युवती बुडाल्या. ॥ ९८

अहाहा ! हें प्राहा, अमृत[6] मथितां तें विष महा
उदेलें, कीं जाला सम सदय आत्मा विषम[7] हा. ।
समा आम्हीं रामा[8] चतुर अभिरामा[9], परि हरी
रमे तो एकीशीं, लपत मग आम्हां परिहरी[10]. ॥ ९९

लपत तों अबळा सकळा वधू[11] वधे[12] हि तो बरवा[13], परि हे वधू ।
गिरिधराधर[14] एक[15] फुंका[16] पिते, स्वपद[17] दावुनि काळिज कापिते. ॥ १००
हरिपदीं पथ[18] जो विमल[19] क्षिती चरण त्यांतचि त्या सम लक्षिती[20], ।
निकट[21] चालतसे गजगामिनी, म्हणुनि तर्क उभारिती कामिनी. ॥ १०१
'बहु इणेंचि असे हरि पूजिला, सवतिरूप दिसे न रिपू[22] जिला[23]; ।
त्यजुनियां[24] सकळा व्रजनायिका[25] परम जे रुचली व्रजनायका[26].' ॥ १०२
पुढें पाय [27]तीचे न [28]देखोनि वाटे[29] 'कडे घेतलीसे' असें त्यांसि वाटे, ।
हरीची पदें रुतलीं खोल भारी, गमे भार वाहे तिचा कैटभारी[30]. ॥ १०३
पद तिचे न दिसेति अलीकडे, तरि असेलचि बैसविली कडे, ।
उचलिली मनिं मानुनि भीरु[31] ते, तृणशिखा[32] झणि तीस उभी रुते.॥ १०४

---

१. धुळीचे. २. कृष्णाचीं पावलें पाहून गोपींचा विरहाग्नि थोडा शांत झाला होता, पण त्याच्या संगातीं कोणी युवती असावी असें तिच्या पादन्यासावरून जाणून त्यांच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला. या मत्सरवायूनें विरहाग्नीला प्रज्वलित केलें. ३. वायु. ४. 'जवेंचि झाला' असा पाठभेद आहे. ५. सवतमत्सररूप उदकांत. ६. अमृतासाठीं सागर मथन करीत असतां विष उद्भवलें. ७. तूं सम मनाचा असतां आम्हांवर विषम कसा झालास? ८. स्त्रिया. ९. सुंदर. १०. टाळतो, वगळतो, चुकवितो. ११. स्त्रिया, युवती. ['नवोढायां स्नुषायां च जायायां युवतौ वधूः' इति लिंगाभट्टः.] १२. मृत्यु. १३. चांगला. १४. गोवर्धन पर्वत धारण करणारा जो कृष्ण त्याचा ओंठ. [गिरिधर+अधर=कृष्ण+ओंठ.] १५. अध्याय ३० श्लोक ३० पहा. १६. फुकट, व्यर्थ. १७. आपलें पदचिन्ह दाखवून आमच्या हृदयांस पीडा देते. १८. मार्ग. १९. स्वच्छ. २०. पाहती. २१. समीप. २२. आम्ही सवतां ह्याच शत्रु. २३. गोपीपादन्यास पाहून मनांत आलेले हे कामिनींचे तर्क आहेत. २४. 'न रुचतां सकळा' असा पाठ आहे. २५. गोकुळांतील स्त्रिया. २६. गोकुळाचा स्वामी, कृष्ण. २७. त्या गोपीचे. २८. अध्याय ३० श्लोक ३१ पहा. २९. मार्गांत. ३०. कैटभ दैत्याचा अरि. [कृष्णानें प्रियेला उचलून खांद्यावर घेतलें.] ३१. स्त्री. ३२. कुसळ इत्यादि गवताचें अग्र.

पहा गोपिका हो! कसा कृष्ण कामी[1]! कसे घेतसे भोग ते ही[2] रिकामी, ।
अशा बोलती आणि धुंडीत जाती पथीं त्याच त्या देखती पुष्पजाती.॥ १०५
प्रियानें प्रिये कारणें जेंवि हार स्वयें गुंफिले दीसतो तो विहार, ।
अशीं लक्षणें लक्षितां हीं सया हो! न वाटे खरें त्या पहायास या, हो!॥ १०६
नें सारे हे पाय क्षितिस रुतले, अर्ध चवडे,
तिच्या ऐशा चिन्हें करुनि तरि हे गोष्ट निवडे; ।
स्वजानुद्वंद्वीं ती बसवुनि पुढें विश्वशरण
स्वयें वेणी घाली, उमटति असे अर्धचरण. ॥ १०७
ठेवी गजीवरि करी करपुष्करातें, स्कंधीं तिच्या हरि तसा करपुष्करातें ।
स्थापूनि, चालत असे म्हणवूनी वाटे या मत्सरें तडफडा बहु होय वाटे. १०८
मऊ वाळवंटीं बहू पुष्पजाती नवे मोगरे कुंद मंदार जाती, ।
पदें देखिलीं त्या स्थळीं फार तीचीं दिसों लागलीं चित्र चिन्हें रतीचीं. ॥ १०९
तेथेंचि चिन्ह अवलोकुनियां रतीचें त्या मत्सरें म्हणति 'पुण्य अपार तीचें.'।
कीं गुंफितां शिरिं फुलें बसला रमाया देखुनियां तिचिच नेत्रविकारमाया.॥ ११०
पद तिचे अबलाजन लक्षिती म्हणति देखुनि 'हे मृदुल क्षिती ।
उतरुनी कुसुमें व्रजशेखरें विविध तोडुनि तीस दिलीं करें.' ॥ १११

---

१. कामुक. २. ती स्त्री. ३. फुकट. ४. पुष्पांचे प्रकार. ५. क्रीडा. ६. पाहतां. ७. गडे हो. ८. अध्याय ३० श्लोक ३३-३४ पहा. ९. सिद्ध होते. १०. दोन्हीं गुडघ्यांवर. ११. विश्वाचें आश्रयस्थान. (कृष्ण.) १२. हत्तीण. १३. हत्ती. १४. शुंडाग्रातें. ['पुष्करं द्वीपतीर्थाहिखगराजौषधांतरे । तूर्यास्येऽसिफले कांडे शुंडाग्रे खे जलेंऽबुजे' इति हैमः.] १५. खांद्यावर. १६. हस्तकमलातें. [पुष्कर=कमळ.] १७. ठेवून. १८. मार्गीं. १९. जाईचें फूल. २०. सुरताचीं अनेक चिन्हें. २१. या श्लोकांत 'अवलोकुनियां' व 'देखुनियां' अशी जीं रूपें योजिलीं आहेत, तीं गद्यग्रंथांत कधींच आढळावयाचीं नाहींत. तसेंच—दावुनि (श्लोक १००), सजुनियां (श्लोक १०२), देखोनि (श्लोक १०३), लावुनियां (श्लोक ८३), मोजूनि (श्लोक ८५), स्मरूनी (श्लोक ९१) इत्यादि रूपें केवळ पद्यात्मक ग्रंथांतच येतात. या शब्दांचीं रूपें गद्यात्मक ग्रंथांत निराळींच दृष्टीस पडतात. सामान्य नियम असा दिसतो कीं, 'ऊन'प्रत्ययांतक क्रियाविशेषणास प्रथमतः इकार होतो, मग वृत्तांच्या अनुरोधानें हा इकार कधीं ऱ्हस्व कधीं दीर्घ होतो, केव्हां केव्हां या इकाराला 'या' प्रत्यय लागतो. असें होतां होतां मूळच्या रूपांत फारच फरक पडतो. जसें करून, करुनि, करूनी, करुनियां, करोनियां, करोनी, करोनियां. याप्रमाणें गद्यात्मक आणि पद्यात्मक ग्रंथभाषेंत हळू हळू फेर पडतो. २२. कटाक्ष मारण्याचें कौशल्य. २३. मऊ. २४. जमीन. २५. गोकुळनायक. (कृष्ण.) [शेखर=शिरोभूषण, तुरा.]

'तो स्वयें हरि अखंड विरक्त स्त्रीजनीं प्रभु न जो अनुरक्त, ।
कल्पवृक्षफळ दे भजनाचें' वाक्य हें [3]जलजनाभजनाचें. ॥ ११२
खांदा कडे घेउनि देव दावी कामी जनांची गति हे वदावी, ।
कामातुर स्त्रीवश ज्या प्रकारें दावीतसे बद्ध जनानुकारें. ॥ ११३
'असेल [5]स्त्रीवृंदीं किमपि हि [6]दुरात्मत्व घडलें,
तरीच श्रीकांतासह [7]विहरणें हें बिघडलें; ।
स्वदोषाचें आम्हां विरहफळ दावी परम तो,
[8]भली ते, कीं सर्वी त्यजुनि हरि तीशींच रमतो.' ॥ ११४
विझाला असें बोलतां [10]क्षिप्र ताप, प्रियाच्या पदाच्या रजाचा प्रताप, ।
तरी [11]भ्रांतचित्ता न सोसे वियोग, स्त्रिया धुंडिती कीं 'घडो जेंवि योग.' ११५
तो डोल ही त्यजुनि चित्त हरीस पाहे दे अंगसंग हरि त्याहुनि ही कृपा हे; ।
[12]एवं च तें स्थळ हि सांडुनि त्या उदारा, मागें तया हुडकिती [13]पशुपाळदारा.॥
[14]अदृश्य एथें [15]जलजाक्ष जाला, जाणों तदारम्य अधोक्षजाला, ।
जो आमुचा नंदकुमार साचा हा मोह ज्याच्या [16]पदसारसांचा. ॥ ११७
स्कंधीं स्त्रियांच्या भुजदंड भारी [17]ठेवीतसे जो [18]मधुकैटभारी, ।
उरोजपाळीं स्वकरें उदारा दावा तया बोलति [19]गोपदारा. ॥ ११८
तुम्हां आम्रवृक्षादि[20]बिल्वां [21]कदंबा पुसो आणिकां ही तरूंच्या [22]कदंबा, ।
तुम्ही वंदितां ज्यासि जो [23]मेघकाय पहातों कृपेनें नमस्कार काय ? ॥ ११९
अशा धुंडिती तों [24]भृंगी एक वाटे दिसे, ठाउका कृष्ण तो तीस वाटे; ।
म्हणे पाहतां [25]माधवाच्या सुखातें पहा लाधली लोचनीं या सुखातें. ॥१२०
'जालीस लक्षुनि सुखी [26]भवभंजनातें, सौंदर्य दाखविसि तें नयनीं जनातें. ।
प्रीया [27]तयाजवळि काय असे हरी तो; आम्हांस जो स्वविरहें प्रभु संहरीतो.' १२१

---

१. आसक्त. २. कल्पवृक्षाप्रमाणें फळ. ३. कमलासारखी आहे नाभी ज्याची असा कृष्ण त्याचे जन म्हणजे भक्त त्यांचें. ४. संसारबद्ध कामातुर पुरुषाचें अनुकरण करून दाखवी. ५. स्त्रीसमूहांत. ६. अंतःकरणाचें कठोरत्व, पाप. ७. क्रीडणें. ८. धन्य, भाग्यवती, वरिष्ठ. ९. अध्याय ३० श्लोक ३७ पहा. १०. सत्वर. ११. वेडावलेल्या मनाला. १२. हा श्लोक दोन प्रतींत उपलब्ध नाहीं. १३. गवळ्यांच्या स्त्रिया. १४. मागचा श्लोक ९२ वा पहा. १५. कमलनेत्राचा. १६. पदकमलांचा. १७. 'ठेवी ठका रे मधुकैटभारी' असा अन्य पाठ. १८. मधु व कैटभ या दोन दैत्यांचा शत्रु. (कृष्ण.) १९. गवळिणी. २०. बेल. २१. वृक्षविशेष (मराठी—कळंब.) २२. समूहास. २३. मेघशरीर. २४. हरिणी. २५. लक्ष्मीपतीच्या. २६. कृष्णातें. २७. 'प्रांतांत या जवळि काय असे हरी तो' असा अन्य पाठ आहे.

प्रिया एकि नेवोनियां क्षिप्र संगें, रमे तीसवें [1]चित्रलीलाप्रसंगें; ।
स्तनींच्या तिच्या कुंकुमें [2]रक्त[3]हारें, स्वकंठीं धरूनी करी तो [4]विहार. ॥ १२१
तों वाटला जवळि त्यासि [5]जगन्निवास, ये कुंदमंद [6]कुर्चकुंकुममिश्र वास; ।
कीं कुंदपुष्पकृत जो प्रभुकंठहार [7]घ्राणीं [8]तयावरिल वायु करी विहार. ॥ १२२
न केला मनीं गर्व तों गोपजाया, स्वयें योग्य झाली अशी हे सजाया, ।
तिनें ही बहू [9]मानितां आपणातें, हरी अंतरे, त्या धरी [10]मीपणातें. ॥ १२३
'सर्वांत मी बरि' म्हणोनि च एकलीला त्यांतूनि आणुनि करी [11]मकरांकलीला, ।
ऐसा मदें करुनियां तिस गर्व जाला [12]लौंडें वदे वचन हें [13]गदपूर्वजाला. ॥ १२४
'[14]भोंगलें, अजि! न चालति पाय, काय यासि करितोसि उपाय? ।
[15]पाहिजे जरि असें तुज वाटे, वांगवूनि तरि ने मज वाटे.' ॥ १२५

---

१. नानाप्रकारच्या क्रीडा करून. २. केंशरानें तांबडा झालेला हार. ३. 'क्षिप्रहार' असा पाठभेद आहे. ४. क्रीडा. ५. जगद्व्यापी कृष्ण. ६. केशर. ७. नाकीं. ८. त्या कुंदपुष्पांच्या माळेवरून वाहून येणारा वायु. ९. मी थोर असा गर्व करतांच हरि अंतरला. १०. अहंकारातें. ११. मदनक्रीडा. [मकरांक=मकरध्वज=मदन.] १२. 'ताठें' असाही पाठ आहे. १३. गद=कृष्णाचा धाकटा भाऊ, गदाचा पूर्वज=कृष्ण त्याला. १४. थकलें. १५. प्राकृत 'पाहिजे' हा शब्द विचार करण्यासारखा आहे:—'पाहिजे' 'म्हणजे' हे दोन्ही शब्द जुन्या भाषेंतले अद्याप राहिलेले आहेत, हीं 'पाह' व 'म्हण' या धातूंचीं कर्मणि प्रयोगांतलीं रूपें होत. 'पश्य' व 'भण्' या धातूंस कर्मणि 'य' प्रत्यय होऊन 'पश्यते' व 'भण्यते' अशीं मूळचीं रूपें झालीं; व नंतर 'य'चा अपभ्रंश प्राकृतांत 'ज' होऊन व उपांत्य 'त'कार लुप्त होऊन वरील रूपें बनलीं. मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या ग्रंथांतून वरील शब्द मूळ अर्थी योजलेले आढळतात. जसें:—जेणें माया अधिष्ठिजे। तें ब्रह्म मायोपाधि बोलिजे। माया शबळ ऐसें म्हणिजे। तयातेंची ॥ (विवेकसिंधु). तेव्हां 'पाहिजे' म्हणजे 'पाहिलें जातें' व 'म्हणिजे' म्हणजे 'म्हणलें जातें' असा मूळचा अर्थ होय. पण क्रमाक्रमानें आतां अगदीं निराळ्या अर्थी वरील शब्दांचा प्रयोग होतो. पहिल्याच्या ठायीं आवश्यकत्वाचा बोध होतो, व दुसरा अर्थविवरण करतांना अव्ययत्वें करून योजिला असतो; जसें:—'रोग्याला औषध पाहिजे' 'गज म्हणजे (प्राकृतांत) हत्ती'. आतां 'म्हणजे' याचा अर्थ दुसरा हळू हळू कसा बनला हें उघडच आहे; वरील दुसऱ्या वाक्याचा मूळ पदार्थप्रमाणें घेतला असतां असा अर्थ होतो:—'प्राकृतांत गज हा हत्ती म्हटला जातो' म्हणजे 'गज या शब्दाचा प्राकृत पर्याय हत्ती हा होय.' आतां दुसऱ्याचें अर्थांतर मात्र अंमळ दुर्बोध होय. 'रोग्याला औषध पाहिजे' याचा मूळ कर्मणिप्रमाणें अर्थ 'रोग्याला औषध पाहिलें जावें' म्हणजे 'त्याच्या औषधाची तजवीज करणें जरूर आहे' असा घेतां येणार आहे. यांत आवश्यकतेचा बोध होतो हें स्पष्टच आहे'. (निबंधमाला अंक ४३ पृ० २४-२५.) 'पद्यरत्नावली'च्या अखेरीस 'मराठी भाषेंतील व्याकरणाचे विशेष' म्हणून एक निबंध जोडला आहे. त्यांत 'पाहिजे' या शब्दावर असें विवरण केलें आहे:—"आतां 'पाहिजे' या शब्दाच्या अर्थात अधिक भेद पडून तो मूळ अर्थापासून दूर गेला आहे. तरी त्याच्याही हल्लींच्या अर्थात व

दे उत्तर प्रभु न होत विलंब ईस 'स्कंधावरी तरि' म्हणे हरि 'येच बैस.' ।
देखोनि नम्र उचली पद सारसाक्षी तों गुप्त होय प्रभु सारअसारसाक्षी.॥ १२६
गोपी न देखे जशि लोकपाळा, हाणोनि घे आपुलिया कपाळा; ।
म्हणे, 'शिवे गर्व जिच्या मतीतें, भोगील कैसा सुखधाम तीतें?'॥ १२७
म्हणे, 'कृष्णा! कोठें त्यजुनि अजि! गेलास मजला,
अनर्थाचा हेतु त्वरित मज नाहीं समजला; ।
तुझी मी तों दासी, झणि मज उदासीन गमसी,
फिरेन श्रीकांता! रमत तुजशीं जेंवि रमसी. ॥ १२८
विविध भोगितसोनि हि सोहळे, उपजले मज गर्वित डोहळे, ।
निज शरीरचि म्यां अभिमानिलें, प्रभुसि गर्वभरें अपमानिलें.' ॥ १२९
परोपरी स्वप्रियकोप जाया आक्रंदली ये रिति गोपजाया; ।
[12]तयेचि ही दूरि तथापि कानीं ते ऐकिली वैखरि[13] गोपिकांनीं. ॥ १३०
ज्यांतें वधू धुंडितसे स्वकांता, आक्रांत हा ऐकति गोपकांता, ।
धांवोनियां त्या पुसती तयेतें, टाकोनि गेला प्रिय जीस तीतें. ॥ १३१
म्हणे, 'ती बायां हो! बहु मजशि गोविंद रमला,
अशा लाडें झाला बहुत हृदयीं गर्व मजला; ।
हरी येणें जातो म्हणुनि मज नाहीं समजला,
अहो! बाई! गेला मग विधि[17] असा हो समजला'. ॥ १३२

---

मूळच्या अर्थात संबंध दाखवितां येईल. 'पहा' धातूचा कधीं कधीं 'इच्छिणें' असा अर्थ होतो; जसें:- 'तो जाऊं पहातो, येऊं पहातो', इत्यादि. तसेंच या कर्मणिरूपाचा विध्यर्थीही पुष्कळ वेळ प्रयोग होतो म्हणून वर लिहिलेंच आहे. तेव्हां 'पाहिजे' याचा अर्थ 'इच्छावें' अथवा 'इच्छित आहे' असा झाला. पुढें 'इच्छित' असा अर्थ घेऊन त्याच्या संबंधानें कर्तृवाचक पदास संबंधसामान्यदर्शक चतुर्थी होऊन 'त्यास पाणी पाहिजे' म्हणजे 'त्यानें पाणी इच्छित आहे' असा प्रयोग झाला असावा." (पदरत्नावली पृ० ८९ पहा.) १६. उचलून.

१. कमलनेत्री. २. सर्वद्रष्टा. ३. कृष्णा. ४. सुखाचें गृह जो कृष्ण तो. ६. कारण. ७. 'बहु केलें गर्वा, म्हणुनि मज तूं, जी! न गमसी' असा अन्य पाठ. ८. विलास, उत्सव. ९. दोहद=(प्राकृत-दोहलो) डोहळे. १०. माझें शरीर श्रेष्ठ असा अभिमान धरला. ११. आपल्या कृष्णाचा राग जावा म्हणून. १२. 'तयास हें दूर तथापि कानीं' असा अन्यपाठ आहे. १३. वाणी. १४. 'वनीं अशा धुंडिती जों स्वकांता' असाही पाठभेद आहे. १५. अध्याय ३० श्लोक ४१ पहा. १६. लाड=प्रेम, कौतुक. (लड्=लाड करणें.) १७. नशीब. १८. या श्लोकाचा अन्य पाठ:-'म्हणे ती बाया! हो! बहु मजसि गोविंद रमला, कडे खांदा वांट बसवुनि फिरे सुंदर मला । अशा लाडें झाला बहुत हृदयीं गर्व मजला, हरी येणें जातो म्हणुनि मज नाहीं समजला ॥'.

दचकति वचनें त्या सर्व ही गोप[1]जाया,
म्हणति अवचियां ही हेतु[2] हाची त्यजाया, ।
त्यजुनि सुख पथातें कष्टलों आड वाटे,
म्हणवुनि अबलांतें[3] हा खअन्याय वाटे. ॥ १३३

नवल करुनि जी ती राहिली सारसाक्षी,[4]
जिस तिस हरि वाटे सर्वसंसारसाक्षी.[5] ।
फिरवि विषय त्यासी [6]इंद्रियादीक गाई
पशुपतनय[7] आम्ही मानिला तो, अगाई ! ॥ १३४

हुडकिती मग तीसह कामिनी, चहुंकडे फिरती गजगामिनी[9] ।
[10]शशिकरीं, न दिसे अतिसत्तमीं, हरि अदृश्य गमे निबिडा[11] तमीं. ॥ १३५

समजति न कितेकी ज्ञानसिद्धिप्रदा[12] या,
धरुनि अगुण मार्ग क्लेशकृत्[13] [14]संप्रदाया, ।
श्रम विफळ पहातां, मागुती ते अजाला
भजति, मद वधूंचा येरिती दूर झाला. ॥ १३६

आत्मा मनीं स्फुरतसे व्यतिरेकरीती तो अन्वयें जडचि निश्चय हा करीती; ।
गर्वें न तो मनिं दिसे मग न[15]श्वरांत अद्वैत केंवि गवसे जगदीश्वरांत? ॥ १३७

चंद्रप्रकाशक मनीं न दिसे हरी तो त्या चाळवूनि मद येरिति जो हरीतो. ।
गर्वें जसें मुनि न देखति बोधें[16] मानी,[17] कीं चंद्र तोचि मति सर्वमनोभिमानीं.[18] ॥

आत्मा न देखति मनीं व्यतिरेकरीती, गर्विष्ठ ते जडचिदैक्य मुखें करीती; ।
जाणोनि अन्वय जडैक्य दिसे न कांहीं, ऐसा तमांत हरि मानिति गोपिकाही.॥

[21]जडतरंग चिदब्धि[22]च भासतो परि तमोगुण मात्रचि भास तो. ।
हरि तमीं न दिसोनि गमे असें, वदति बोधमदान्वित हें असें. ॥ १४०

१. गवळणी. २. टाकण्यास कारण गर्वच. ३. गोपस्त्रियांस. ४. कमलनयना. ५. सर्वद्रष्टा. (कृष्ण.) ६. इंद्रियरूप गाई पाळणारा हा साधा गवळ्याचा मुलगा असें आम्हीं समजलों. ७. गवळ्याचा मुलगा. ८. अध्याय ३० श्लोक ४३ पहा. ९. 'दिनयामिनी' असा पाठ आहे. १०. चंद्रकिरणांनीं, चांदणें होतें तोपर्यंत वनांत शोध करीत फिरल्या. ११. दाट. १२. ज्ञानसिद्धि देणारा. १३. दुःखप्रद. १४. पूर्वागत क्रमाला. १५. नाशवंतांत. १६. उपदेश. १७. गर्वी. १८. या श्लोकाचा अन्य पाठ—'चंद्रप्रकाशितवनीं न दिसे हरी तो, त्यांचा लपोनि मद येरिति जो हरीतो । गर्वें जसें मनिं न देखति नाभि मानी, कीं चंद्र तोचि मनिं सर्व मनोभिमानी ॥.' १९. 'मुनी'–पाठभेद. २०. 'तो अन्वयें जडचिदैक्य'–पाठभेद. २१. जडसृष्टिरूप लाटा. २२. चैतन्यसागर.

प्रकाशीं [1]शशीच्या हरी सांपडेना, असोनी तमामाजि ठायीं पडेना; ।
असें बोलतां भाव हा व्यासदेवें असा दाविला कीं पहावा [2]सदैवें. ॥ १४१

[3]मैनातें जरी गर्व टाकूनि योजी, म्हणे ध्यान योगांत तो देव [4]यो जी ! ।
तरी को! बळें स्पर्शतां [5]मीपणातें, हरी त्यासि नेदी शिवों आपणातें.॥ १४२

[6]व्रजपति यशगंगे [7]न्हाणिलें त्यांस देवें,
खमन तरिं शिवों ही दीधलें त्यां सदैवें. ।
म्हणुनि सकळ [8]गोपीवृंद तो गीत गाय,
मिळति शुकमुखें ते भक्ति लोकीं [9]नें माय. ॥ १४३

परि जया [10]यमुनापुलिनीं हरी करुनि [11]गुप्त तनू, मद संहरी, ।
धरुनि तेचि तटीं मृदुल क्षिती, हरिस गाति, तदन्य न लक्षिती. ॥ १४४

ज्या भूमिके श्री[12]नवमेघनील रमाविला सुंदर [13]इंद्रनीळ, ।
त्या भूमिके वांचूनि सांपडेना अन्यत्र ठायीं पदरीं पडेना. ॥ १४५

अद्वैतभूमीवरि गर्व झाला, रमाविले त्या [14]गदपूर्वजाला, ।
तरी प्रसन्न प्रभु तोचि केला, धरूनियां त्याचि [15]सुभूमिकेला. ॥ १४६

पुन्हा या अद्वैतक्षितिवरि हरी तो न रवसे,
जया दिव्या [16]हेमीं स्थिरचरपणीं तो [17]नग वसे; ।
विटाळें सर्वांच्या [18]अशुचि मन तें पात्र सहसा,
नव्हे त्या ज्ञानातें श्रमविति जया शत्रु सह [19]सा. ॥ १४७

ज्या भूमिकेसि असतां मनिं गर्व जाला, तेथें अदृश्य मनिं मानियलें [20]अजाला; ।
आल्या तयाच [21]पुलिनाप्रति, तें शुकानें कीं बोलिलें, 'मनिं रहस्य धरा [22]सुकानें'. ॥

म्हणवुनि पुलिना त्या मागुती गोपजाया
अनुसरति, तथापि मागुती कोप [23]जाया ।
करिति हरिगुणांचें कीर्तन सुखभावें
वसति सकळ तीर्थें ज्या कथेंत [24]स्वैंभावें. ॥ १४९

---

१. चंद्राच्या. २. भाग्यवंतानें. ३. हा श्लोक दोन जुनाट पोथ्यांत १३५ व्या श्लोकापुढें आहे. ४. येवो. ५. अहंकारातें. ६. गोकुलस्वामी. (कृष्ण.) ७. स्नान=न्हाण. (प्राकृत.) ८. 'गोपी गोपती गीत गाय' असा अन्यपाठ. ९. न मावे. १०. यमुनेच्या वाळवंटांत. (अध्याय ३० श्लोक ४५ पहा.) ११. आपला देह गुप्त करून. १२. नूतन मेघाप्रमाणें श्यामवर्ण. १३. इंद्रनील मण्यासारखा. १४. गदाचा पूर्वज. (वडील भाऊ, कृष्ण.) १५. अद्वैताला. १६. सोन्यांत. १७. दागिना. १८. अपवित्र, मलिन. १९. काम, मद, मोह, लोभ, मत्सर आणि क्रोध असे सहा शत्रु. २०. जो जन्मरहित विष्णु तो. (कृष्ण.) २१. पुलिन=वाळवंट. २२. उत्तम कर्णानें. २३. राग जावा म्हणून. २४. सहजगत्या, आख्या.

म्हणोनि गाती गुण माधवाचे, ते कीर्तिगंगाच अगाध वाचे; ।
येतो मनें शुद्ध करोनि दाना, जगा [1]नगा [2]हाटक तें [3]निदाना. ॥ १९०
मनांत होतांच अगाध वाचे विलास देहीं प्रभु माधवाचे, ।
पावोनि गाती व्रजगोपदारा, न [4]देहगेहा स्मरती उदारा. ॥ १९१

अशी **रासक्रीडा** [5]मदनशर अध्याय रचिली,
[6][7]प्रवृत्तीच्या लीलांहुनि, बहु [8]निवृत्तीच रुचली; ।
निवृत्तीवांचूनी न किमपि हि वृत्तांत गवसे,
दिसे ब्रह्मीं त्याला जग [9]कनकिं जैसा [10]नग [11]वसे. ॥ १९२

[12]अध्याय पांच, शर ही धरि पांच काम; प्रद्युम्न [13]अंगज जया करि पूर्णकाम, ।
केला [14]अनंग [15]रतिनायक शंकरानें त्याला तनू दिधलि शंकरशेखरानें. ॥ १९३

असे पांच अध्याय हे व्यासदेवें, करूनी दिले, वर्णिले [16]हे सुदैवें; ।
[17]सुतें त्याचिया यांत अध्याय [18]दोन असे वर्णिले शब्द थोडे वदोन. ॥ १९४

प्रवृत्तीची लीला निजरस निवृत्तींत मिरवी,
प्रवृत्तीवृत्तांत त्वरितचि निवृत्तींत फिरवी; ।
[19]भववार्ता हे वार्ता निवडुनि [20]विवर्ता [21]परिहरी
रमाभर्ता कर्ता करुनि हि अकर्ता परि हरी. ॥ १९५

(पद.)

[22]गोपी म्हणती जी गोपाळा । ऐसी न चव दे वनमाळा. ॥ ध्रुवपद. ॥
सांडूनियां सर्व विषय । तुझें धरिलें चरणद्वय. ॥ गोपी० ॥ १ ॥
टाकुनियां [23]हटवाद । अंगसंग दे आल्हाद. ॥ गोपी० ॥ २ ॥

---

१. दागिना. २. सोनें. ३. आदिकारण. ४. देहरूप शरीराला. ५. मदनशर=पांच. [मदनाचे शर पांच आहेत. हे पांच शर पुष्पमय आहेत. ते असे:—'अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥,' अथवा 'उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥']. ६. संसारमार्ग. ७. 'प्रवृत्तीच्या लीला परि बहु निवृत्तीस रुचली' असाही पाठ आहे. ८. संसारविमुखता. ९. सोन्यांत. १०. दागिना. ११. सुवर्णांत जसा अलंकार तसें ब्रह्मांत जगत्. १२. अध्याय २९-३३ मिळून पांच होतात. या पांच अध्यायांत रासक्रीडा हाच विषय आहे. १३. पुत्र, तनूज. १४. अंगहीन. १५. मदन. १६. 'ते' असाही पाठ आहे. १७. व्यासपुत्र=शुक यानें. १८. पूर्वाध्याय आणि उत्तराध्याय असे दोन अध्याय. १९. संसारपीडित. २०. संसारभ्रम, भोंवरा. २१. नष्ट करी. २२. या प्रकरणास 'उत्तराध्याय' असें नांव हस्तलिखित प्रतींत आहे. २३. दुराग्रह.

जेंवि मुमुक्षु[1] यातें हरी । तेंवि आम्हां अंगीकारीं. ॥ गोपी० ॥ ३ ॥
पति पुत्र आणि सुहृद[2] । आम्ही जाणों तुझें पद. ॥ गोपी० ॥ ४ ॥
सर्वभावें तुझें भजन । करिताती कुशल जन. ॥ गोपी० ॥ ५ ॥
आतां स्तनीं आणि शिरीं । कर ठेवुनि ताप हरीं. ॥ गोपी० ॥ ६ ॥
देखुनियां सौंदर्यासी । झालों फुका तुझ्या दासी. ॥ गोपी० ॥ ७ ॥
देखुनियां तुज मुरारी[3] । दासी कोण नव्हे नारी? ॥ गोपी० ॥ ८ ॥
ऐकुनियां शरण आला । दास दैटुनि वामन जाला. ॥ गोपी० ॥ ९ ॥ १९६

(अभंग.)

अदृश्य हरी होतां । हरि झाल्या गोपकांता, ।
भृंग पिकें[5] ध्यातां । गोपाळा. ॥ १ ॥
एक होय पूतना, । एक कृष्ण शोषी स्तना, ।
वेधियल्या गोपांगना, । गोपाळा. ॥ २ ॥
यशोदा होय एक नारी, । कृष्ण होय एक हरि, ।
बांधों जाई उदरीं । गोपाळा. ॥ ३ ॥
एक होय कालिया[6] । कृष्ण होय मर्दी तया, ।
म्हणे मजसम अव्यया[7] । गोपाळा. ॥ ४ ॥
गोपी गोप गाई होती । कृष्ण होय ती प्रती ।
वृष्टिभयें त्राही[8] म्हणती । गोपाळा. ॥ ५ ॥
कृष्ण होय ते वसन । धरी जाणो गोवर्धन[9] ।
पाहती तैसे व्रजजन । गोपाळा. ॥ ६ ॥
वियोगें कृष्णपिसें[10] । लागे गोपींतें जैसें ।
योगें वामनाच्या ऐसें । गोपाळा. ॥ ७ ॥ १९७

(पद.)

शरदिंदुयामिनी[11] । वेणुरवें[12] कामिनी ।
जाति गजगामिनी[13] । हरिकारणें. ॥ १ ॥

---

१. मोक्षेच्छु. २. मित्र. ३. मुरनामक दैत्याचा शत्रु. ४. आग्रहानें. ५. कोकिल. ६. कालियसर्प. ७. अविनाशा. ८. रक्षण कर. ९. वसनांचा समूह करून गोवर्धन पर्वत हातीं धरी. १०. वेड. ११. शरत्काळांतील चांदणी रात्र. [यामिनी=रात्र.] १२. मुरलीचा ध्वनि. १३. गजसदृशमंदगामिनी.

कामें सर्व सोडिती । आर्य मार्ग मोडिती ।
गृहपाश तोडिती । प्रेमें हरिच्या. ॥ २ ॥
दोहनें वधूजनें । त्यागिलीं सभोजनें ।
चित्त भवभंजनें । वेधिलें असें. ॥ ३ ॥
एकी अन्नें काढितां । स्वजनासी वाढितां, ।
वेणु कानीं पडतां । त्याही धांवल्या. ॥ ४ ॥
एकी शेषें जेविती, । एक पती सेविती, ।
त्याहि वेगें धांवती । कामविव्हला. ॥ ५ ॥
एकी थानीं लेंकुरें । जाति लोटुनियां करें ।
शासनें भयंकरें । ते निघाली. ॥ ६ ॥
विपरीत भूषणें । दिसती न दूषणें ।
चित्तीं व्रजभूषणें । वेध लाविला. ॥ ७ ॥
एकी नाकीं बाळिया । कानीं मोती त्यालिया ।
त्याहि वेगें आलिया । जेथें हरि तो. ॥ ८ ॥
वडिलीं वर्जिलिया । पतिनींही गांजिलिया ।
तरि नाहीं लाजलिया । पावल्या हरी. ॥ ९ ॥
त्यागुनी मताभिमान । स्वकुलअभिमान ।
गातो विना तान मान । वामन गुण. ॥ १० ॥ १९८

(श्लोक.)

मांळाकार परस्परें कर गळां घालोनि गोपांगना,
गाती नाचति पाहती अवघिया एका जगज्जीवना; ।
सोन्याचे मणि ओंविले भुजगुणीं गोऱ्या शशांकानना
पाचूचे पदक स्थळीं स्मर मना श्रीदेवकीनंदना. ॥ १९९

---

१. श्रेष्ठ मार्ग. २. दूध काढण्याचें काम. ३. भाजन=भांडें. ४. संसारनाशक (कृष्णानें). ५. अवशिष्ट राहिलेलें अन्न. ६. कामार्ता. ७. आज्ञा. ८. गोकुळास शोभा देणाऱ्या कृष्णानें. ९. नाद, वेड. १०. येथपासून पुढील भागास 'रासमंडल' असें नांव देऊन कोणी निराळेंच प्रकरण मानितात. ११. जगदाधार कृष्णाला, सर्व जगताच्या प्राणसख्याला. १२. बाहुरूपी दोऱ्यांत. १३. मृगांकवदना, चंद्रमुखी. १४. रत्नविशेष. (हिरव्या रंगाची पाच.)

[1]कालिंदीतटवाळवंट गगनीं संपूर्ण [2]तारापती,
[3]कल्हारीं कुमुदोत्पलीं अलि शरत्कालीं [4]जैलीं [5]गुंजती; ।
[6]वारा मंद सुगंध शीतल, फुलें नाना तरू शोभती,
ऐशा [7]यामिनि गोपिका हरिसवें रासोत्सवीं क्रीडती. ॥ १६०
[8]गोपीनायक इंद्रनील सिरवे, [9]मुक्ताफळांच्या कळा
[10]गोऱ्या गौळिणी रासमंडळि तशा मध्यें हरी [11]सांवळा; ।
कस्तूरी [12]निटिलीं कलिंदतनया [13]श्रीरासमाळा गळां
सौभाग्य [14]व्रजभूमिचें पदरजें त्याच्याचि आलें फळा. ॥ १६१
जे ते गोपिस आपणाच जवळी वाटे असावा हरी,
जाणोनी जितुक्या स्त्रिया तितुकिया तत्काळ मूर्ती धरी; ।
सोन्याचे मणि [15]इंद्रनीळ तितके तो हार त्याचे परी,
[16]दो गोपींत मुकुंद, कृष्णयुगुलीं एकेक ते [17]सुंदरी. ॥ १६२
सर्वांचें हरि[18]कंधरीं भुज तया रासक्रियामंडळीं
कृष्णाचे सकळां गळां भुज अशी झाली अहो! सांखळी; ।
[19]एका त्या अवध्या स्थळीं प्रकृति ही नाना दिसे वेगळी,
गोऱ्या गौळिणि त्यांत एक सिरवे कृष्णप्रभा सांवळी. ॥ १६३
त्या गोपी जितुक्या, करोनि तितुक्या मूर्ती, जरी नाचला,
ज्या त्या मानिति आपणाचि जवळी आहे हरी येकला; ।
तीची तेथुनि दृष्टि ती न विघडे जो जो जिणें देखिला,
'मेघश्याम अनेकरूप रमतो' ऐसें न भासे तिला. ॥ १६४

---

१. यमुना नदी. २. चंद्र. ३. कल्हार, कुमुद हीं भिन्नजातीय उत्पलें (कमळें) होत. या कमळांत अलि (भ्रमर) गुंजति (गुंजारव करतात) अशा शारदीय रात्रिसमयीं. ४. 'जसे' असाही पाठ आहे. ५. गुंजारव करतात. ६. वायु मंद, सुगंध आणि शीतल असा तीन प्रकारचा असतो असा कविसमय आहे. ७. रात्रीं. ८. 'दारानायक' व 'राधानायक' असे अन्य पाठ आहेत. ९. मोत्यांच्या. १०. गौळिणी गोऱ्या होत्या त्या मोत्याप्रमाणें शोभल्या व कृष्ण काळा होता तो इंद्रनीलमण्याप्रमाणें शोभला. ११. श्यामल. १२. कपाळीं. १३. 'शृंगारमाळा गळां' असाही पाठ आहे. १४. गोकुळाचें. १५. जितके सोन्याचे मणि तितकेच इंद्रनील मणि होते. १६. जितक्या गोपी तितक्या कृष्णमूर्ति झाल्या, तेव्हां दोन गोपींत एक कृष्ण, व दोन कृष्णांत एक गोपी असें झालें. १७. गोपी. १८. कंठ, गळा. १९. 'एका त्या पुरुष स्वयें प्रकृति ही नाना दिसे वेगळी' असा अन्य पाठ.

रूपें तीं[1] स्मरकल्पवृक्ष हरिचीं, गोपांगना त्या लता;
की[2] ते मेघसमूह त्या चमकती त्यांमाजि विद्युल्लता[3] ।
कीं तारा[4] युवती अनंत गगनीं मूर्ती मधें नीलता,
जेव्हां एकचि तेधवां उडुगणीं[5] भूचंद्रमा खालता. ॥ १६५
गोऱ्या गौळिणि सांवळ्या हरितनू रासोत्सवीं नाचती,
श्रीगंगेयमुनेमधें तरल[6] ते कल्लोल[7] आंदोलती[8] ।
गोपीलोचन[9] मीनें[10] लोलें[11] मकर श्रीकुंडलें डोलती,
गोपस्त्रीकुचकुंभ[12] तारक करी पोंहे रतीचा पती[13]. ॥ १६६
थैथैतॉल[14] समन्वयें ध्वनि उठे की तंतनेत्र[15] श्रुती,
त्या गोपी व्यतिरेक गाउनि परब्रह्मीं अहो! नाचती; ।
तेथें गायक ते मुनी भ्रमर तद्वृंदांसवें[16] गुंजती,
आत्मा निर्गुण विश्व उद्धरितसे श्रीयोगमायापती. ॥ १६७
कोणी लाविति नाचतां मुख मुखा, तांबूल त्याचे मुखीं,
कोणी मानवला हरी मजवरी ऐशाच भावें सुखी; ।
त्यांच्या देखुनियां कळा, स्तुति करी त्या त्या गुणासारखी,
जे ते आवडती म्हणे मज अशी नाहीं दुजी[17] आणखी. ॥ १६८
कोणी श्रीभुजदंड हुंगिति, गळां जे आपुल्या घातले,
जे स्वाभाविक ही सुगंध अगरुश्रीचंदनें चर्चिले; ।
कोणी श्रांत कुचावरी करतल श्रीमूर्तिचें ठेविलें,
कोणी ओष्टहि नाचतां मुख मुखीं घालूनि आस्वादिले. ॥ १६९

---

१. हरीच्या अनेक मूर्ति ह्या स्मरकल्पवृक्ष व गोपी ह्या त्या वृक्षास लटकून असणाऱ्या लता होत. २. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. ३. विजा. ४. नक्षत्रें हीं गोपीरूप होत. ५. नक्षत्रसमुदायांत. ६. चंचल. ७. लाटा. ८. कृष्णमूर्ति काळ्या व गोपी गोऱ्या असल्यामुळें गोपींचें आणि कृष्णमूर्तीचें नाचणें गंगायमुनांच्या संयुक्त झालेल्या लाटांप्रमाणें भासलें. ९. गोपांगनांचे नेत्र हे मत्स्य व कृष्णाचीं कुंडलें हीं चंचल मकर होत असें दिसलें. १०. मत्स्य. ११. चंचल. १२. गोपींचें स्तनघट. [स्तनांचें स्थौल्य आणि वर्तुलाकार दाखविण्याकरितां त्यांस कलशाची अथवा कुंभाची अथवा कमंडलूची उपमा देण्याचा प्रचार या देशांतील कवींमध्यें फार आढळतो. (यशोदापांडुरंगी पृ० ३१९.) असें कुचकुंभ, स्तनकुंभ, 'भरोनि कुचकुंभ जी विपरसें मुखीं देवकी' (केकावली ९८.)] १३. मदन. १४. 'तत्तत्ताल' असाही पाठ आहे. १५. 'तत्र तत्र' असाही पाठ आहे. १६. 'तद्वृंदासवें' असाही पाठ आहे. १७. माझ्यासारखी दुसरी गोपी कृष्णास आवडत नाहीं असें ती ती गोपी म्हणे.

ऐशा कृष्णसमागमें [1]स्मरभरें गोपांगना नाचल्या,
गाती चित्रविचित्र नृत्य करितां कामातुरा [2]भागल्या, ।
मूर्त श्रीपतिच्या समीपचि गळां तींहीं मिठ्या घातल्या,
लक्ष्मीवांचुनियां [3]अलभ्य रतितें गोपांगना लाधल्या. ॥ १७०
नाना भिन्न [4]उपाधि घेउनि [5]लयीं माया निघे केवळी
श्रीमूर्ती युवती मिळोनि घडली होती अशी [6]सांखळी, ।
तें ब्रह्म प्रतिबिंबलें बहुघटीं जें एक एके [7]जळीं
गोपी एकचि कृष्ण एक रमती, द्वंद्वें अशीं वेगळीं. ॥ १७१
गोपींचे [8]मुखइंदुबिंदु वरते नृत्यश्रमें निर्मिले,
नानारूपधरें करें सुखकरें [9]पीतांबरें पूशिले; ।
कस्तूरीविण निष्कलंक बरवे [10]ऐणांक ते शोभले
[11]कामव्याधि अनादि [12]आधि जितुके ते सर्वही नासले. ॥ १७२
गांठी कंचुकिच्या [13]जगद्गुरुकरें गोपींचिया सूटल्या,
[14]ग्रंथी चिज्जड त्या अनादि रचिल्या त्या ही अहो! तूटल्या. ।
कृष्णाच्या अधरामृतें अमरता तात्काळ त्या पावल्या,
[15]नीवीमोक्ष मुकुंदहस्तकमळें तो मोक्ष त्या लाधल्या. ॥ १७३
नेले [16]राजसराग ते [17]अधरिंचे श्री[18]वल्लभें चुंबनें,
दृष्टींतील [19]निरंजनें हरपलीं जीं तामसें [20]अंजनें, ।
जें कां [21]चंदनसत्व ही हरि हरी त्यांचें निजालिंगनें
केल्या निर्गुण त्या रतान्तसमयीं गोपी जगज्जीवनें. ॥ १७४
जाल्या निर्गुण त्या परंतु सगुणप्रेमेंचि जें राहिलें,
कांहीं चंदन शुभ्रता उरवुनी तें सत्व तों शोभलें; ।
स्वानंदांत बुडी रतान्तसमयीं देऊनि तें ठेविलें,
जीवन्मुक्तपणें हरीस सकळीं तेणेंचि आलिंगिलें. ॥ १७५

---

१. मदन. २. थकल्या. ३. मिळण्यास कठिण अशा रतीतें (सुखातें.) ४. रूपें, वेष. ५. लयकाळीं, नाशसमयीं. ६. 'सांवळी' असाही पाठ आहे. ७. 'आत्मा तो प्रतिबिंबला प्रकृतिच्या नाना घटांच्या जळीं' असाही पाठ आहे. ८. मुखचंद्रावर घामाचे बिंदु. ९. पीतवस्त्र परिधान करणाऱ्या कृष्णानें. १०. चंद्र. ११. रोग. १२. मनोव्यथा. १३. जगताचा गुरु (पिता—कृष्ण) त्याच्या हातानें. १४. देहांच्या गांठी सूटल्या=जन्ममरणबंधमुक्त झाल्या. १५. नीरी सोडणें, गांठ सोडणें. १६. रजोगुणजन्य राग. (रक्तिमा.) १७. ओंठाचा तांबडा वर्ण. १८. श्रीरमणानें (कृष्णानें.) १९. मायाशून्य. २०. काजळ. २१. चंदनरूप सत्वगुण.